जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार १९ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०

सोनिया गांधींच्या पुस्तकाने मोडले विक्रीचे सर्व विक्रम

एका आठवड्यात २ लाख प्रतींची विक्री

नवी दिल्ली- १० नोव्हेंबर रोजी प्रकाशित झालेल्या सोनिया गांधी यांच्या 'Belonging: A Journey of Love' या पुस्तकाने विक्रीचे अनेक विक्रम केल्याचा दावा करण्यात आला आहे. हे पुस्तक प्रकाशित करणाऱ्या हार्पर कॉलिन्स या प्रकाशन संस्थेच्या म्हणण्यांनुसार आतापर्यंत या पुस्तकाच्या २ लाखांहून अधिक प्रतींची विक्री झाली आहे. म्हणजेच अवघ्या एका आठवड्यात या पुस्तकाने जवळपास २० कोटी रुपयांची कमाई केली आहे. पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यादरम्यान हे पुस्तक प्रकाशित करणाऱ्या 'हार्पर कॉलिन्स इंडिया'चे सीईओ अनंत पद्मनाभन यांनी पुस्तकाच्या वेगवान विक्रीबाबत दोन प्रकारचे विक्रम केल्याचा दावा केला.



सोनिया गांधींच्या पुस्तकात सावरकरांच्या अपमानाचा दावा

पुस्तकाच्या प्रती फाडत शिंदेंच्या शिवसेनेकडून बंदी घालण्याची मागणी

मुंबई /प्रतिनिधी : काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या 'बिलॉंगिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' या आत्मचरित्रावरून महाराष्ट्रात राजकीय वाद निर्माण झाला आहे. या पुस्तकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान केल्याचा आरोप करत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने बुधवारी (दि. १८) पुस्तकाच्या वितरणाला विरोध केला. तसेच, महाराष्ट्रात या पुस्तकावर बंदी घालण्याची मागणीही पक्षाने केली. या निषेधार्थ शिवसेनेच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेत पुस्तकाच्या प्रतींची पाने फाडून निषेध नोंदवला.

शिवसेनेच्या नेत्या शायना एन. सी., संजय निरुपम आणि आनंद दुबे यांनी पत्रकार परिषदेत सोनिया गांधी यांच्या आत्मचरित्रातील सावरकरांविषयीच्या मजकुरावर आक्षेप घेतला. या पुस्तकातून सावरकरांची प्रतिमा मलिन करण्याचा आणि इतिहासातील वास्तव झाकण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच हार्परकॉलिन्स या प्रकाशन संस्थेने पुस्तकातील पृष्ठ क्रमांक २०१ आणि ४४३ वरील मजकूर काढून टाकावा, अशी मागणीही करण्यात आली.शिवसेनेचे प्रवक्ते संजय निरुपम यांनी आत्मचरित्रातील मजकुरावर आक्षेप घेतला. केवळ निषेध करून पक्ष थांबणार नसून, महाराष्ट्र सरकारने या पुस्तकावर बंदी घालावी आणि राज्यात त्याची विक्री होऊ देऊ नये, अशी मागणी त्यांनी केली.सावरकरांविषयी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना असलेल्या आदराची आठवण करून देताना निरुपम यांनी काँग्रेसच्या भूमिकेवर टीका केली. सावरकरांविषयी काँग्रेसच्या मनात द्वेष असल्याचा आरोपही त्यांनी केला. यावेळी त्यांनी मणिशंकर अय्यर यांच्या सावरकरांविषयीच्या वक्तव्यांनंतर बाळासाहेब ठाकरे यांनी केलेल्या निषेधाचा संदर्भ दिला. सोनिया



गांधी यांच्या आत्मचरित्रातील एका परिच्छेदात सावरकरांनी ब्रिटिश सरकारकडे दयेचे अर्ज केले होते, असा उल्लेख आहे.

शायना एनसींनी फाडला बाळासाहेबांचा फोटो

शिवसेना नेत्यांसह काँग्रेसनेही सत्ताधा-यांना घेरले

मुंबई /प्रतिनिधी- काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्यावर आधारित 'बिलॉन्गिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' या पुस्तकात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांचा अवमानजनक उल्लेख करण्यात आल्याचा आरोप करत शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) नेत्यांनी पत्रकार परिषदेत सोनिया गांधींचे पुस्तक फाडताना शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचाच फोटो फाडल्याचे निदर्शनास आले. यावरून आता विरोधकांनी शिंदेसेनेला घेरले असून बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांची शिवसेना म्हणणा-यांनी त्यांचाच फोटो फाडावा हे निषेधार्ह असल्याची टीका काँग्रेसने केली आहे. काल बाळासाहेबांचा स्मृतीदिन साजरा केला आणि आज तुम्ही त्यांचा फोटो फाडत आहात, याचे भान सुद्धा तुम्हाला नाही. हा निर्लज्जपणाचा कळस आहे, अशी टीका काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

शिवसेनेच्या प्रवक्त्यांनी फोटो फाडताना शायना एनसी यांनी बाळासाहेब ठाकरेंचा एक फोटो फाडला. या फोटोमध्ये बाळासाहेब ठाकरे हे मणिशंकर अय्यर यांच्या सोबत आहेत. यावेळी, चूक लक्षात येताच शायना एनसी यांनी तो फोटो खाली ठेवत दुसरा फोटो घेतला. त्यानंतर याबाबत स्पष्टीकरण देताना शायना एनसी म्हणाल्या की, 'मी बाळासाहेब ठाकरेंचा नव्हे तर मणिशंकर अय्यर यांचा फोटो फाडला. काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. कोण शायना एनसी? सावरकरांबद्दल त्यांना काय माहीत आहे? इतिहासतज्ज्ञ कधीपासून झाल्या? कोणीतरी थोडीफार माहिती असणारा व्यक्ती असला पाहिजे. सावरकरांच्या नातवाने जे मान्य केले, त्या पलीकडे काय सांगणार? न्यायालयात शिक्कामोर्तब झाले असून शिंदे गटाची कुठली विचारधारा माहिती नाही. त्यांची विचारधारा खोक्यापासून सुरू होते, खोक्यावर संपते, असे म्हणत टीका केली आहे.

या घटनेनंतर ठाकरेंची शिवसेना चांगलीच आक्रमक झाली आहे. त्यांनी शिंदेंच्या शिवसेनेविरोधात जोरदार घोषणाबाजी करत शायना एनसी यांचा निषेध केला आहे. शिवसेनेतील नगरसेवकांनी माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्या नेतृत्वात शिंदेंच्या शिवसेनेविरोधात घोषणाबाजी केली. बाळासाहेब ठाकरेंचा फोटो फाडणारी ही कोणत्याही एका पक्षात स्थिर राहत नाही. शिंदेंच्या गटात जेवढ्या महिला गेल्या त्या सगळ्या कोणाचाही अपमान करत आहेत' असे म्हणत टीका केली आहे.

दिल्लीतील बापाने यांना स्क्रिप्ट पाठवली : सुषमा अंधारे

पुढे बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या, दिल्लीतील बापाने यांना स्क्रिप्ट पाठवली आणि यांच्या नेत्याने आपल्या ब्रिगेडसमोर ती ठेवली. चला भुंकायला सुरुवात करा. आपल्या बापाकडून स्क्रिप्ट आलीय. नाहीतर आपले पक्ष चिन्ह जाईल, असे फर्मान या ब्रिगेडला बजावण्यात आले. पण भुंकताना यांना कळाले नाही, त्यांच्या लक्षात आले नाही, ज्या बाळासाहेबांमुळे यांची औकात तयार झाली, गल्ली-बोळात वावरणा-यांना 'वर्षा' आणि 'सह्याद्री'वर वावरण्याची पत वाढली. त्या बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडत आहोत, एवढे भान नसेल तर कठीण आहे. एनसी बाई एखादे पद मिळवण्यासाठी कोणत्या लेव्हलला जाऊ शकतात, किती गलिच्छ राजकारण करू शकतात हे दिसून येते, असे म्हणत शायना यांच्यावर अंधारे यांनी टीका केली.

दहशतवादी लतीफ भट एनकाउंटरमध्ये ठार!

मशिदीत लपला होता कुलगाम हल्ल्याचा मास्टरमाइंड

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- जम्मू-कश्मीरमधील कुलगाम येथे सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत लष्कर-ए-तैयबाचा कुख्यात कमांडर लतीफ भट मारला गेला. तो येथे एका मशिदीत लपून बसला होता. त्याला सुरक्षा दलांनी अनेक वेळा आत्मसमर्पण करण्यासाठी संधी दिली. मात्र त्याने आत्मसमर्पनाला नकार दिला होता. यानंतर, सुरक्षा दलाने त्याला बाहेर काढण्यासाठी अश्रुधुराचे गोळे सोडले. यानंतर, तो मशिदीतून बाहेर येताच त्याला गोळ्या घालून कंठस्नान घालण्यात आले. कुलगामचे एसएसपी अनायत अली यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी स्वतः लतीफ भटसोबत व्हिडिओ कॉलवर बोलून त्याला सरेंडर करण्याचे आवाहन केले होते. आत्मसमर्पण केल्यास त्याच्या जीवाला कुठलीही इजा पोहोचणार नाही, असा विश्वासही त्याला देण्यात आला होता. मात्र, लतीफने ही ऑफर नाकारली. यावेळी "माझ्यासोबत अल्लाहशिवाय कोणी नाही," असे त्याने म्हटले होते. लतीफ रात्रीच्या वेळी सुमारे २:४५ वाजता मशिदीत शिरला होता. यानंतर त्याने गोळीबार सुरू केला. धार्मिक



स्थळाचे नुकसान होऊ नये म्हणून सुरक्षा दलांनी सावधगिरी बाळगली आणि मशिदीच्या आत कुठलीही कारवाई केली नाही. त्याला बाहेर काढण्यासाठी केवळ अश्रूधुराचे गोळे सोडण्यात आले होते. यानंतर बाहेर येताच त्याला ठार करण्यात आले. लतीफ भट १८ नोव्हेंबर २०२५ रोजी लष्कर-ए-तैयबाशी जोडला गेला होता. त्याला पाकिस्तानातून भारतातील शांतता आणि पर्यटनाला बाधा पोहोचवण्याचे निर्देश मिळत होते. मारला गेलेला दहशतवादी लतीफ भट हा कुलगाम दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड होता. या हल्ल्याच्या बरोबर एक दिवस आधी, १० नोव्हेंबर २०२६ रोजी, लतीफ भट आणि त्याचा साथीदार उमर निसार डार यांनी मीर बाजार, अखुरान, हबलिश आणि किलम या संवेदनशील भागांची रेकी केली होती. ही संपूर्ण थरारक हलचाल सीसीटीव्ही कॅमेऱ्यातही कैद झाली होती. या रेकीच्या दुसऱ्याच दिवशी, म्हणजेच ११ नोव्हेंबर रोजी दोन्ही दहशतवाद्यांनी अखुरान येथील सीआरपीएफ नाक्यावर अचानक अंदाधुंद गोळीबार करत हल्ला केला होता. यानंतर, ते पसार झाले होते.

दादर रेल्वे स्थानकाचे नाव 'चैत्यभूमी' होणार

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईतील चैत्यभूमी येथे येणाऱ्या अनुयायांसाठी विविध सुविधा, सुरक्षा, वाहतूक, आरोग्य आणि स्वच्छतेच्या व्यवस्थांचे काटेकोर व समन्वित नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच दादर रेल्वे स्थानकाला 'चैत्यभूमी' हे नाव देण्यास राज्य शासनाने यापूर्वीच तत्वतः मान्यता दिली असून, केंद्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शनानुसार विधानमंडळाच्या समितीशी संबंधित आवश्यक प्रक्रियेची पूर्तता विधीमंडळ अधिवेशनात करून नामकरणाची कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथील तयारीचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत बुधवारी आढावा घेण्यात आला. आयोजित बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, माधुरी मिसाळ, योगेश कदम उपस्थित होते.

देशातील तरुणाईला वाचवावं लागेल

कॅबिनेटमध्ये PM मोदी झाले भावूक

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- गेल्या काही काळापासून देशात व्यसनाधीनतेची समस्या गंभीर बनली आहे. दरम्या, बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील वाढत्या व्यसनाधीनतेच्या समस्येबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. यावेळी तरुणांना लागलेल्या व्यसनांचा उल्लेख करत पंतप्रधान नरेंद्र मोदी भावूक झाले. देशातील तरुणाईला कोणत्याही परिस्थितीत नशेच्या विळख्यापासून वाचवावे लागेल, असे मोदींनी सांगितले. यावेळी नक्षलवादाविरोधात मिळालेल्या यशाचं उदाहरण देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यांनी व्यवसनाधीनतेच्या समस्येला मुळापासून संपवण्याचं आवाहन केलं.

आज राजधानी नवी दिल्लीमधील भारत मंडपम येथे बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक झाली. आसियान शिखर संमेलनात सहभागी होऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी रात्री दिल्लीत परतले होते. त्यानंतर आज सकाळी



१०.३० वाजता कॅबिनेटच्या बैठकीचं अध्यक्षपद भूषवलं. यावेळी सुमारे तीन तास चाललेल्या या बैठकीत नशेची वाढती समस्या, गरिबी निर्मुलन, नक्षलवाद, वित्तीय सशक्तीकरण आणि प्रशासकीय सुधारणांसह अनेक महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा झाली.

या बैठकीबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बैठकीत देशातील तरुणांवर व्यसनांच्या वाढत असलेल्या प्रभावाबाबत चर्चा करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी भावूक झाले. त्यांनी देशातील तरुणाईला नशेच्या विळख्यात जाण्यापासून कुठल्याही परिस्थितीत रोखलं गेलं पाहिजे, असे सांगितले. यावेळी देशातून जवळपास संपुष्टात आलेल्या नक्षलवादाचं उदाहरण देत मोदींनी जर नक्षलवाद संपुष्टात आणता येत असेल, तर नशेची समस्यासुद्धा मुळापासून नष्ट करता येऊ शकते, असा विश्वासही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.याबरोबरच नक्षलवादाविरोधात मिळालेलं यश टिकवणंही आवश्यक आहे, असा खबरदारीचा सल्ला मंत्री आणि अधिकाऱ्यांना दिला. नक्षलवाद पुन्हा डोकं वर काढणारा नाही, यासाठी विशेष खबरदारी घेण्याची गरज आहे, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

सैन्याच्या ताफ्याची गाडी नदीत कोसळली; अपघातात कॅप्टन शहीद, ३ जवान गंभीर

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- मणिपूरमधील इम्फाल पूर्व जिल्ह्यात सैन्याच्या ताफ्यासोबत एक दुर्दैवी आणि मोठा अपघात घडला आहे. ८ व्या बिहार रेजिमेंटच्या जवानांना घेऊन जाणारे लष्कराचे वाहन अनियंत्रित होऊन थेट इताम नदीत कोसळले. बुधवार दुपारी झालेल्या या दुर्घटनेत सैन्याच्या एका तरुण कॅप्टनचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, तीन इतर जवान गंभीर जखमी झाले आहेत. सर्व जखमी जवानांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा अपघात बुधवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास इम्फाल पूर्व जिल्ह्यातील लामलाई चाल्लौ भागात घडला. ८ व्या बिहार रेजिमेंटचे जवान लष्कराच्या वाहनाने प्रवास करत होते, यादरम्यान हे वाहन अचानक अनियंत्रित झाले आणि रस्त्याशेजारील इताम नदीत जावून पडले. अपघात इतका भीषण होता की, लष्कराचे वाहन काही वेळातच नदीच्या पाण्यात बुडाले होते. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली. अपघाताची माहिती मिळताच तात्काळ लष्कर आणि स्थानिक प्रशासनाने युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले. अथक प्रयत्नांनंतर वाहनातील सर्व जवानांना बाहेर काढण्यात आले आणि उपचारासाठी बाबिना रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, दुर्दैवाने रुग्णालयात पोहोचताच डॉक्टरांनी कॅप्टन हनुमान राम (२९) यांना मृत घोषित केले.



विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन दोन आठवड्यांचेच

गरज भासल्यास मुदतवाढीचा निर्णय घेणार; उपसभापती सचिन अहिर

मुंबई /प्रतिनिधी : आगामी विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सध्या दोन आठवड्यांचेच ठेवण्याचा निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. मात्र, कामाकाजाची व्याप्ती आणि गरज झाल्यास अधिवेशनाची मुदत वाढवण्याबाबत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, सभापती आणि विरोधी पक्षनेते एकत्र बसून योग्य वेळी निर्णय घेतील, अशी माहिती विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी दिली. उपसभापती सचिन अहिर यांनी अधिवेशनाच्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की, 'सल्लागार समितीची बैठक पार पडली आहे. दोन आठवड्यांचे अधिवेशन पुरेसे नाही, अशी भूमिका विरोधकांनी मांडली असून तीन आठवड्यांचे



अधिवेशन घेण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. मात्र, सद्यस्थितीत सभागृहासमोर १० ते १२ विधेयके, अंतिम आठवडा प्रस्ताव आणि शासनाचे काही प्रस्ताव आहेत. या सर्व कामकाजावर चर्चा करण्यासाठी तूर्तास दोन आठवड्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.'

१७ तारखेला पुन्हा बैठक; मुदतवाढीचा पर्याय खुला

सचिन अहिर म्हणाले की, '१८ तारखेपूर्वी १७ तारखेला पुन्हा एकदा कामकाज सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर साधक-बाधक चर्चा होणे गरजेचे आहे आणि आमदारांना पुन्हा आपापल्या मतदारसंघातही जायचे आहे, हा विचारही चर्चेत आला. त्यामुळे आवश्यकता भासल्यास अधिवेशनाची मुदत वाढवायची की नाही, याचा निर्णय मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, सभापती आणि विरोधी पक्ष मिळून योग्य वेळी घेतील.' तसेच, सभागृहात मांडल्या जाणाऱ्या प्रस्तावांवर केवळ चर्चा न होता, त्यावर तातडीने 'फॉलो-अप' बैठका अधिवेशन काळातच कशा घेता येतील आणि प्रत्येक प्रस्तावाला न्याय कसा मिळेल, यावरही सकारात्मक चर्चा झाल्याचे त्यांनी नमूद केले. कामकाज सल्लागार समितीतील चर्चेची गोपनीयता सर्वांनीच जपली पाहिजे, असेही ते म्हणाले.'ठाकरे सेनेने नेमक्या कोणत्या विषयावर आक्रमक व्हायला हवे, ते सोडून दुसऱ्याच विषयावर आक्रमकता दाखवण्याचा प्रयत्न सुरू आहे. सोनिया गांधी यांच्या पुस्तकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल जो मजकूर लिहिला आहे, ती भूमिका ठाकरे गटाला मान्य आहे की नाही, हे त्यांनी जनतेसमोर स्पष्ट करावे. राहुल गांधींनी बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादनाचे ट्वीट केले नाही, तसेच काँग्रेसचा एकही वरिष्ठ नेता स्मृतीस्थळावर उपस्थित राहिला नाही, यातूनच काँग्रेसची बदलती भूमिका स्पष्ट होते, असेही अहिर म्हणाले.

६० लाखांच्या आर्थिक व्यवहारातूनच एअर होस्टेस वर्षा तुरकर यांची हत्या

गोंदिया : पुणे येथे इंडिगो एअरलाईन्समध्ये कार्यरत असलेल्या एअर होस्टेस वर्षा तुरकर (३५) यांच्या निर्घृण हत्येमागे ६० लाख रुपयांच्या आर्थिक व्यवहाराचा वाद असल्याचा खळबळजनक आरोप त्यांच्या आईने केला आहे. या आरोपामुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, दवनीवाडा पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची चक्रे वेगाने फिरविली आहेत. आर्थिक व्यवहारातून निर्माण झालेला वादच हत्येचे कारण असावा, असा संशय त्यांच्या आईने व्यक्त केला आहे. वर्षा ७ नोव्हेंबर रोजी माहेरी आल्या होत्या. गावाकडे येण्यापूर्वी त्यांनी पैशांच्या व्यवहारासंदर्भात आईशी चर्चा केली होती. मात्र, त्या वेळी आईने या व्यवहाराबाबत सविस्तर माहिती घेतली नव्हती. त्यानंतर ८ नोव्हेंबर रोजी गोंदियातील कौटुंबिक परिचित नितेश अग्रवाल याच्यासोबत त्या निघून गेल्या. आर्थिक व्यवहारावरून दोघांमध्ये वाद झाला असावा आणि त्यातूनच त्यांची हत्या करण्यात आली असावी, अशी शक्यता त्यांच्या आईने व्यक्त केली आहे.वैनगंगा नदीकाठच्या जंगल परिसरात वर्षा यांच्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले. उत्तरीय तपासणी अहवालातून त्यांची चाकूने भोसकून हत्या करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. घटनाक्रम, संशयितांचे जबाब आणि आर्थिक व्यवहारांची पार्श्वभूमी या सर्व बाबींचा तपास केला जात आहे. वर्षा यांच्या अंगावरील दागिने सुरक्षित असणे आणि त्यांच्यासोबत असलेल्या व्यक्तीला कोणतीही दुखापत न होणे, यामुळे हत्येमागील कारणाबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणाच्या तपासासाठी पाच पोलिस पथके विविध ठिकाणी रवाना करण्यात आली आहेत. दोन ते तीन दिवसांत तपासाला ठोस दिशा मिळेल, असा विश्वास स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे यांनी व्यक्त केला.

गुणवत्तेच्या शिखरावर अकोल्याचे कृषी विद्यापीठ;

राष्ट्रीय मंडळाकडून 'अ' श्रेणीचा बहुमान!

अकोला//प्रतिनिधी : कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्ताराच्या कार्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने राष्ट्रीय स्तरावर मोठी झेप घेतली. भारतीय कृषी अनुसंधान परिषद (भाकृअप), नवी दिल्लीच्या राष्ट्रीय कृषी शिक्षण अधिस्वीकृती मंडळाने विद्यापीठाला प्रतिष्ठेची 'अ' श्रेणी (ग्रेड ए) प्रदान केली आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन कार्य, बीजोत्पादन आणि कृषी विस्तार सेवांच्या कामगिरीवर राष्ट्रीय स्तरावर मान्यतेची मोहोर उमटली.

राष्ट्रीय कृषी शिक्षण अधिस्वीकृती मंडळाच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय–भाकृअपच्या राष्ट्रीय कृषी शिक्षण अधिस्वीकृती मंडळाच्या ४४ व्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. ही अधिस्वीकृती २९ मार्च २०२४



ते २८ मार्च २०२९ अशा पाच वर्षांच्या कालावधीसाठी लागू राहणार आहे. भाकृअपचे उपसचिव (कृषी शिक्षण) राजेश कुमार झा यांनी यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. विद्यापीठांतर्गत विविध महाविद्यालये आणि संस्थांमधील अधिसूचनेत नमूद अभ्यासक्रमांनाही या मान्यतेचा लाभ मिळणार आहे. यामध्ये अकोला येथील पदव्युत्तर शिक्षण संस्था, कृषी महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय तसेच नागपूर आणि सोनापूर (गडचिरोली) येथील कृषी महाविद्यालयांमधील नमूद अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

'शाश्वत शेती आणि संपन्न शेतकरी' संकल्पना- विद्यापीठाने कृषी शिक्षणाचे आधुनिकीकरण, संशोधनाचा विस्तार, दर्जेदार बियाण्यांची उपलब्धता आणि कृषी विस्तार प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान पोहोचविण्यावर विशेष भर दिला. अत्यल्प मनुष्यबळ असतानाही विद्यापीठातील अधिकारी, प्राध्यापक, संशोधक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या सामूहिक प्रयत्नांना या मानांकनाच्या रूपाने मोठे यश मिळाले. 'शाश्वत शेती आणि संपन्न शेतकरी' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्याच्या विद्यापीठाच्या प्रयत्नांना या राष्ट्रीय मानांकनामुळे अधिक बळ मिळणार आहे.



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अमरावतीत काँग्रेसचे संघटन मंथन

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांकडून पाच जिल्ह्यांच्या कामकाजाचा आढावा

मंडळ, बुथ कमिटी व तालुकास्तरावर पक्ष संघटन मजबूत करण्याच्या सूचना

अमरावती/प्रतिनिधीः-

आगामी काळातील राजकीय आव्हाने लक्षात घेता काँग्रेस पक्षाचे संघटन तळागाळापर्यंत मजबूत करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने संघटनात्मक हालचालींना वेग दिला आहे. याच पार्श्वभूमीवर बुधवारी १८ नोव्हेंबर रोजी अमरावती येथील काँग्रेस भवनात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यावेळी महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी डॉ.श्रीवेल्ला प्रसाद यांची प्रमुख उपस्थिती होती.



या बैठकीत अमरावती विभागातील लोकसभा प्रभारी, जिल्हा प्रभारी, शहर व ग्रामीण जिल्हाध्यक्ष तसेच प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यातील पक्ष संघटनेची सद्यस्थिती, मंडळ , बुथ व तालुकास्तरावरील संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांचा सहभाग आणि पक्षाच्या आगामी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जिल्हाध्यक्षांना मार्गदर्शन करताना मंडळ व तालुकास्तरावर पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या. केवळ जिल्हास्तरापुरते संघटन मर्यादित न ठेवता गावपातळीपर्यंत पक्षाची विचारधारा आणि कार्यक्रम पोहोचविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. संघटनात्मक जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडण्यासोबतच कार्यकर्त्यांना सक्रिय करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

बैठकीला अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू देशमुख, माजी मंत्री यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, शहराध्यक्ष बबलु शेखावत, अभिजित सपकाळ,माजी आमदार वीरेंद्र जगताप,माजी आमदार राहुल बोंद्रे, दिलीपराव एडतकर,माजी महापौर मिलिंद चिमोटे, माजी महापौर विलासराव इंगोले,जिया पटेल, यांच्यासह विभागातील विविध जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष, लोकसभा व जिल्हा प्रभारी आणि काँग्रेसचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

कोणार्कच्या चौकशीसाठी समिती गठित

-आमदार धीरज लिंगाडे यांनी उपस्थित केला होता मुद्दा

अमरावती/प्रतिनिधीः-

प्रशासक राजमध्ये शहराच्या स्वच्छतेचे कंत्राट ६ वर्षांसाठी कोणार्क कंपनीला देण्यात आले होते. कंपनीने नियम, अटी आणि करारनाम्याचे उल्लंघन केले. यामुळे स्वच्छता व्यवस्था कोलमडली. यावरून काँग्रेस आमदार धीरज लिंगाडे यांनी विधान परिषदेत मुद्दा उपस्थित केला होता. त्याच्या आधारे आता चौकशी समिती गठित करण्यात आली आहे. ही समिती आपला अहवाल विभागीय महसूल आयुक्तांना सादर करणार आहे. विधान परिषदेत आमदार धीरज लिंगाडे यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. मंत्री उदय सामंत यांनी दिलेल्या आश्वासनानंतर कारवाईला सुरुवात झाली आहे. मनपा क्षेत्रातील डोअर टू डोअर सफाई आणि कचरा संकलन कंत्राटावरून आरोपांच्या फैरी झडल्या होत्या. कोणार्क सोबत केलेल्या निविदा आणि करारनाम्याची प्राथमिक चौकशीसाठी ३ सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत सहाय्यक आयुक्त नितीन कापडणीस, ऋषिकेश वाघमारे व अनुप डुरे यांचा समावेश आहे.



ही समिती आपली चौकशी पूर्ण करून लवकरच अहवाल सादर करणार आहे. शहरात गेल्या काही महिन्यांपासून स्वच्छतेचा पुरता बोजवारा उडाला आहे. अनेक भागात कचरा वेळेवर उचलला जात नाही. नाल्या साफ होत नाहीत. डोअर टू डोअर कचरा संकलनाचे वाहन अनेकदा येतच नाही, अशा तक्रारी नागरिकांकडून सातत्याने येत आहेत. करारनाम्यानुसार कंपनीने पुरेसे मनुष्यबळ, वाहने आणि यंत्रसामग्री देणे अपेक्षित होते. मात्र, कंपनीने त्याचे पालन केले नाही, असा आरोप आहे. तरीही कंपनीला बिले दिली जात असल्याचा आरोपही करण्यात आला होता.

समिती गठनावरच प्रश्नचिन्ह-

तत्कालीन मनपा आयुक्तांनी कोणार्क कंपनीसोबत करारनामा केला होता. सध्याचे आयुक्त कोणार्क कंपनीला वाचवण्यासाठी सुप्रीम कोर्टात गेले होते. अशात सहाय्यक आयुक्तांकडे चौकशी सोपवण्यात आल्याने समिती गठनावरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याने केलेल्या करारनाम्याची निष्पक्ष चौकशी होणार का, यावरच मोठा प्रश्न उपस्थित केला जात आहे. समितीतील अधिकारी हे मनपाचेच असल्याने ते आपल्याच विभागाच्या विरोधात अहवाल देणार का, अशी शंका नागरिक आणि विरोधकांकडून व्यक्त केली जात आहे. समिती आता कंत्राटाच्या कागदपत्रांची, निविदा प्रक्रियेची, कामाच्या अटींची आणि प्रत्यक्ष झालेल्या कामाची पडताळणी करणार आहे. कंपनीने नियमांचे उल्लंघन केले आहे का, याची तपासणी केली जाणार आहे.अहवाल विभागीय महसूल आयुक्तांना सादर झाल्यानंतर पुढील कारवाईचा निर्णय होणार आहे. जर आरोप सिद्ध झाले तर कंपनीवर दंडात्मक कारवाई किंवा कंत्राट रद्द करण्याचीही शिफारस होऊ शकते, अशी चर्चा आहे.

महापालिकेत नोकरी लावून देण्याचे आमिष, ७ लाखांनी फसवणूक

पत्नीच्या मृत्यूनंतर अनुकंपा तत्त्वावर नौकरीचे आश्वासन

अमरावती/प्रतिनिधीः-

पत्नीच्या मृत्यूनंतर अनुकंपा तत्त्वावर नोकरी लावून देण्याचे आश्वासन देऊन एका २८ वर्षीय तरुणाकडून ७ लाख रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित तरुणाने पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. ही घटना कोतवाली ठाणे हद्दीत घडली आहे.फसवणूक झालेल्या तरुणाचे नाव श्याम प्रकाश रती आहे. तर आरोपी दाम्पत्याचे नाव औरंगपुरा येथील हिम्मत सुखदेव डेंडुले (वय ४४) आणि कायनात हिम्मत डेंडुले (वय ३०) असे आहे.माहिती नुसार तक्रारदार श्याम प्रकाश रती आणि आरोपी हिम्मत डेंडुले व कायनात डेंडुले हे आपसात नातेवाईक आहे. तक्रारीनुसार श्याम रती आपल्या आई सोबत आरोपींच्या घरी नोकरीच्या संदर्भात भेटायला गेला होता. यावेळी आरोपींनी पत्नीचे निधन झाले आहे, त्यामुळे त्याला अमरावती महानगरपालिकेत नोकरी लावून देता येईल. त्याबदल्यात आरोपींनी ७ लाख रुपयांची मागणी केली.

तक्रारदार आणि त्याच्या आईने ३ फेब्रुवारी २०२५ रोजी आरोपींच्या घरी जाऊन पहिला हप्ता म्हणून २ लाख रुपये दिले. त्यानंतर १७ फेब्रुवारी २०२५ रोजी ४ लाख रुपये तथा २९ मार्च २०२५ रोजी १ लाख ७० हजार रुपये दिले. अशा प्रकारे तक्रारदाराने नोकरी मिळण्याच्या आशेवर एकूण ७ लाख रुपये आरोपींना दिले.

रक्कम घेऊनही आरोपींनी तक्रारदाराला मनपामध्ये नोकरी लावून दिली नाही आणि त्याची रक्कमही परत केली नाही. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, दोन्ही आरोपींनी नोकरी लावण्याचे आमिष दाखवून त्याच्याकडून एकूण ७ लाख रुपये रोख घेऊन फसवणूक केली.

या प्रकरणात तक्रार प्राप्त झाल्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात संबंधित तपास अधिकाऱ्याने प्रकरण नोंदवून तपास सुरू केला आहे.कोतवाली पोलिसांनी आरोपी दाम्पत्याविरुद्ध फसवणूक, विश्वासघात आणि धोखाधडी कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

दुचाकी चोरांच्या टोळीचे धागेदोरे मिळाले; तीन गुन्हे उघड

-एकाला अटक, दुचाकी जप्त

अमरावती/प्रतिनिधीः-

शहरातील दुचाकी चोरीच्या घटनांचा तपास करताना गुन्हे शाखेच्या हाती महत्त्वाचे धागेदोरे लागले आहेत. एका संशयिताला ताब्यात घेऊन चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली असून, या कारवाईत राजापेठ पोलीस ठाण्यातील एका आणि खोलापुरी गेट पोलीस ठाण्यातील दोन अशा एकूण तीन चोरीच्या गुन्ह्यांची उकल झाली आहे. दरम्यान, अन्य दोन गुन्ह्यांमध्ये समोर आलेल्या एका आरोपीचा शोध सुरू आहे.

शहरातील वाहनचोरीच्या घटनांची गंभीर दखल घेत पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी गुन्हे शाखेला तपास अधिक गतिमान करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती तपासणे आणि गोपनीय बातमीदारांकडून मिळणाऱ्या माहितीची पडताळणी करण्यावर पोलिसांनी भर दिला.

१७ नोव्हेंबर रोजी गुन्हे शाखेचे पथक शहरात गस्त घालत असताना मिळालेल्या माहितीवरून अब्दुल अहेफाज अब्दुल अजीज (वय २४, रा. इमाम नगर, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून चोरीची पॅशन प्रो दुचाकी हस्तगत करण्यात आली. या दुचाकीच्या तपासातून राजापेठ पोलीस ठाण्यात दाखल चोरीचा गुन्हा उघड झाला.

१ व १० वरिल उर्वरित

अग्नितांडव : आझादनगरात सिलिंडर

एका घरात शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती. या आगी दरम्यान घरातील सिलेंडर स्फोट झाल्याने आगीने रौद्ररूप धारण केले. पाहता पाहता आग पसरली आणि आगीने आजूबाजूचे तीन घरांसह एका भंगार गोदामाला आपल्या कवेत घेतले. आगीची माहिती मिळताच ५ मिनिटांत अग्निशमन दलाची टीम आझाद नगर मध्ये पोहोचली. एकामागोमाग एक पाण्याच्या वाहनांचा वापर करून आग आटोक्यात आणण्यात आली. भीषण आग लागल्यादरम्यान एक मिनी आणि एक मोठा सिलिंडर फुटला. त्यामुळे आग विझवण्यासाठी खूप कसरत करावी लागली. या आगीत अब्दुल सलाम यांच्या भंगार गोदामाचे सर्वाधिक नुकसान झाले. दिवाळीवर गोळा केलेली रद्दी, प्लास्टिक, पुठ्ठे व इतर भंगार साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

या आगीत अहतुल शाह दंगेश शाह, अकबर शाह इब्राहिम शाह, शेख सलिम, फातेमा बी हमीदुल्ला शाह यांची घरे पूर्णपणे जळून खाक झाली. टिनाच्या घरांमधील संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले. अकबर शाह यांच्या घरी मुलीचे लग्न असल्याने गोळा केलेले साहित्य होते. या आगीत फ्रिज, सोन्याचे दागिने, कपडे-लत्ते, किराणा, बिछाना आगीत जळून खाक झाले. सिलिंडर भंगार गोदामातील एक व दुसरा फातेमा बी यांच्या घरातील मिनी सिलिंडरचा आगीत स्फोट झाला. सिलिंडरचे तुकडे उडाले, मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.गाडगे नगर पोलिसांची टीमही घटनास्थळी पोहोचली होती. आगीत घरे व गोदाम मिळून सुमारे १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

९ वाहनांनी विझविली आग- आगीची माहिती मिळताच परिसरातील अनेक लोक आग विझवण्यासाठी पुढे आले.महानगरपालिका अग्निशमन विभागाच्या ९ वाहनांनी आगीवर नियंत्रण आणले.आग विजवण्यासाठी केंद्रप्रमुख मोहसीन इकबाल, सुरज कपले, शोएबुद्दीन, सलीम, इमरान, लोणारे, नाहील अहमद, सय्यद सलीम, नावेद, शिरभाते यांच्यासह फिरोज शाह उर्फ भूया, सैय्यद साबिर, असलम सलाट, सादिक शाह, राजा शाह यांनीही सहकार्य केले.

कुटुंबे उघड्यावर- आगीत घरे जळाल्याने ४ कुटुंबे उघड्यावर आली आहेत. ऐन थंडीत त्यांचे संसारोपयोगी साहित्य, कपडे, अंथरूण-पांघरूण जळून गेल्याने त्यांच्यासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने मदत करण्याची मागणी केली आहे. पंचनामा झाल्यानंतर शासनाकडून नुकसान भरपाई मिळण्याची अपेक्षा पीडितांनी व्यक्त केली आहे.

बाळ विक्री प्रकरणाचे धागेदोरे

करण्यात आली आहे. न्यायालयाने सुरुवातीला दिलेली पोलीस कोठडी संपल्यानंतर त्यांना पुन्हा हजर करण्यात आले. त्यानंतर दोघांची पोलीस कोठडी २० नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली.

पोलीस कोठडीत करण्यात आलेल्या चौकशीदरम्यान डॉ. वैशाली भोजने यांनी सहा बालकांची देवाण-घेवाण झाल्याची माहिती दिल्याचे तपास यंत्रणेकडून सांगण्यात आले. यापूर्वी १९ ऑक्टोबर रोजी एका बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले होते. बुधवारी वर्धा जिल्ह्यातून आणखी एका बालकाला ताब्यात घेण्यात आल्याने या प्रकरणातील बालकांच्या शोधाला महत्त्वाची दिशा मिळाली. या प्रकरणात घरोघरी, क्लिनिक आणि रुग्णालयांमध्ये जाऊन रक्ताचे नमुने गोळा करणाऱ्या निर्मल हिम्मतराव सरदार (वय ५०, रा. मंगलधाम, अमरावती) याला १७ नोव्हेंबर रोजी अटक करण्यात आली. न्यायालयाने त्याला २१ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. रक्ताचे नमुने गोळा करण्यामागील उद्देश आणि कथित देवाण-घेवाणीतील त्याची भूमिका तपासली जात आहे. आतापर्यंत डॉ. वैशाली भोजने, प्रफुल्ल भोजने, डॉ. मयूर धांडगे, निर्मल सरदार यांना अटक करण्यात आली आहे. तर एक अल्पवयीन मुलगा ताब्यात घेण्यात आला आहे. या प्रकरणातील आर्थिक व्यवहार, संबंधित पालकांची भूमिका आणि उर्वरित बालकांचा शोध या बाबींवर पोलिसांचा तपास केंद्रित आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त शाम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त नयन आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेजरपुरा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सोनिया गांधींच्या पुस्तकाची

सोनिया गांधींच्या पुस्तकावरून धामणगाव रेल्वेत राजकीय भडका उडाला.सोनिया गांधींच्या पुस्तकाची पाने फाडल्याने काँग्रेस नेते व कार्यकर्त्यांनी आक्रमक होत शिवसेनेच्या प्रवक्त्या शायना एनसी यांचा पुतळा जाळला.

यावेळी माजी मंत्री यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री सुनील देशमुख, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल येवले, कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे, प्रदेश महासचिव परीक्षित जगताप, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष पंकज वानखडे, नवीन कनोजिया, प्रदीप मुंदडा, मोहन पाटील उसळीकर, मयूर डुबे, आशिष शिंदे, शुभम भोंगे,आकाश झेले, तुषार कोकाटे, अविन इंगळे, विजय निमकर, डॉ विनोद देशमुख, दिवाकर ठाकरे, धनंजय शेलोकार, विठ्ठल सपाटे, मुकेश राठी, दिनकरराव जगताप, सुनील भोगे, संजय निमकर, विपिन ठाकरे, भाऊराव बमनोटे, संदीप दावेदार, डॉ रोंघे, प्रशांत सबाने, ऋषी जगताप, समीर पाटील, शुभम तरोने, राहुल ठाकरे, संजय शेंडे, नंदकुमार मानकर, मुकिंद माहुरे, मंगेश बोबडे, हेमंत कडू, प्रफुल कडू, उमेश झिबळ, सचिन समोसे, अविनाश मांडवगणे, राजाभाऊ भोगे, निवृत्ती वैद्य, विशाल डुबे, वैभव पावडे, विलास डुकरे, विनीत टाले, दर्शन भोगे, चंदा निस्ताने, मेघा सबाने, शैलेश निस्ताने, संदीप भोगे, निखिल देशमुख, दिवेश बोरकर, अथर्व पडसापुरे, भूषण राऊत, अक्षय कोरडे, धीरज गावंडे, रुपेश गुल्हाने, विशाल रोकडे, छोटू शिसोदे यांच्यासह युवक काँग्रेसचे व कांग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंजनगाव सुर्जी येथील क्रीडा

सातत्याने पाठपुरावा केला होता. त्याच पाठपुराव्याला यश येत असल्याचे या बैठकीतून दिसून आले.

या बैठकीला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार गजानन लवटे, महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे सचिव डॉ.परिमल सिंह यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. अमरावती शहरालगत असलेली महसूल विभागाची जागा कृषी विभागाला देण्यात यावी, याबाबत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासोबत फोनवरून चर्चा करण्यात आली. तर अंजनगाव सुर्जी शहरालगत असलेली कृषी विभागाची जागा क्रीडा संकुलासाठी देण्यात यावी, यासाठी कायदेशीर बाबी तपासून पुढील बैठक बोलावण्यात येणार असल्याचे नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी सांगितले.

या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून क्रीडा संकुलाच्या जागेचा प्रश्न लवकरच सुटणार असल्याचा विश्वास नगराध्यक्ष गायगोले यांनी व्यक्त केला. हा तिढा अनेक वर्षांपासून कायम आहे. मात्र क्रीडा संकुलाच्या जागेसाठी प्रयत्न सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

अंजनगाव सुर्जी शहरात क्रीडा संकुल व्हावे, ही येथील खेळाडू, विद्यार्थी आणि क्रीडाप्रेमी नागरिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. क्रीडा संकुल झाल्यास तालुक्यातील ग्रामीण भागातील खेळाडूंना सरावासाठी, स्पर्धांसाठी हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे. त्यामुळे या बैठकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले होते.

दिवाळीत मनमानी भाडे आकारणाऱ्या

काळात खासगी प्रवासी बसेसना एसटी बसच्या भाडेदरापेक्षा ५० टक्के जास्त दराने भाडे आकारणी करण्याची मुभा आहे. मात्र, त्याहून अधिक दराने भाडे आकारल्यास प्रवाशांनी संबंधित प्रशासनाकडे तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बस ऑपरेटरने मनमानी भाडे आकारल्यास प्रवाशांनी rto.27-mh@mah.gov.in - mh27@mahatranscom.in या ईमेल आयडीवर तक्रार नोंदवावी. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून यापुढेही अशा प्रकारची कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी कळविले आहे.

मतदारयाद्यांच्या विशेष सखोल

दि. १८ डिसेंबरपर्यंत होती. त्यानंतर गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन हे दि. १८ ते ३० नोव्हेंबरपर्यंत केले जाणार आहे. ही गणना प्रपत्रे निकाली काढण्यासाठी दि. १० डिसेंबर २०२६ पर्यंत मुदत आहे.

सुधारीत वेळापत्रकानुसार गणना प्रपत्रबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. यात नोटीस टप्पा, दावे व हरकतींचा निपटारा दि. ३१ ऑगस्टपासून सुरू झाला असून दि. १५ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. तसेच अंतिम मतदारयादीचे प्रकाशन दि. २२ डिसेंबर रोजी केले जाणार आहे. जिल्ह्यातील ३६-धामणगाव रेल्वे, ३७-बडनेरा, ३८-अमरावती, ३९-तिवसा, ४०-दर्यापूर, ४१-मेळघाट, ४२-अचलपूर आणि ४३-मोर्शी या आठही विधानसभा मतदारसंघांतील ज्या खऱ्या मतदारांची नावे काही कारणास्तव अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार वर्गवारीत गेली आहेत किंवा ज्यांचे गणनापत्रक भरले गेले नाहीत, अशा सर्व पात्र नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन प्रपत्र भरून द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी केले आहे.

विदर्भ कुस्तीगीर संघाच्या उपाध्यक्ष

अभय माथने यांची नेमणूक झाली .यावेळी विदर्भ कुस्ती संघाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते .ही बैठक नागपूर येथील हॉटेल सेंटर पॉइंट येथे घेण्यात आली. येथेच महाराष्ट्राच्या होणाऱ्या मानाच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची पत्रकार परिषद सुद्धा संपन्न झाली .यावर्षीची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा ही नागपूर येथे होणार आहे.अचलपूर सह परतवाडा येथे अनेक कुस्ती स्पर्धेचे आयोजन विदर्भ कुस्तीगीर संघाचे नवनियुक्त उपाध्यक्ष अभय माथने यांनी केले आहे .यामुळे त्यांना ही मोठी जबाबदारी दिल्याने कुस्ती पटूनी आनंद व्यक्त केला. विदर्भ कुस्तीगीर संघाचे नवनियुक्त उपाध्यक्ष अभय माथने यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून जागोजागी त्यांचे स्वागत व सत्कार होत आहे .यावेळी मंचावर उपस्थितीत मान्यवरांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या आहे .

बालहक्क सप्ताह, बालविवाह

संरक्षण समितीच्या विशेष बैठकांचे आयोजन केले जाईल. महिला बचत गटांच्या माध्यमातून गावोगावी बालविवाह निर्मूलनाबाबत बैठका घेऊन कायदेशीर तरतुदींची माहिती दिली जाईल व महिलांची प्रतिज्ञा घेतली जाईल. बालविवाहाची माहिती मिळताच तात्काळ कायदेशीर प्रतिबंधात्मक कारवाई करणे, बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि पोक्सो कायद्याबाबत जनजागृती करणे, तसेच 'चाइल्ड हेल्पलाईन १०९८' चा प्रचार करण्यावर भर दिला जाणार आहे.

या कालावधीत दि. १९ ते २१ नोव्हेंबर दरम्यान पोलीस ठाणे स्तरावर बैठका, शाळा-आरोग्य सत्रे, गावात दवंडी व ग्रामपंचायत बैठका घेतल्या जाणार आहे. दि. २३ ते २६ नोव्हेंबर दरम्यान किशोरी सभा, ग्राम बाल संरक्षण समिती बैठक, शाळांमध्ये रॅली व कायदेविषयक जनजागृती केली जाईल. २७ नोव्हेंबर रोजी बालविवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त विशेष कार्यक्रम, सामूहिक प्रतिज्ञा आणि समुदाय सहभागातून जनजागृती केली जाईल. दि. ३० नोव्हेंबर रोजी अभियानाचा समारोप केला जाणार आहे. सर्व यंत्रणांनी प्रभावी नियोजन करून अभियान राबवावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले आहे.

प्राणघातक हल्ला प्रकरणी आज

गुन्हे दाखल करून फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी सहा पथके विविध ठिकाणी रवाना केल्याची माहिती मोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांनी दिली.

नगरपालिकेच्या टेरेसवर १३ नोव्हेंबर रोजी झालेल्या ओल्या पार्टीची चित्रफीत काढणाऱ्या रमाकांत गावंडे यांना मारहाण केल्याचे निषेधार्थ सर्वपक्षीय मोर्शी बंदचे गुरुवारला आयोजन करण्यात आले आहे.

काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्याला

मध्ये अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंतराव वानखडे, माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर, माजी मंत्री मा. डॉ. सुनील देशमुख, अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अनिरुद्ध उर्फ बबलू देशमुख तसेच धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्यासह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या पावनभूमीत सर्व धर्म सम भाव, काँग्रेस पक्षाचे विचार आम्ही पुढे नेऊ आणि त्या विचारांमध्ये पक्ष प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करतो असे प्रतिपादन केले. तसेच प्रभारी डॉ प्रसाद म्हणाले, महाराष्ट्र मध्ये युती सरकार हे ६० टक्के कमिशन खोराचे सरकार असून त्यांनी शेतकरी शेतमजूर यांना पूर्णपणे नेस्तनाभूत केलेले आहे. यांच्या सरकारमध्ये ठेकेदार सुद्धा आत्महत्या करत आहे हे युती सरकार सत्तेतून बाहेर खेचल्याशिवाय महाराष्ट्रातील जनतेला न्याय मिळणार नाही,असे सांगितले.

माजी मंत्री यशोमती ठाकूर मार्गदर्शन मेळाव्याला संबोधित केले. रामदासभाऊ निस्ताने यांना राजकीय व सामाजिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव असून, त्यांच्या प्रवेशामुळे धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाला बळ मिळणार आहे. त्यांच्या सोबत शेकडो कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने भाजपसाठी हा मोठा राजकीय धक्का आहे.

या पक्षप्रवेशामुळे धामणगाव रेल्वे तालुक्यातील राजकीय समीकरणांना नवी दिशा मिळण्याची शक्यता असून, काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. खासदार बळवंतराव वानखडे, माजी मंत्री सुनील देशमुख, माजी आमदार वीरेंद्र जगताप, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष बबलू भाऊ उर्फ अनिरुद्ध देशमुख, राहुल येवले, अनिकेत ढेंगळे,श्रीकांत गावंडे, पंकज वानखडे,समीर दहातोंडे, अमोल होले, परीक्षित जगताप,अनिता मेश्राम, वर्षा देशमुख, सीमा जाधव, कविता गावंडे, मंजुषा राठी, कल्पना लांजेवार, संगीता गाडे, मोहन पाटील घुसळीकर, प्रदीप मुंदडा ,नवीन कनोजिया,अजय तुपसुंदरे, सच्चिदानंद काळे, यशवंत बोरकर,नितीन दगडकर, मयूर डुबे, आशिष शिंदे, अविन इंगळे, विजय निमकर, डॉ विनोद देशमुख, दिवाकर ठाकरे, शुभम भोंगे, धनंजय शेलोकार, विठ्ठला सपाटे, मुकेश राठी, दिनकरराव जगताप, सुनील भोगे, संजय निमकर, बिपिन ठाकरे, भाऊराव बमनोटे, संदीप दावेदार, डॉ रोंघे, प्रशांत सबाने, ऋषी जगताप, समीर पाटील, शुभम तरोणे, राहुल ठाकरे, संजय शेंडे, नंदकुमार मानकर, मुकिंद माहुरे, मंगेश बोबडे, हेमंत कडू, प्रफुल कडू, उमेश झिबळ, सचिन समोसे, अविनाश मांडवगणे, राजाभाऊ भोगे, तुषार कोकाटे, निवृत्ती वैद्य, विलास डुकरे, विनीत टाले, संदीप दावेदार, चंदा निस्ताने, मेघा सबाने, शैलेश निस्ताने, निखिल देशमुख, दिवेश बोरकर, दर्शन भोगे, अक्षय कोरडे, धीरज गावंडे, रुपेश गुल्हाने, विशाल रोकडे, छोटू शिसोदे, असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

नदीपात्रातून वाळूची चोरी; सात

सहा लाख रुपये किमतीचा महिंद्रा ४७५ ट्रॅक्टर, एक लाख रुपये किमतीची ट्रॉली आणि आठ हजार रुपये किमतीची अंदाजे दोन ब्रास वाळू असा एकूण सात लाख आठ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२), ३ (५), पर्यावरण संरक्षण अधिनियमाचे कलम १५ तसेच सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ३ (७) अन्वये कायदेशीर फिर्याद देण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकात पोलीस उपनिरीक्षक रोहित कुदळे, सुधीर बावणे, सचिन गायधने आणि चालक एएसआय संजय प्रधान यांचा सहभाग होता.

जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ गुरुवार, १९ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

कुटाराची जिल्ह्याबाहेर तस्करी; चारा टंचाईचे संकट गडद!

किन्हीराजा-जऊळका परिसरातून दररोज १० ट्रक सोयाबीनचा कुटार अकोला, अमरावती जिल्ह्यांत रवाना

■ प्रतिनिधी | किन्हीराजा ■

परिसरातील शेतकऱ्यांकडून जनावरांसाठी साठवून ठेवण्यात येणाऱ्या सोयाबीनच्या कुटाराची मोठ्या प्रमाणात जिल्ह्याबाहेर वाहतूक होत असल्याने भविष्यात पशुपालकांसमोर चारा टंचाईचे गंभीर संकट उभे राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. किन्हीराजा व जऊळका महसूल मंडळातील विविध गावांमधून दररोज सुमारे दहा ट्रक कुटार अकोला व अमरावती जिल्ह्यांत जात असल्याची माहिती असून, या प्रकाराला आळा घालण्यासाठी महसूल व पोलीस प्रशासनाने ठोस कारवाई करण्याची गरज व्यक्त होत आहे.

किन्हीराजा परिसरातील एरंडा, मैराळडोह, कवरदरी, रामरावबाडी, पिंपळशेंडा, गीव्हा, गणेशपूर, वरदरी, उमरदरी, काळामाथा तसेच जऊळका परिसरातील अमानवाडी, कुतरडोह, माळेगाव आदी गावांमधून सोयाबीनचा कुटार मोठ्या प्रमाणात गोळा करून ट्रकद्वारे बाहेर पाठविला जात आहे. काही ट्रक कवरदरी, कुतरडोह, माळेगाव मार्गे अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी परिसरातील गट्टू



निर्मिती कारखान्यांकडे जात असल्याचे सांगितले जाते. तर काही वाहने वाशिम जिल्ह्यात कुटार नेण्याची परवानगी असल्याचे दाखवून शेलूबाजार, कामरगाव मार्गे अमरावती व बडनेरा परिसरात रवाना होत असल्याची चर्चा आहे.

कुटार दलालांचे जाळे सक्रिय

कुटाराच्या या व्यवहारात स्थानिक दलालांचे जाळे सक्रिय झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. ट्रकचालक व ठेकेदार गावातील स्थानिक व्यक्तींना हाताशी धरून कुटार उपलब्ध करून घेणे, गाडी भरणे आणि वाहन रस्त्यावर लागेपर्यंत देखरेख करण्याची जबाबदारी देत असल्याचे बोलले जाते. यासाठी काही दलालांना प्रत्येक गाडीमागे आर्थिक मोबदला दिला जात असल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे कुटार वाहतुकीचा व्यवसाय संघटित पद्धतीने सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

कुटार वाहतुकीत स्पर्धा; एकमेकांच्या गाड्या अडविण्याचे प्रकार?

कुटार वाहतुकीच्या व्यवसायात वाढलेल्या स्पर्धेमुळे काही ठिकाणी एकमेकांच्या वाहनांची माहिती महसूल कर्मचारी व पोलिसांना देऊन प्रतिस्पर्ध्यांच्या गाड्या अडविण्याचे प्रकार घडत असल्याची चर्चा आहे. कोणत्या गावातून कधी कुटाराची गाडी निघणार, याची माहिती मिळविण्यासाठीही काही जण सक्रिय असल्याचे सांगितले जाते. या व्यवहारातून स्थानिक पातळीवर वाद आणि कुरघोडीचे प्रकार वाढत असल्याचे चित्र आहे.

गौशाळेच्या नावाखाली दिशाभूल?

कुटाराची वाहतूक करताना काही वाहनधारकांकडून वनोजा किंवा जऊळका येथील गौशाळेत कुटार नेण्यात येत असल्याचे सांगितले जात असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र प्रत्यक्षात वाहनांचा मार्ग वेगळाच असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. गौशाळेच्या नावाचा वापर करून संबंधितांना विश्वासात घेतले जात असल्याच्या तक्रारी असून, अशा वाहनांच्या कागदपत्रांची व वाहतुकीच्या अंतिम ठिकाणाची प्रशासनाने पडताळणी करावी, अशी मागणी होत आहे. महसूल व पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह अवैधरीत्या कुटार वाहतूक करणाऱ्या वाहनांची माहिती स्थानिक नागरिकांकडून महसूल विभागाला तसेच तलाठ्यांना दिली जात असल्याचे सांगण्यात येते. मात्र त्यानंतरही प्रभावी कारवाई होत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. कारवाईबाबत विचारणा केली असता वरिष्ठांशी चर्चा करून पुढील निर्णय घेण्यात येईल.

आकोली जहागीर ग्रामपंचायतीत ४.६५ लाखांच्या निधीचा कथित अपहार!

RGSA विकास निधीसह घरपट्टी-पाणीपट्टीच्या रकमेतही गैरव्यवहाराचा आरोप; सरपंच, सचिवांसह दोषींवर फौजदारी कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

ग्रामपंचायतीच्या विकासासाठी शासनाकडून मिळणारा निधी आणि सामान्य नागरिकांकडून जमा होणाऱ्या कराच्या पैशांचा विनियोग नेमका कुठे होतो, असा गंभीर प्रश्न आकोली जहागीर ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारीमुळे उपस्थित झाला आहे. राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत (RGSA) नवीन ग्रामपंचायत इमारत व नागरी सुविधा केंद्राच्या बांधकामासाठी मंजूर झालेल्या ४ लाख ६५ हजार रुपयांच्या निधीचा कथित अपहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय ग्रामस्थांनी कष्टाने भरलेल्या घरपट्टी आणि पाणीपट्टीच्या रकमेतही गैरव्यवहार झाल्याचा तक्रार पुढे आली आहे.

या प्रकरणी आकोली जहागीर येथील शासकीय कंत्राटदार सागर श्रीकृष्ण वाघमारे यांनी अकोट पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. सरपंच, ग्रामपंचायत सचिव, संबंधित कर्मचारी आणि काही सदस्यांनी संगनमत करून शासकीय निधी तसेच ग्रामस्थांच्या कररूपी पैशांचा कथित अपहार केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यासह अपात्रतेची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

विकास निधीचा हिशेब संशयाच्या भोवऱ्यात!

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान सन २०२५-२६ अंतर्गत आकोली जहागीर ग्रामपंचायतीला नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकाम आणि नागरी सुविधा केंद्राची खोली उभारण्यासाठी एकूण ४ लाख ६५ हजार रुपयांचा निधी प्राप्त झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मात्र, संबंधित काम करणाऱ्या कंत्राटदाराला नियमानुसार संपूर्ण देयक अदा करण्यात आले नसल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.

वाघमारे यांच्या तक्रारीनुसार, त्यांना आतापर्यंत केवळ २ लाख रुपये अदा करण्यात आले असून, उर्वरित रकमेचा हिशेब संशयास्पद आहे. निधीची रक्कम, प्रत्यक्ष देयके आणि बँक व्यवहार यांचा ताळमेळ तपासण्याची मागणी त्यांनी केली आहे. शासकीय निधीचा विनियोग नेमका कोणत्या कामासाठी झाला, पैसे कोणाच्या माध्यमातून काढण्यात आले आणि संबंधित खर्चाच्या नोंदी कितपत पारदर्शक आहेत, हे चौकशीतून स्पष्ट होणे आवश्यक आहे.

घरपट्टी-पाणीपट्टीच्या पैशांचाही कथित अपहार!

या तक्रारीतील आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे ग्रामस्थांकडून जमा होणाऱ्या घरपट्टी आणि पाणीपट्टीच्या रकमेचा कथित गैरवापर. गावातील सामान्य नागरिक आपल्या कष्टाच्या कमाईतून नियमितपणे कर भरतात. या रकमेतून गावातील पाणीपुरवठा, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांचा विकास होणे अपेक्षित असते. मात्र, कराच्या माध्यमातून जमा झालेला सार्वजनिक निधी वैयक्तिक कामासाठी वापरण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

ग्रामपंचायतीच्या कर वसुलीची नोंदवही, रोकडवही, बँक खाते विवरण, खर्चाची बिले आणि व्हाउचर यांची तपासणी केल्यास या आरोपांमागील वस्तुस्थिती समोर येऊ शकते. त्यामुळे केवळ तोंडी चौकशी न करता संपूर्ण आर्थिक व्यवहारांचे विशेष लेखापरीक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सरपंच-सचिवांच्या भूमिकेची चौकशी करा!

ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांमध्ये सरपंच आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. निधी प्राप्त झाल्यापासून तो खर्च होईपर्यंत कोणत्या पदाधिकाऱ्याने मान्यता दिली, कोणत्या कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या झाल्या, रक्कम काढण्याची प्रक्रिया कोणी पूर्ण केली आणि खर्चाचे लेखांकन कोणी केले, याची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे. या कथित गैरव्यवहारात काही कर्मचारी आणि सदस्यांचाही सहभाग असल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.

निलंबन, वसुली आणि फौजदारी कारवाईची मागणी

सागर वाघमारे यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रारीत सरपंच, ग्रामपंचायत सचिव तसेच संबंधित कर्मचारी व सदस्यांची तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे. कंत्राटदाराची थकीत रक्कम आणि घरपट्टी-पाणीपट्टीच्या माध्यमातून जमा झालेल्या कथित गैरव्यवहाराच्या निधीची व्याजासह वसुली करावी, दोषी सचिवाला निलंबित करावे आणि सरपंचांसह दोषी पदाधिकाऱ्यांवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार अपात्रतेची कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

शासकीय निधी आणि जनतेच्या कररूपी पैशांचा अपहार झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी भूमिका तक्रारदाराने मांडली आहे.

गटविकास अधिकारी कारवाई करणार की प्रकरण कागदावरच राहणार?

ग्रामपंचायत ही गावाच्या विकासाची मूलभूत यंत्रणा आहे. याच यंत्रणेच्या आर्थिक व्यवहारांवर गैरव्यवहाराचे गंभीर आरोप होत असतील, तर पंचायत समिती प्रशासनाने त्याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. विकास निधीचा हिशेब, बांधकामाची प्रत्यक्ष स्थिती, कंत्राटदाराची देयके आणि ग्रामस्थांकडून जमा झालेल्या कराची रक्कम या सर्व बाबींची स्वतंत्रपणे पडताळणी झाली पाहिजे.

आता सागर वाघमारे यांच्या तक्रारीवर अकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कोणती भूमिका घेतात, चौकशीसाठी पथक नियुक्त होते का आणि कथित आर्थिक गैरव्यवहाराची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कारवाई केली जाते का, याकडे आकोली जहागीरच्या ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. आरोपांची सत्यता निष्पक्ष चौकशीतून स्पष्ट होणे गरजेचे असले, तरी या तक्रारीने ग्रामपंचायतीच्या आर्थिक पारदर्शकतेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे.

मालेगावात गुजराती बांधवांकडून जलाराम बाप्पा जयंती उत्साहात साजरी!



मालेगाव : स्थानिक गुजराती बांधवांच्या वतीने श्री जलाराम बाप्पा यांची २२७ वी जयंती सोमवार, दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही गुजराती समाज बांधवांनी एकत्र येत जयंती उत्सवाचे आयोजन केले होते.यानिमित्त मालेगाव येथील गुजराती बांधव प्रदीप खिरैया यांच्या निवासस्थानी दुपारी १२ वाजता श्री जलाराम बाप्पांची विधिवत आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविक व समाजबांधवांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला गुजराती समाजातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रदीप खिरैया, वैशाली खिरैया, संगीता खिरैया, केशव खिरैया, नंदू खिरैया, मीरा खिरैया, शुभम खिरैया, नवनीत खिरैया, महेश जेठवा, अरविंद जेठवा, चेतन सोनिग्रा, अशोक जेठवा, विजय ईगोले, चेतन शर्मा व निखिल खिरैया यांनी विशेष परिश्रम घेतले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा

भास्कर पेरे पाटील करणार मार्गदर्शन; १९ नोव्हेंबर जागतिक शौचालय दिनानिमित्त आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास, ग्रामपंचायतीची कार्यक्षमता वाढविणे आणि ग्रामविकासाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सन २०२६-२७ अंतर्गत जिल्हा परिषद वाशिमच्या वतीने गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी स्थानिक वाटाणे लॉन्स येथे जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत अभियानाची उद्दिष्टे, अंमलबजावणीची कार्यपद्धती, विविध घटक आणि ग्रामपंचायत स्तरावर करावयाच्या कामकाजाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामविकास यंत्रणेतील घटकांना आवश्यक दिशा देणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार संजय देशमुख, खासदार संजय धोत्रे, विधानपरिषद सदस्य भावना गवळी, विधानपरिषद सदस्य किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, किरण लिंगाडे, आमदार धर्मगुरू बाबुसिंग महाराज राठोड, आमदार अमित झनक, आमदार श्याम खोडे, आमदार सई डहाके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, प्रकल्प संचालक किरण कोवे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) आत्माराम बोंद्रे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सकाळी १०.३० वा. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात येईल. त्यानंतर सकाळी ११ ते ११.३० या वेळेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) आत्माराम बोंद्रे हे प्रास्ताविकातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाची माहिती देणार आहेत. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानातील विविध घटकांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यामध्ये भाऊराव बेलखेडकर, शालिग्राम पडघन, प्रमोद लोखंडे आणि मोहन भुसारी हे मार्गदर्शन करणार आहेत.

२१ व २२ नोव्हेंबरला कारंजात गुरुदेव प्रचारकांचे महासंमेलन

देशभरातील प्रचारकांची उपस्थिती, विद्वान विचारवंतांच्या प्रबोधनाची मेजवानी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज जन्मस्थान स्मृती समिती श्रीक्षेत्र यावली (शहीद) यांच्यावतीने श्री गुरुदेव सेवा मंडळ वाशिम जिल्ह्याच्या सौजन्याने दिनांक २१ व २२ नोव्हेंबर रोजी' प्रचारकांचे महासंमेलन' व पुण्यस्मृती महोत्सव श्री गुरुदेव सेवाश्रम ग्राममनाथ भवन शांतीनगर कारंजा लाड येथे आयोजित करण्यात येत आहे. दिनांक २१ नोव्हेंबरला २वाजता या महासंमेलनाचे उद्घाटन अरुण पाटील ताथोड यांचे हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी ह भ प हरिभाऊ वेरूळकर गुरुजी राहणार असून विशेष अतिथी म्हणून आमदार सईताई डहाके,गुरुकुंज मोझरीचे सर्वाधिकारी प्रकाश महाराज वाघ,उप सर्वधिकारी बाबाराव



पाटील, पद्मश्री जनार्दनपंत बोथे गुरुजी, प्रचार प्रमुख गोपाल भाऊ कडू आदी मान्यवर उपस्थित राहणार..,.संध्याकाळी ६ वाजता अरुण सालोडकर यांचे प्रबोधन राहील. ७ वाजता मुंबई येथील विष्णुपंत सूर्यवंशी (तबला केसरी)व त्यांचा संच यांचे तबला वादन व पखवाज यांची जुगलबंदी होणार आहे. रात्री ८ वाजता ह.भ.प. दिनकरराव चोरे महाराज यांचे हरिकीर्तन होणार आहे.... तर रविवार दि .२२ नोव्हेंबरला सकाळी ५.३० वाजता भास्कराव विघे यांचे 'सामुदायिक ध्यान व चिंतन' यावर प्रबोधन तर ६.३० वाजता विठ्ठलराव काठोळे दादा हे 'रामधून बोधपरवाणी' यावर भाष्य करतील. सकाळी ८ वाजता ह भ प वेरूळकर गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचाराकांशी हितगुज हा संवादात्मक कार्यक्रम होईल. तर १० वाजता वेदांतचार्य राम महाराज सातेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली

''गुरुदेव सेवा मंडळ व इतर पंथ यांचा समन्वय 'या विषयावर परिसंवाद आयोजित केला आहे. दुपारी ११ वाजता माजी मंत्री सुभाषराव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रचाराकांचा भव्य सत्कार होणार आहे.

गव्हा येथील शाळेला नवीन चार वर्गखोल्या देण्याची ग्रामस्थांची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे मागणी

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील गव्हा येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत तब्बल ९० वर्षांपूर्वीची असून सध्या ती जीर्णावस्थेत आहे. शाळेच्या वर्गखोल्यांची झालेली दुरवस्था पाहता विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा आणि सुरक्षेचा विचार करून शाळेला नवीन चार वर्गखोल्या तातडीने मंजूर कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. गव्हा येथील जिल्हा परिषद शाळेची स्थापना ८ जानेवारी १९०० रोजी झाली असून या शाळेला १२६ वर्षांचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. परिसरातील अनेक पिढ्यांना शिक्षण देणारी ही शाळा आज मात्र जुन्या इमारतीच्या समस्येमुळे अडचणीत सापडली आहे. उपलब्ध माहितीनुसार, शाळेच्या वर्गखोल्यांचे बांधकाम अंदाजे १९३५ मध्ये करण्यात आले होते. या बांधकामाला आता सुमारे ९० वर्षे पूर्ण झाली आहेत.

दीर्घकाळाच्या वापरामुळे शाळेच्या वर्गखोल्या व इमारतीची अवस्था जीर्ण झाली असून विद्यार्थ्यांना अशा इमारतीत बसून शिक्षण घ्यावे लागत आहे. शाळा ही विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाचे केंद्र असली, तरी सर्वप्रथम त्यांची सुरक्षितता महत्त्वाची आहे. जुन्या इमारतीमुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२२ नोव्हेंबर रोजी अकोला येथे गुरु गोरक्षनाथ प्रकट उत्सव

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विदर्भ नाथ संप्रदाय मंडळ अकोला आणि विदर्भ नाथ समाज महिला मंडळ अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने, नाथ समाजचे आराध्य देवत भगवान गुरु गोरक्षनाथांचे प्रकट उत्सव रविवार, २२ नोव्हेंबर रोजी अकोला येथे मोठ्या थाटामाटात साजरा केला जाईल. याप्रसंगी, नाथ समाजातील इयत्ता १०वी आणि १२वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा, तसेच समाजातील ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान केला जाईल.

नाथ समाजाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात वरील माहिती देताना म्हटले आहे की, अकोलाचे सहकारी अधिकारी मनोज रघुनाथ सोनुलकर हे रविवार, २२ नोव्हेंबर रोजी अकोला शहरातील अनंत नगर येथील सद्गुरू गोरक्षनाथ मंदिरात होणाऱ्या या भव्य गुरु गोरक्षनाथ प्रकट उत्सवाचे उद्घाटन करतील. ज्येष्ठ समाजसेविका विद्यादेवी अभयकुमार पंडित यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमात, अकोला जिल्हा कारागृहाच्या वरिष्ठ कारागृह अधिकारी मिराताई विजयनाथ बाबर, विदर्भ महिला आघाडीच्या अखिल भारतीय नाथ समाज महासंघाच्या प्रमुख प्रा. संगीता प्रेमनाथ सुरांसे,



महासंघाच्या महाराष्ट्र कार्यकारी सदस्य आणि ज्येष्ठ पत्रकार नंदकिशोर प्रभाकरनाथ वैद्य (वाशिम), विदर्भ नाथ संप्रदाय मंडळ अकोलाचे अध्यक्ष कैलाश एकनाथ इंगळे आणि विदर्भ नाथ संप्रदाय महिला मंडळ अकोलाच्या अध्यक्षा जिजाताई दिलीपनाथ चव्हाण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात, नाथ समाजाच्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता १०वी आणि १२वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसोबतच, ७५ वर्षे पूर्ण केलेल्या समाजातील ज्येष्ठ नागरिकांचाही सन्मान केला जाईल. विदर्भ नाथ संप्रदाय मंडळ अकोला आणि विदर्भ नाथ समाज महिला मंडळ अकोला यांनी नाथ समाजाच्या नागरिकांना रविवार, २२ नोव्हेंबर रोजी अकोला येथे होणाऱ्या या भव्य कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

भागवत ज्ञानयज्ञाचा भक्तिमय सोहळा!



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील गादेगाव येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात परमपूज्य विठ्ठल बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त १७ ते २४ नोव्हेंबरदरम्यान संगीतमय श्रीमद्भागवत सप्ताह, विश्वजीवन ग्रंथ पारायण आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाच्या निमित्ताने संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून, परिसरातील भाविकांना अध्यात्मिक श्रवण आणि भक्तिसाधनेची पर्वणी लाभणार आहे.

या सप्ताहादरम्यान दररोज दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कथावाचक ह.भ.प. संदीप महाराज पोफळे यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद्भागवत कथेचे निरूपण होणार आहे. तर सकाळी ८ ते ९ वाजेपर्यंत पुष्पाबाई चौरे यांच्या हस्ते अखंड विश्वजीवन ग्रंथाचे पारायण करण्यात येणार आहे.

या धार्मिक सोहळ्यात रुक्मिणी माता महिला भजनी मंडळ, कानिफनाथ महिला भजनी मंडळ, लक्ष्मी माता महिला भजनी मंडळ, नाथनंगे महाराज भजनी मंडळ, वारकरी भजनी मंडळ आणि दुर्गामाता महिला भजनी मंडळ यांची भजनसेवा लाभणार आहे. दररोज सायंकाळी हरिपाठानंतर हरिकीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सप्ताहाची सांगता २४ नोव्हेंबर रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांनी होणार आहे.

मध्यरात्री पोलिसांची जिल्हाभर धडक मोहीम; ७ किलो २५० ग्रॅम गांजा जप्त

अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई; फरार व वॉरंटमधील आरोपींनाही घेतले ताब्यात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासह अवैध धंदे, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती आणि फरार आरोपींवर प्रभावी नियंत्रण मिळविण्याच्या उद्देशाने वाशिम जिल्हा पोलिसांनी १७ ते १८ नोव्हेंबरदरम्यान मध्यरात्री जिल्हाभर विशेष धडक मोहीम राबविली. या मोहिमेत पोलिसांनी विविध ठिकाणी कारवाई करत गांजा सदृश्य अंमली पदार्थ जप्त केला असून अवैध शस्त्र बाळगणारे, वॉरंटमधील आरोपी तसेच फरार गुन्हेगारांविरुद्धही कारवाई केली आहे.

जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांचे अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी समन्वयाने ही मोहीम राबविली. या कारवाईदरम्यान ७ किलो २५० ग्रॅम गांजा सदृश्य पाने, फुले व बिया असलेला अंमली पदार्थ जप्त करून एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध आर्म ॲक्टनुसार दोन कारवाया करण्यात आल्या. त्याचबरोबर अजामीनपात्र वॉरंट (NBW) बजावलेल्या



आरोपींना अटक करण्यात आली. रेकॉर्डवरील पाहिजे असलेले तसेच फरार गुन्हेगारांनाही शोधून ताब्यात घेण्यात आले. या मोहिमेदरम्यान एकूण १४ संशयित आश्रयस्थानांची तपासणी करण्यात आली.

जिल्ह्यात अवैध धंदे, अंमली पदार्थांची तस्करी, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे तसेच विविध गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या आणि फरार असलेल्या आरोपींविरुद्ध यापुढेही अशाच प्रकारच्या विशेष मोहिमा राबविण्यात येणार आहेत. गुन्हेगारीला आळा घालणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी वाशिम जिल्हा पोलीस दल कटिबद्ध असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. ही मोहीम पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील व अपर पोलीस अधीक्षक लता फड यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. या मोहिमेत १५ अधिकारी आणि ११० अंमलदारांनी सहभाग नोंदविला.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्ष १४ ■ अंक ३५१ ■ गुरुवार, १९ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

शिक्षणाच्या मंदिरात लाचेचा काळाबाजार, मुख्याध्यापक २.७५ लाखांसह एसीबीच्या जाळ्यात

शिक्षण सेवकाला कार्यमुक्त करण्यासाठी मागितली लाच

वर्धा जनमाध्यम : विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देणाऱ्या शाळेतच लाचेचा व्यवहार सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार बोरगाव (मेघे) येथे उघडकीस आला आहे. शिक्षण सेवकाला कार्यमुक्त करण्यासाठी तब्बल २ लाख ७५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना कै. आनंदराव मेघे विद्यालयाचा मुख्याध्यापक संजय माधव भस्मे (५४, रा. समतानगर, वर्धा) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या नागपूर येथील पथकाने रंगेहात पकडले. १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ही कारवाई करण्यात आली. शैक्षणिक संस्थेतील प्रशासकीय प्रक्रियेलाच लाचेचा विळखा पडल्याचे या कारवाईने समोर आल्याने जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

नोकरी लागली, पण कार्यमुक्तीसाठी लाचेची मागणी

प्राप्त माहितीनुसार, तक्रारदार हे बोरगाव (मेघे) येथील कै. आनंदराव मेघे विद्यालयात शिक्षण सेवक म्हणून कार्यरत होते. दरम्यान, त्यांना जिल्हा परिषदेत नोकरी मिळाली. त्यामुळे त्यांनी पूर्वीच्या शाळेतून कार्यमुक्त करण्यासाठी मुख्याध्यापकांकडे विनंती अर्ज सादर केला. नियमानुसार कार्यमुक्तीची प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित असताना या कामासाठी मुख्याध्यापक संजय भस्मे यांनी तक्रारदाराकडे २ लाख ७५ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे.

नव्या नोकरीत रुजू होण्यासाठी कार्यमुक्ती आवश्यक असताना त्यासाठी एवढी मोठी रक्कम मागितली जात असल्याने तक्रारदार आर्थिक आणि मानसिक अडचणीत सापडले. मात्र, लाच देण्यास नकार देत त्यांनी थेट नागपूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेत तक्रार नोंदवली.



एसीबीने रचला सापळा; मुख्याध्यापक अलगद जाळ्यात

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचला. ठरल्याप्रमाणे १८ नोव्हेंबर रोजी लाचेचीं रक्कम स्वीकारताना मुख्याध्यापक संजय भस्मे याला पथकाने रंगेहात पकडले. तब्बल २ लाख ७५ हजार रुपयांच्या लाचप्रकरणी झालेल्या या कारवाईने शाळा व्यवस्थापन आणि शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ही कारवाई नागपूर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी भारती गुरनुले यांच्या मार्गदर्शनाखाली विलीन कांबळे, मनीष नेवारे, स्वाती हिंडोरिया आणि हर्षलता भरडकर यांच्या पथकाने केली. १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.४७ वाजेपर्यंत संबंधित प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

शिक्षण सेवकाला कार्यमुक्त करण्यासारख्या प्रशासकीय कामासाठी लाखो रुपयांची मागणी झाल्याचा प्रकार समोर आल्याने शिक्षण संस्थांमधील कारभारावर आता गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणाचे संस्कार देणाऱ्या शिक्षण व्यवस्थेतच अशा प्रकारांना थारा मिळत असेल, तर सर्वसामान्य कर्मचाऱ्यांनी न्याय मागायचा कुणाकडे, असा प्रश्न या घटनेनंतर उपस्थित होत आहे.

शेतकऱ्यांच्या पाण्यावर डल्ला

सिंचन योजनेचे साहित्य फोडणाऱ्यांवर आता होणार गुन्हे दाखल

जलवाहिन्या, व्हॉल्व्ह आणि फिल्टरची तोडफोड

आर्वी जनमाध्यम : एकीकडे पावसाने पाठ फिरविल्याने शेतकरी दुष्काळाच्या खाईत लोटला गेला असताना दुसरीकडे शेतकऱ्यांच्या पिकांना जीवदान देण्यासाठी उभारलेल्या सिंचन व्यवस्थेलाच काहींनी लक्ष्य केले आहे. स्वतःच्या शेतात अधिक पाणी वळविण्याच्या हव्यासापोटी जलवाहिन्या फोडणे, व्हॉल्व्ह तोडणे आणि फिल्टरचे नुकसान करण्याचे प्रकार घडले आहेत. शेतकऱ्यांच्या सामूहिक हितासाठी उभारलेल्या योजनेचीच वाट लावणाऱ्या या प्रवृत्तीविरुद्ध आता प्रशासनाने कठोर पवित्रा घेतला असून, संबंधितांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे.



निम्न वर्धा प्रकल्पाच्या पाण्याचा शेतकऱ्यांना लाभ मिळावा, यासाठी लिफ्ट इरिगेशन योजना राबविण्यात आली. या योजनेतून धनोडी, रोहणा, विरूळ, बोदड, रसुलाबाद आणि पुलगाव परिसरातील सुमारे ८ हजार ४०० हेक्टर क्षेत्राला सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात आले. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जमिनीतील ओलावा संपला होता. विहिरींची पाणीपातळी खालावली होती. सप्टेंबर महिन्यातच अनेक विहिरींनी तळ गाठल्याने कपाशी आणि तुरीची पिके वाचविण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले होते.

अशा संकटाच्या काळात ऑक्टोबरच्या सुरुवातीला लिफ्ट इरिगेशन योजनेतून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. आर्वी परिसरातून सुरू झालेला पाणीपुरवठा विविध गावांतील शेतांपर्यंत पोहोचविण्यात आला. पाण्यामुळे कोमेजणाऱ्या कपाशी आणि तुरीला संजीवनी मिळाली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास वाचण्याची आशा निर्माण झाली. मात्र, काहींनी या सामूहिक व्यवस्थेचे महत्त्वच पायदळी तुडविले. अधिक पाणी मिळविण्याच्या नादात काहींनी ठिबक सिंचनाचे पाइप फोडले, शेताच्या बांधावरील व्हॉल्व्ह तोडून पाणी वळविले, तर काही ठिकाणी फिल्टरची तोडफोड केली. एका शेतकऱ्याच्या स्वार्थासाठी दुसऱ्या शेतकऱ्याच्या पिकांचा घसा कोरडा पडण्याची वेळ आली. या प्रकारांमुळे योजनेच्या देखभालीसाठी नियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी काही ठिकाणी पाणीपुरवठाच बंद करण्याची वेळ आली.

पोलीस क्राईम डायरी

घरासमोरून दुचाकी लंपास : सीसीटीव्हीत चोरटा कैद

हिंगणघाट : घरासमोरील गल्लीत उभी करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना शिवाजी वॉर्डात उघडकीस आली. बजाज कंपनीची डिस्कव्हर १०० टी (एमएच ३२ झेड ०११९) असे चोरीस गेलेल्या दुचाकीचे नाव असून, तिची अंदाजे किंमत १५ हजार रुपये आहे. याप्रकरणी राहुल संजय मकरे (२५, रा. शिवाजी वॉर्ड, हिंगणघाट) यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.

१४ नोव्हेंबरच्या रात्री ११.३० वाजताच्या सुमारास दुचाकी घराजवळील गल्लीत उभी होती. दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता दुचाकी गायब असल्याचे भावाच्या निदर्शनास आले. शोधाशोध करूनही दुचाकी मिळाली नाही. घरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता अज्ञात व्यक्ती दुचाकी घेऊन जाताना दिसून आली. याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी १७ नोव्हेंबरला गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार किशोर गाडेवान करीत आहेत.

दहेगाव स्टेशनमध्ये वृद्धाला मारहाण

सावंगी (मेघे) : घरासमोरील सिमेंटच्या बाकावर बसून गप्पा मारत असलेल्या ज्येष्ठ नागरिकाला शिवीगाळ करीत वाद घालून हात मुरगळून जखमी केल्याची घटना दहेगाव (स्टेशन) येथे घडली. बादलसिंग जालमसिंग बडवाल (६५, रा. वॉर्ड क्रमांक ३, दहेगाव स्टेशन) असे जखमी फिर्यादीचे नाव आहे. याप्रकरणी गणेश राऊत याच्याविरुद्ध सावंगी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

१४ नोव्हेंबर रोजी रात्री ८.३० ते ९ वाजताच्या दरम्यान बडवाल हे गावातील सुरेश शेंदरे यांच्यासोबत घरासमोरील बाकावर बसले होते. यावेळी आरोपी तेथे आला आणि येथे कशाला बसले, असे म्हणत शिवीगाळ करू लागला. फिर्यादीने जाब विचारताच वाद वाढला. आरोपीने त्यांना ओढताण करून डावा हात पकडून मुरगळला. वैद्यकीय तपासणी आणि एक्स-रे अहवालानंतर १७ नोव्हेंबरला गुन्हा नोंदविण्यात आला. पुढील तपास पोलीस हवालदार नितीन भगत करीत आहेत.

उसाचा रस विकण्यावरून अल्पवयीन मुलाला मारहाण

पुलगाव : सुभाषनगर परिसरात उसाचा रस विक्री करण्यासाठी गेलेल्या १७ वर्षीय मुलाला एका इसमाने काठीने मारहाण करून जखमी केल्याची घटना १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी घडली. प्रदीप कुशवाह (रा. शेड लेआउट, पुलगाव) असे जखमी मुलाचे नाव आहे. आरोपी आशीष कांबळे (रा. सुभाषनगर, पुलगाव) याने विनाकारण वाद घालत काठीने प्रदीपच्या डोक्यावर व डाव्या हातावर वार केले. तसेच यापुढे या ठिकाणी यायचे नाही, अशी धमकीही दिली. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

हिंगणघाटात तोतया पोलिसांचा वृद्ध नागरिकाला गंडा

हिंगणघाट : शहरात पोलीस असल्याची बतावणी करून ज्येष्ठ नागरिकाचे सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या भामट्याने १ लाख ७० हजार रुपयांचा ऐवज पळविला. ही घटना १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी नंदोरी रोडवर घडली. निळकंठ बाटकर (६५, रा. मेढा, जि. नागपूर) हे मुलीकडे आले असताना साई मंदिरातून दर्शन घेऊन परत जात होते. चंदनखेडे ट्रेडर्ससमोर दुचाकीवर आलेल्या अनोळखी व्यक्तीने पोलीस असल्याचे सांगत आयकार्ड दाखविले. परिसरात चोऱ्या होत असल्याचे सांगून दागिने काढण्यास सांगितले. त्यानंतर हातचलाखीने १२ ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोफ आणि ७.५० ग्रॅमची अंगठी असा १.७० लाखांचा ऐवज लंपास केला. दुपट्यात दागिने नसल्याचे लक्षात येताच बाटकर यांनी पोलिसांत तक्रार दिली. हिंगणघाट पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दुष्काळातही मायक्रो फायनान्सचा कर्जवसुलीः आधी जगू द्या, मग कर्जाचे हप्ते मागा

कर्जवसुलीला स्थगिती देण्याची आ. राजेश बकाने यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

वर्धा जनमाध्यम : दुष्काळाने ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडले असताना मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून सुरू असलेला कर्जवसुलीचा तगादा थांबणार कधी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी, शेतमजूर, महिला बचतगट आणि सर्वसामान्य ग्रामीण कुटुंबांना दिलासा देण्यासाठी दुष्काळग्रस्त तालुक्यांतील मायक्रो फायनान्स, खासगी वित्तीय संस्था आणि बिगर बँकिंग वित्तीय संस्थांच्या कर्जवसुलीला तातडीने स्थगिती द्या, अशी मागणी आ. राजेश बकाने यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. यावेळी भाजप विधिमंडळ प्रतोद आ. रणधीर सावरकर उपस्थित होते.



दुष्काळाचा फटका केवळ शेतीपुरता मर्यादित नसून ग्रामीण भागातील रोजगार आणि उत्पन्नाचे स्रोतही आटले आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबांना नियमित कर्जाचे हप्ते भरणे अशक्य झाले आहे. अशा परिस्थितीतही वित्तीय संस्थांकडून वसुलीसाठी तगादा लावला जात असल्याने नागरिकांवर आर्थिक आणि मानसिक ताण वाढत आहे.

विशेषतः महिला बचतगटातील सदस्यांची कोंडी झाली असून हप्ते थकल्यास सिबिल स्कोअर खराब होण्याची भीती आहे. शासनाने शेतकऱ्यांप्रमाणेच या घटकांचाही विचार करून कर्जवसुली स्थगितीचा शासन निर्णय तातडीने निर्गमित करावा, असे बकाने यांनी निवेदनातून म्हटले आहे.

केळझरच्या वळणावर दोन ट्रकची जोरदार धडक ; एक उलटला, दुसरा शेतात घुसला

दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान; चालकांना किरकोळ दुखापत

सेलू जनमाध्यम : तालुक्यातील केळझर येथील वळण रस्त्यावर सुनीता नर्सिंग कॉलेजजवळ मंगळवारी (१७ नोव्हेंबर) रात्री दोन ट्रकची जोरदार धडक झाली. या अपघातात एक ट्रक दुभाजकावर चढून उलटला, तर दुसरा ट्रक रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतात घुसला. यात दोन्ही ट्रकचे मोठे नुकसान झाले असून शेतातील पिकांचेही नुकसान झाले. सुदैवाने दोन्ही वाहनचालक किरकोळ जखमी झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच ४९ बीझेड ५९८१ क्रमांकाचा ट्रक वायगाव येथून कापसाच्या गाठी घेऊन कळमेश्वरकडे जात होता.



दरम्यान, मंगळवारी रात्री १०.२० वाजताच्या सुमारास मागून येणाऱ्या एचआर ५८ ई ८२६७ क्रमांकाच्या ट्रकने या ट्रकला जोरदार धडक दिली. धडकेमुळे समोरील ट्रकवरील चालक सरताज अली (रा. यवतमाळ) याचे नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रक दुभाजकावर चढून रस्त्यावरच उलटला. तर धडक देणाऱ्या ट्रकवरील चालक मनोजकुमार यादव (रा. यमुनानगर, हरयाणा) याचेही वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक रस्त्याच्या खाली उतरून ठोंबरे यांच्या शेतात घुसला. अपघाताची माहिती मिळताच केळझर येथील युवकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. ट्रकमध्ये अडकलेल्या दोन्ही चालकांना बाहेर काढण्यात आले. या घटनेत दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असून शेतातील पिकांचेही नुकसान झाले आहे. घटनेची नोंद सेलू पोलिसांनी घेतली आहे.

कापूस विकला, वर्ष उलटले ; चार कोटींचे चुकारे अडकले

दिलेले धनादेशही घेतले परत, शेतकऱ्यांची प्रशासनाकडे धाव

सेलू जनमाध्यम : शेतकऱ्यांनी वर्षभर रक्ताचे पाणी करून पिकवलेला कापूस विकला मात्र त्याचा मोबदला मिळवण्यासाठी आता त्यांच्यावर दारोदारी भटकण्याची वेळ आली आहे. तालुक्यातील हिंगणी येथील सर्वज्ञ जिनिंग अँड प्रेसिंगकडून मागील वर्षी कापूस विकलेल्या तब्बल दीडशे शेतकऱ्यांचे जवळपास चार कोटी रुपये अद्याप थकीत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. वर्ष उलटले, दिवाळीही संपली, तरी कापसाचे चुकारे मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने आपला कापूस सर्वज्ञ जिनिंगला विकला. मात्र, कापसाची विक्री होऊनही मोबदला मिळत नसल्याने त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. सुरुवातीला संस्थेच्या व्यवस्थापकाकडून शेतकऱ्यांना धनादेश देण्यात आले. मात्र, काही काळानंतर हे धनादेश परत घेण्यात आले. त्यानंतर आरटीजीएसद्वारे थेट बँक खात्यात रक्कम जमा करण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, हे आश्वासनही अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे जिनिंगच्या आर्थिक व्यवहारांबाबत आणि व्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीबाबत शेतकऱ्यांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

एकीकडे खरीप हंगामासाठी घेतलेले कर्ज, बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीचे पैसे देण्याची वेळ आली असताना



दुसरीकडे कापसाचेच चुकारे अडकल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. स्वतःच्या शेतमालाचे पैसे मिळवण्यासाठी वारंवार जिनिंगच्या चकरा माराव्या लागत असल्याने शेतकऱ्यांचा संयम सुटत चालला आहे.

या प्रकरणी शेतकऱ्यांनी सहकारमंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे निवेदन सादर करून न्यायाची मागणी केली आहे. थकीत रक्कम मिळवून देण्यासाठी सहकार विभाग, पणन महासंघ आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा. शेतकऱ्यांचे जवळपास चार कोटी रुपये अडकले असताना संबंधित यंत्रणा नेमकी काय भूमिका घेणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

महापारेषण

नागपूर, भंडारा/गोंदिया, चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली जिल्ह्यातील महापारेषण नागपूर प्रादेशिक विभाग अंतर्गत पंजीकृत स्थापत्य अभियांत्रिकी सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना सूचना - २०२६-२०२७

अधीक्षक अभियंता (स्था) महापारेषण नागपूर यांचे अधिकारक्षेत्रांतर्गत जिल्ह्यानिहाय स्थापत्य अभियांत्रिकी सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना लॉटरी पद्धतीद्वारे कामे वाटप करण्याकरिता बैठक खाली नमूद केलेल्या तारीख व वेळेस Conference Hall, महापारेषण कंपनी मर्यादित नागपूर, १३२ मानकापूर पावरहाउस परिसर, कुणाल हॉस्पिटल समोर, छिंदवाडा रोड मानकापूर नागपूर ४४००३० येथे घेण्यात येणार आहे.

अ. क्र.	जिल्हा	बैठकीची तारीख	बैठकीची वेळ
१	नागपूर	३०.११.२०२६ (सोमवार)	दुपारी १२:०० वाजता
२	भंडारा व गोंदिया	३०.११.२०२६ (सोमवार)	दुपारी ०२:०० वाजता
३	वर्धा	०१.१२.२०२६ (मंगळवार)	दुपारी १२:०० वाजता
४	चंद्रपूर	०१.१२.२०२६ (मंगळवार)	दुपारी ०१:०० वाजता
५	गडचिरोली	०१.१२.२०२६ (मंगळवार)	दुपारी ०२:०० वाजता

या कार्यालयांतर्गत सर्व पंजीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांनी कृपया याची नोंद घ्यावी तसेच वरील नमूद वेळापत्रकानुसार बैठकीस उपस्थित रहावे. सदर बैठकीत वाटप करावयाच्या कामांची यादी महापारेषणच्या **www.mahatransco.in** या संकेतस्थळावर **दि. १९.११.२०२६ (गुरुवार)** रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच सदर बैठकीत वाटप करावयाच्या कामांची यादी अधीक्षक अभियंता (स्था) महापारेषण नागपूर यांचे कार्यालयातील सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेली आहे. याबाबत अभियंत्यांनी कृपया नोंद घ्यावी.

सही/-
अधीक्षक अभियंता (स्था)
अ.उ.दा. स्थापत्य बांधकाम नि सुव्यवस्था प्रविभाग
महापारेषण नागपूर

कावडी पारधी बेड्यावर शासकीय कागदपत्रांसाठी विशेष सेवा शिबिर

वर्धा जनमाध्यम : क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह अभियानांतर्गत आर्वी तालुक्यातील कावडी पारधी बेडा येथे विशेष सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. पारधी समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सहज उपलब्ध व्हावीत तसेच कागदपत्रांअभावी कोणताही पात्र लाभार्थी शासकीय योजनांपासून वंचित राहू नये, या उद्देशाने सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरामध्ये नागरिकांना आधारकार्ड, रेशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला तसेच इतर आवश्यक शासकीय कागदपत्रांसंदर्भात मार्गदर्शन व सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. संबंधित कागदपत्रांसाठी आवश्यक अर्ज प्रक्रिया, कागदपत्रांची पूर्तता व शासकीय सेवांबाबत नागरिकांना माहिती देण्यात आली. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, विशेषतः पारधी समाजातील वंचित घटकांना शासकीय यंत्रणेशी जोडणे आणि त्यांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देऊन विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार सिंधु गजाननराव खोडे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणेः मौजा पिंपळगाव (मा), मौजा नं. १०३, प.ह.न. ३४, ता. हिंगणघाट जि. वर्धा ग्राम पंचायत पिंपळगाव (मा) च्या हद्दितील शेत सर्वे कं. १९६/५ मधील प्लॉट कं. २९ ज्याची एकुण आराजी १५००.०० चौ. फुट म्हणजेच १३९.४० चौ. मी. असुन त्याची चतुःर्सिमा :-

पुर्वेसः शेत सर्वे नं. १९६/२
पश्चिमेसः लेआउट रोड
उत्तरेसः प्लॉट नं. ३०
दक्षिणेसः प्लॉट नं. २८

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवुन त्यावर रक्कम रू. १२,०१,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

ॲड. सचिन एस. कुरझडकर
साई नगर वर्धा
मो. नं. ९८६००४१३६१

कार्यालय ग्रामपंचायत, जयपूर, पं.स.सेलू, जि.प.वर्धा

ग्रामपंचायत जयपूर, ता.सेलू, जि.वर्धा कडून जाहीरात व सूचना प्रसिध्द करण्यात येते की, ग्रामपंचायत जयपूर येथे खालीलप्रमाणे बांधकामे मंजूर झालेली आहेत. तरी या कामासाठी नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून जाहीरात निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा ग्रामपंचायत कार्यालय जयपूर यांचेकडे दिनांक १९.११.२०२६ ते २५.११.२०२६ पर्यंत सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत मोहरबंद लिफाफ्यात स्वतः किंवा पोष्टाने कार्यालयीन वेळेत शासकीय सुटीचे दिवस वगळून सादर करावी. उशिरा प्राप्त होणाऱ्या निविदांचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

अ. क्र.	ग्रामपंचायत चे नांव	योजनेच नांव	कामाचे नांव	प्राकलन किंमत	तांत्रिक मंजूरी क्र.	निविदा फी	१ टक्का अनामत रक्कम	कामाचा कालावधी	निविदा उघडण्याचा
१.	जयपूर	१५ वा वित्त आयोग २५-२६	यु.पी.सी पाईप नाली करणे	१००००	१४४/डीई/२६-२७	५००	१०००	३ महिने	ग्रा.पंचायत मासिक सभेत
२.	जयपूर	१५ वा वित्त आयोग २५-२६	ग्रामपंचायत कार्यालयाला तारेचे (चेनलिंग फेसिंग करणे)	१५००००	१४५/डीई २०२६-२७	५००	१५००	३ महिने	ग्रा.पंचायत मासिक सभेत
३.	जयपूर	१५ वा वित्त आयोग २५-२६	नळयोजना विहिरी सभोवताल काँकीटींग करणे	२०००००	१४३/डीई २०२६-२७	५००	२०००	३ महिने	ग्रामपंचायत मासिक सभेत
४.	जयपूर	सामान्य फंड २०२६-२७	जयपूर येथे रपटा बांधकाम करणे	३००००	१४६/डीई २०२६-२७	१००	३००	३ महिने	ग्रामपंचायत मासिक सभेत

टिप - अटी व शर्ती ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डवर पहावयास उपलब्ध आहे.
शासकीय कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत

सरपंच / सचिव
ग्रामपंचायत, जयपूर
पंचायत समिती सेलू,
जि.वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

७२ लाख शेतक-यांची दिवाळी 'अग्रिम'शिवाय



मुंबई /प्रतिनिधी- दुष्काळाच्या झळा सोसणा-या शेतक-यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने जाहीर केलेल्या पाच हजार रुपयांच्या 'अग्रिम' मदतीची प्रतीक्षा अद्याप संपलेली नाही. दिवाळीपूर्वी पात्र शेतक-यांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, दिवाळी उलटून गेल्यानंतरही राज्यातील तब्बल ७१ लाख ८६ हजार ८१० शेतकरी या मदतीपासून वंचित आहेत.१६ नोव्हेंबरपर्यंतच्या उपलब्ध आकडेवारीनुसार राज्यातील १ कोटी ६६ लाख ५० हजार ४३१ पात्र शेतक-यांपैकी केवळ ९४ लाख २० हजार ६४६ शेतक-यांच्या खात्यातच अग्रिम रक्कम जमा झाली आहे. दुष्काळामुळे खरीप हंगामात हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. उत्पादनात घट, वाढता उत्पादन खर्च आणि आर्थिक अडचणींमुळे शेतकरी आधीच संकटात आहे. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांची अग्रिम मदत दिवाळीपूर्वी मिळेल, या अपेक्षेने शेतक-यांनी या रकमेची वाट पाहिली. मात्र, सण संपला तरी अनेकांच्या खात्यात मदतीची रक्कम प्राप्त झालेली नाही.

सांगली, बीड, पुण्यात मोठी प्रतीक्षा- जिल्हानिहाय आकडेवारी पाहता सांगली जिल्ह्यात ११ लाख ४ हजार ९७२, बीडमध्ये ८ लाख ५५ हजार ३३१ आणि पुणे जिल्ह्यात ८ लाख ३७ हजार ५३ शेतकरी अद्याप लाभाच्या प्रतीक्षेत आहेत. या तीन जिल्ह्यातील शेतक-यांना सरासरीच्या प्रमाणात मदत कमी मिळाली आहे.

दस-यापासून दिवाळीपर्यंत दीड महिन्यात १५५ शेतक-यांनी मृत्यूला कवटाळले- सणासुदीचा काळात कुटुंबीय एकत्र येऊन आनंद साजरा करतात. मात्र, सणासुदीलाच विदर्भातील अनेक कुटुंबांवर दु:खाचा डोंगर कोसळला. केवळ ऑक्टोबर महिन्यात १२७ शेतक-यांनी आपली जीवनयात्रा संपवली, तर नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या १६ दिवसांत २८ शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. यामध्ये यवतमाळ, अमरावती आणि वर्धा हे जिल्हे आत्महत्यांबाबतीत आघाडीवर असून, अमरावती विभागात तर दर आठ तासांना एका शेतक-याची आत्महत्या होत असल्याचे अत्यंत विदारक आणि सुन्न करणारे वास्तव समोर आले आहे.

अकोल्यातील ८२ हजार शेतकरी मदतीपासून वंचित- कोरड्या दुष्काळामुळे विदर्भातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत दुष्काळग्रस्त शेतक-यांना दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांची अग्रिम मदत देऊन त्यांची दिवाळी गोड करण्याचे आश्वासन राज्य सरकारने दिले होते. मात्र, अकोला जिल्ह्यातील ३ लाख ६ हजार पात्र शेतक-यांपैकी तब्बल ८२ हजार शेतक-यांना अद्याप ही मदत मिळालेली नाही, असा दावा आमदार नितीन देशमुख यांनी केला.

पुण्यात टिंबर मार्केटमधील ६० दुकाने आगीत जळाली

पुणे / प्रतिनिधी- पुण्यातील टिंबर मार्केट परिसरात बुधवारी मध्यरात्री भीषण आग लागून ५० ते ६० हून अधिक दुकानांना आगीची झळ बसली. जय वल्लभ शाळेजवळ लाकूड व लाकडापासून तयार केलेल्या वस्तूंची दुकाने असलेल्या परिसरात मध्यरात्री २ वाजून ५ मिनिटांनी ही आग लागली.आगीची माहिती मिळताच पुणे महापालिकेच्या अग्निशमन दलासह पुणे कॅन्टोन्मेंट आणि पीएमआरडीएच्या अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. एकूण २७ अग्निशमन वाहनांच्या साहाय्याने चारही बाजूंनी पाण्याचा मारा करण्यात आला. आगीच्या ठिकाणाशेजारीच रहिवासी वसाहत असल्याने आग घरांपर्यंत पोहोचू नये, यासाठी जवानांनी विशेष खबरदारी घेतली. अखेर दोन तासांच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. त्यानंतर घटनास्थळी कूलिंग ऑपरेशन करण्यात आले.या मोहिमेत मुख्य अग्निशमन अधिकारी गणेश सोनुने, उपमुख्य अग्निशमन अधिकारी विजय भिलारे, अग्निशमन अधिकारी राजेश जगताप, प्रमोद सोनावणे, कमलेश चौधरी, कैलास शिंदे, निलेश महाजन यांच्यासह सुमारे दहा अधिकारी आणि १५० जवान सहभागी झाले होते. महापालिकेचे सहाय्यक आयुक्त गुरम आणि त्यांची टीमही घटनास्थळी दाखल झाली होती. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनीही घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थितीची पाहणी केली.या घटनेत ५० ते ६० हून अधिक दुकानांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, नुकसानीचे नेमके स्वरूप अद्याप स्पष्ट झालेले नाही. आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारणही समजू शकले नाही. पोलिस दल, १०८ रुग्णवाहिका सेवा, महावितरण, महापालिकेचा वाहन विभाग, पाणीपुरवठा विभाग आणि स्थानिक नागरिकांनी मदतकार्याला सहकार्य केले. आगीमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती.



राज्यात थंडीचा तडाखा वाढला

बंगालच्या उपसागरात चक्रीवादळाचे संकट



मुंबई / प्रतिनिधी- राज्यात सध्या थंडीचा तडाखा वाढला असल्याचे दिसून येत आहे. नोव्हेंबर महिन्याच्या मध्यावर देशासह राज्यातही हवामानामध्ये अनेक बदल दिसून आले आहेत. एकीकडे थंडीमध्ये वाढ होत असताना दुसरीकडे भारतीय हवामान खात्याने देशात काही ठिकाणी पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. तसेच, महाराष्ट्रावर या चक्रीवादळाचा कसा परिणाम होणार? हेदेखील आता समोर आले आहे. बंगालच्या उपसागरातील अक्वान चक्रीवादळामुळे हवामानात मोठे बदल होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, १८ नोव्हेंबर रोजी राज्यात अंशत: ढगाळ वातावरण राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे. एकीकडे बंगालच्या उपसागरात तयार झालेले अक्वान चक्रीवादळ तीव्र होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरातील दक्षिण आणि पश्चिम-मध्य भागात अक्वान चक्रीवादळ सक्रिय आहे. त्यामुळे, १७ नोव्हेंबरच्या रात्री हे चक्रीवादळ चेन्नईपासून सुमारे ५९० किलोमीटर पूर्वेला होते. गेल्या काही तासांमध्ये ते तशी ३ किलोमीटर वेगाने उत्तर-वायव्य दिशेने सरकले आहे. १८ नोव्हेंबरच्या सकाळपर्यंत या चक्रीवादळाचे रूपांतर तीव्र चक्रीवादळात होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यानंतर, १९ नोव्हेंबरला त्याची तीव्रता आणखी वाढून ते अतितीव्र चक्रीवादळ बनू शकते, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

असे असणार हवामान- हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मुंबई, रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या कोकणातील जिल्ह्यांत हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. समुद्रकिनारी भागांत थंडीचा प्रभाव तुलनेने कमी जाणवणार असून दिवसा उकाडा आणि रात्री थंडी राहू शकते. तेच, पुणे आणि आसपासच्या परिसरात आकाश मुख्यत: निरभ्र राहण्याचा अंदाज आहे. पहाटे वातावरण थंड, तर दुपारी तुलनेने उबदार हवामान राहू शकते. तेच, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत अद्यापतरी पावसाचा कोणताही अंदाज वर्तविण्यात आलेला नाही.

लग्नसराईवर दुष्काळाचे सावट ; खर्च वाढणार, यंदा विवाहासाठी ५८ मुहूर्त

मुंबई /प्रतिनिधी- चातुर्मासाची सांगता आणि तुळशी विवाहानंतर यंदाच्या लग्नसराईला सुरुवात होणार आहे. नोव्हेंबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीत पंचांगानुसार तब्बल ५८ विवाह मुहूर्त असल्याने सनई-चौघड्यांचा निनाद ऐकू येणार असला, तरी यंदाच्या लग्नसराईवर पाणीटंचाई आणि दुष्काळाचे सावट राहण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागात पाण्याची टंचाई तीव्र होत असताना विवाह सोहळ्यांसाठी लागणा-या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी लागणार असल्याने आयोजकांच्या खर्चातही वाढ होण्याची शक्यता आहे.

यंदा विवाह मुहूर्तांची संख्या चांगली असल्याने मंगल कार्यालये, केटरर्स, बँड पथके, सजावट व्यावसायिक, फोटोग्राफर्स तसेच सराफ आणि कापड बाजारात लगबग सुरू झाली आहे. मात्र मागील काही वर्षांच्या तुलनेत यंदा विवाहसोहळ्यांच्या खर्चाचा ताळमेळ साधताना वधू-वरांच्या कुटुंबांना अधिक नियोजन करावे लागणार आहे.

पाण्याचा प्रश्न ठरणार महत्त्वाचा

विवाहसोहळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी लागते. स्वयंपाक, पिण्याचे पाणी, पाहुण्यांची व्यवस्था आणि स्वच्छता यासाठी पाण्याची गरज असते. ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये उन्हाळ्यापूर्वीच पाणीटंचाई जाणवत असल्याने मंगल कार्यालयांनाही पाण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी लागू शकते. त्यामुळे टँकर किंवा अन्य पर्यायी व्यवस्थेचा खर्च विवाहाच्या एकूण बजेटवर पडण्याची शक्यता आहे. दुष्काळी परिस्थितीचा आर्थिक परिणाम शेतकरी कुटुंबांवर अधिक जाणवण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोठ्या खर्चाचे विवाहसोहळे टाळून मर्यादित पाहुण्यांच्या उपस्थितीत साधेपणाने विवाह करण्याकडे काही कुटुंबांचा कल वाढू शकतो. पारंपरिक पद्धतीने कमी खर्चात विवाह करण्याला यंदा अधिक महत्त्व मिळण्याची शक्यता आहे.



बाजारपेठेला मात्र आशेचा किरण

विवाह मुहूर्तांची संख्या चांगली असल्याने सराफा, कापड, फुलविक्रेते, भांडी, फर्निचर, वाहन भाडे, केटरिंग, सजावट आणि फोटोग्राफी व्यावसायिकांना लग्नसराईतून चांगली उलाढाल अपेक्षित आहे. मात्र दुष्काळी परिस्थितीमुळे ग्राहकांच्या खर्च करण्याच्या क्षमतेवर परिणाम झाल्यास त्याचा थेट परिणाम या व्यवसायांवरही होऊ शकतो.

फेब्रुवारी, मेमध्ये सर्वाधिक मुहूर्त

पंचांगानुसार नोव्हेंबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीत ५८ विवाह मुहूर्त आहेत. नोव्हेंबरमध्ये २३, २४, २५, २६, २९, ३०; डिसेंबरमध्ये २, ३, ४, ९, १०, ११, १३, १४; जानेवारीत १६, १७, १८, १९, २२, २३, २८; फेब्रुवारीत २, ३, ५, ६, ७, ११, १२, १३, १८, १९, २०, २१; मार्चमध्ये २, ३, ६, ८, ९; एप्रिलमध्ये १६, १७, १८, २१, २२, २८; मेमध्ये २, ३, ४, ६, ७, १३, १४, २०, २१ आणि जूनमध्ये २, ३, ४, ११, १२ या तारखा आहेत.

पंचांगानुसार विवाह मुहूर्तांची रेलचेल असली तरी प्रत्यक्ष विवाहाची वेळ स्थानिक पंचांग आणि वधू-वरांच्या पत्रिकेनुसार बदलू शकते. त्यामुळे यंदाची लग्नसराई मंगलमय वातावरण घेऊन येत असली, तरी पाणीटंचाई आणि दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर खर्च, पाणी आणि पाहुणचाराचे नियोजन हे विवाह आयोजकांसमोरील महत्त्वाचे आव्हान ठरणार आहे.



आणखी ४ तालुके दुष्काळग्रस्त; मंत्रिमंडळाच्या उपसमितीने दिली मान्यता

मुंबई /प्रतिनिधी- राज्यातील चिपळूण, दिंडोरी, वाडा आणि विक्रमगड या चार तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यास मंत्रिमंडळाच्या दुष्काळ उपसमितीने मान्यता दिली आहे. त्यामुळे आता दुष्काळी तालुक्यांची संख्या ३०४ वरून ३०८ होणार आहे. तसेच दुष्काळाची मागणी होत असलेल्या हातकणंगले, गडहिंग्लज, कागल, करवीर यासह अन्य तालुक्यांचे निकषांनुसार संपूर्ण सर्वेक्षण केले जाणार आहे. त्यानंतर हे तालुकेही दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले जाऊ शकतात. त्यामुळे दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या वाढणार आहे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन मृद व जलसंधारण विभागाचा यापूर्वी मंजूर करण्यात आलेला पाच हजार कोटी रुपयांचा नियोजन आराखडा रद्द करून नव्याने आराखडा तयार करण्याच्या महत्त्वाच्या सूचना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत.

तब्बल २२०० ट्रेन नव्या यंत्रणेत

नवी दिल्ली : ४० वर्षे जुनी असलेली तिकीट आरक्षण प्रणालीत मोठे बदल केले जात आहेत. यानंतर आता २२०० ट्रेन नव्या यंत्रणेत समाविष्ट केल्या जाणार आहेत. या बदलामुळे तिकीट आरक्षण करणे अधिक सोपे होणार असल्याचे म्हटले जात आहे. देशातील एकूण रेल्वे तिकीट मागणीपैकी सुमारे ८९ टक्के मागणी ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे पूर्ण केली जाते.रेल्वे मंत्रालयाने २,२०० हून अधिक ट्रेन सुधारित प्रवासी आरक्षण प्रणालीवर हस्तांतरित केल्या आहेत. राष्ट्रीय वाहतूकदार कंपनीने ४० वर्षे जुन्या आरक्षण प्रणालीच्या जागी नवीन पीआरएस प्रणाली आणण्यासाठी ऑगस्ट महिन्यात ट्रेन हस्तांतरित करण्यास सुरुवात केली होती. ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत २,२०० पेक्षा जास्त ट्रेन नवीन पीआरएसवर स्थलांतरित करण्यात आल्या आहेत, जे सेंटर फॉर रेल्वे इन्फॉर्मेशन सिस्टम्स (सीआरआयएस) द्वारे विकसित केले जात आहे.दरम्यान, पीआरएस ही भारतीय रेल्वेद्वारे आरक्षित



रेल्वे तिकिटांचे व्यवस्थापन करण्यासाठी वापरली जाणारी एक संगणकीकृत प्रणाली आहे. या प्रणालीद्वारे प्रवासी तिकिटे बुक करू शकतात, बदलू शकतात आणि रद्द करू शकतात, तसेच आसन वाटप, प्रतीक्षा यादी, आरएसी स्थिती, आरक्षण तक्ते आणि प्रवाशांच्या चौकशी हाताळले जाते. या प्रणालीवर ट्रेन स्थलांतरित केल्याने तुम्हाला कन्फर्म तिकीट मिळेलच याची खात्री नाही. पीआरएसमध्ये स्थलांतरित झाल्याने आसनसंख्येत वाढ होईलच असेही नाही. कन्फर्म तिकिटांची उपलब्धता ट्रेनची क्षमता, मागणी, कोटा आणि उपलब्ध बर्थ यांवर अवलंबून असेल.नकाशे पहा

तिकीट बुकिंग होणार अधिक सोपे

अधिक ट्रेनसाठी आरक्षण एकाच प्रणालीद्वारे चालवले जाईल, ज्यामुळे बुकिंग करणे सोपे होईल. विविध ट्रेनमधील आसनांच्या उपलब्धतेची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होईल. जुन्या प्रणालीऐवजी आधुनिक तंत्रज्ञान येईल, ज्यामुळे अधिक चांगले तंत्रज्ञान उपलब्ध होईल. तिकीट बुकिंग, रद्द करणे आणि चार्ट तयार करण्याची प्रक्रिया अधिक सुव्यवस्थित होईल.

डॉलरच्या तुलनेत रुपया ७ महिन्यांच्या उच्चांकावर

नवी दिल्ली : अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाने गेल्या जवळपास सात महिन्यांतील सर्वोच्च पातळी गाठली आहे. विदेशी गुंतवणूकदारांकडून भारतीय शेअर बाजारात सुरू असलेली खरेदी, कच्च्या तेलाच्या किमतीमधील घसरण आणि डॉलरची कमजोरी या तीन प्रमुख कारणांमुळे रुपयाला मोठा आधार मिळाला. मंगळवारी बाजारातील सुरुवातीच्या व्यवहारात रुपया प्रति डॉलर ९३.५२ या पातळीवर पोहोचला. मागील सत्रातील बंद भावाच्या तुलनेत ही सुमारे ०.४ टक्क्यांची वाढ आहे. एप्रिल महिन्यानंतर रुपयाने गाठलेली ही सर्वोच्च पातळी ठरली आहे. रुपयाच्या या मजबुतीमागे विदेशी गुंतवणूकदारांचा भारतीय शेअर बाजाराकडे वाढलेला कल हे प्रमुख कारण मानलं जात आहे. नोव्हेंबर महिन्यात आतापर्यंत दिवाळीच्या विशेष ट्रेडिंग सत्राचा अपवाद वगळता विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी प्रत्येक व्यवहाराच्या दिवशी भारतीय बाजारात खरेदी केली आहे. या काळात त्यांनी भारतीय शेअर बाजारात एकूण ८४,१६७.४० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे.

ट्राफिक जामने घेतला २० महिन्यांच्या चिमुरड्याचा जीव

रायगड/ प्रतिनिधी- अलिबागमधून एक धक्कदायक बातमी समोर आली आहे. वाहतूक कोडीचा प्रश्न आता जीव घेण्यापर्यंत पोहचला आहे. अलिबाग तालुक्यातील बेलकडे-अलिबाग मार्गावरील ही घटना आहे. बेलकडे-अलिबाग मार्गावरील वाहतूक कोंडीमुळे अवघ्या एक वर्षे आठ महिन्याच्या चिमुरड्याचा दुर्दैवी अंत झाला. या चिमुकल्याने आपला जीव गमावल्याची घटना सोमवारी घडली. या घटनेमुळे सगळीकडेच संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बामणगाव येथील आरांश सुशील ठाकूर याने दुपारी दीड ते दोनच्या सुमारास खेळताना फुगा गिळला आणि त्याला ताडणीने वैद्यकीय मदत हवी होती. त्याची प्रकृती गंभीर झाली होती. कुटुंबीयांनी तातडीने त्याला रुग्णवाहिकेतून अलिबाग जिल्हा रुग्णालयाकडे घेऊन जायला निघाले. पण बेलकडे-अलिबाग मार्गावरील रस्त्याच्या कामामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकली. वाहतुकीचा वेग मंदावल्यामुळे रुग्णवाहिकेलाही वाहतूक कोंडीतून मार्ग काढणे कठीण झाले.दीड तासांच्या अंतराला तब्बल चार तास गेले. दुपारी सुमारे चारच्या सुमारास रुग्णवाहिका रुग्णालयात पोहोचली. पण तोवर वेळ निघून गेली होती. तोपर्यंत आरांशचा मृत्यू झाला होता. अवघ्या २० महिन्यांच्या चिमुरड्याचा जीव वाहतूक कोंडीने घेतला होता. या घटनेमुळे बामणगाव परिसरात शोककळा पसरली आहे.



मृतदेह घरी घेऊन जातानाही हाल- जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरानी त्याला मृत घोषीत केल्यानंतर त्याला परत घरी घेऊन जाण्यात आलं. आपण सर्वात गोष्ट म्हणजे त्याचा मृतदेह घरी घेऊन जातानाही त्याला वाहतूक कोंडीत अडकावे लागले. घरी जातानाही तब्बल दोन तासांहून अधिक वेळ लागला. या सगळ्या प्रकारामुळे ग्रामस्थांचा संताप अनावर झाला.

रुग्णवाहिकेतच मिळणार 'आयसीयू' दर्जाचे उपचार

रायगड/ प्रतिनिधी- जिल्ह्यातील अलिबाग येथे वाहतूक कोंडीत अडकल्याने २० महिन्यांच्या चिमुकल्याचा रुग्णवाहिकेतच मृत्यू झाल्याच्या हृदयद्रावक घटनेनंतर राज्य सरकारने आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे.अलिबागमधील दुर्दैवी घटनेवर तीव्र दु:ख व्यक्त करताना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, २०१३-१४ च्या दरम्यान राज्यात १०८ रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली होती. आता नव्या निविदा प्रक्रियेद्वारे ही सेवा अधिक अद्ययावत केली जात आहे. नव्या रुग्णवाहिकांमध्ये 'हॉस्पिटल ऑन व्हील्स' ही संकल्पना राबवली जाणार आहे. रुग्णवाहिकेत रुग्णाला घेतल्याक्षणीच तिथे आयसीयू बेडच्या धर्तीवर डॉक्टर्स आणि अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रणेमार्फत तात्काळ उपचार सुरू होतील. येत्या २ तारखेला मुंबईत या अद्ययावत १०८ सेवेच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण होणार असून, ३०० नव्या रुग्णवाहिका सेवेत दाखल होतील.सार्वजनिक आरोग्य विभागाचे काम अधिक गतिमान करण्यासाठी राज्यभरात 'आरोग्य संवाद यात्रा' सुरू करण्यात आली असून, याअंतर्गत आपण वर्धा आणि भंडारा जिल्ह्यांच्या २ दिवसीय दौ-यावर आलो आहोत. तसेच 'महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट'च्या संदर्भात डॉक्टरांसोबत महत्त्वाची बैठक घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



दोषी कंपन्यांना काळ्या यादीत टाकले- भंडारा आणि अमरावती येथील रुग्णालयांमध्ये घडलेल्या आगीच्या दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने कडक पावले उचलली आहेत. अमरावती घटनेतील दोषी यंत्रणेवर कारवाई करण्यासोबतच संबंधित कंपनीला काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्यात आले आहे. तसेच, खाजगी आणि शासकीय रुग्णालयांमधील व्हेंटिलेटरच्या वापराबाबत स्वतंत्र कार्यप्रणाली (एसओपी) जाहीर करण्यात आली आहे. .

बोगस प्रमाणपत्रांवर कारवाईचा इशारा- नागपूर येथील मानकापूर परिसरात तयार झालेल्या जिल्हा रुग्णालयाचे लोकार्पण पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार आगामी विधिमंडळ अधिवेशनाच्या दरम्यान केले जाईल. अशोक खरात याच्यावरील भ्रष्टाचाराच्या तक्रारी आणि परदेशातून एमबीबीएस करून एफएमजीई परीक्षा उत्तीर्ण न होता बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे वैद्यकीय व्यवसाय करणा-यांवर या प्रकरणाची सखोल माहिती घेऊन दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. दुष्काळी परिस्थितीमुळे नैराश्यात गेलेल्या शेतक-यांना आधार देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाची स्वतंत्र मानसिक आरोग्य यंत्रणा (विंग) कार्यरत आहे. पुढील टप्प्यात ही यंत्रणा अधिक गतिमान करून शेतक-यांना नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असेही प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

'रामायण' चित्रपट अडचणीत!; हिंदू संघटनांचा संताप

मुंबई/ प्रतिनिधी- बॉलिवूडमध्ये सध्या बहुचर्चित 'रामायण' चित्रपटावरून नवा वाद निर्माण झाला आहे. भगवान श्रीरामांची कथा मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असतानाच, काही हिंदू संघटनांनी चित्रपटातील कथानक आणि पात्रांच्या चित्रणावर आक्षेप घेतला आहे. मुंबईतील काही हिंदू संघटनांनी चित्रपटाच्या निर्मात्यांवर महर्षी वाल्मिकी यांच्या रामायणातील मूळ कथेत बदल केल्याचा आरोप केला आहे. तसेच प्रेक्षकांनी हा चित्रपट पाहू नये, असे आवाहन करत चित्रपटावर बहिष्कार टाकण्याची मागणी केली आहे.१७ नोव्हेंबर रोजी मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत हिंदू संघटनांच्या प्रतिनिधींनी चित्रपटातील काही दृश्यांवर नाराजी व्यक्त केली. चित्रपटात भगवान श्रीराम, माता सीता, लक्ष्मण आणि रावण या पात्रांचे चित्रण वाल्मिकी रामायणातील वर्णनापेक्षा वेगळ्या पद्धतीने करण्यात आल्याचा त्यांचा आरोप आहे.हिंदू जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य समन्वयक सुनील घनवट यांनी चित्रपटाला विरोध दर्शवला. त्यांच्या मते, चित्रपटाच्या नावाखाली सर्जनशील स्वातंत्र्यांचा आधार घेत रामायणाच्या मूळ कथेत बदल केले जात आहेत. त्यामुळे हिंदूंनी हा चित्रपट पाहू नये, असे आवाहनही त्यांनी केले. या संपूर्ण वादात रावणाच्या पात्रावर सर्वाधिक आक्षेप घेण्यात आला आहे. चित्रपटात रावणाला शोषितांचा रक्षक आणि गरिबांना सोन्याची घरे देणारा राजा म्हणून दाखवण्यात आल्याचा संघटनांचा आरोप आहे. रामायणातील रावणाच्या पारंपरिक चित्रणापेक्षा हे सादरीकरण वेगळे असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. चित्रपटातील वाद केवळ रावणाच्या भूमिकेपुरता मर्यादित नाही. काही विशिष्ट दृश्यांवरही हिंदू संघटनांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या आरोपानुसार, चित्रपटात रावणाने शूर्पणखेचा पती विद्युतजीव याची हत्या केल्याचे दाखवण्यात आले आहे. तसेच भगवान श्रीराम आणि लक्ष्मण रावणाच्या सैन्यापासून पळताना दिसत असल्याचा दावाही करण्यात आला आहे. याशिवाय माता सीता राक्षसांशी युद्ध करत असल्याचे दृश्य दाखवल्याबद्दलही संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. चित्रपटाच्या विरोधासोबतच हिंदू संघटनांनी केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ अर्थात सेन्सॉर बोर्डावरही प्रश्न उपस्थित केले आहेत. सुनील घनवट यांनी आरोप केला की, इतर धर्मांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊ नयेत यासाठी सेन्सॉर बोर्ड अधिक काळजी घेतं. मात्र, हिंदूंच्या धार्मिक विषयांशी संबंधित चित्रपटांच्या बाबतीत तितकी संवेदनशीलता दाखवली जात नाही.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

'लोकल सर्कल्स'चे सर्वेक्षण

महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घरभाडे, किराणा, मुलांची शाळेची फी, वीजबिल, औषधे आणि प्रवासाचा खर्च यांचे नियोजन केले जाते. मात्र महिन्याचे दोन आठवडे संपण्याआधीच या गणिताची घडी विस्कटू लागते. किराणा आणताना काही वस्तू कमी घ्याव्या लागतात, मुलांच्या एखाद्या गरजेची खरेदी पुढे ढकलावी लागते आणि बचतीसाठी बाजूला ठेवलेली रक्कम पुन्हा घरखर्चासाठी वापरावी लागते. ही परिस्थिती आज अनेक भारतीय कुटुंबांची झाली आहे. उत्पन्न वाढण्याचा वेग मर्यादित असताना जीवनावश्यक वस्तूंच्या किमती मात्र सातत्याने वाढत असल्याने सामान्य माणसाचे आर्थिक नियोजन कोलमडत असल्याच्या वास्तवाकडे लोकल सर्कल्सच्या ताज्या सर्वेक्षणाने लक्ष वेधले आहे. या सर्वेक्षणानुसार, गतवर्षाच्या तुलनेत जीवनावश्यक वस्तूंवरील मासिक खर्च २० टक्क्यांपेक्षा अधिक वाढल्याचे ६१ टक्के जणांनी सांगितले. या सर्वेक्षणात देशातील ३२६ जिल्ह्यांमधून एकूण एक लाख ३४ हजारांहून अधिक प्रतिसाद नोंदवण्यात आले होते. त्यामुळे ६१ टक्के हा संपूर्ण भारतीय कुटुंबांचा अधिकृत प्रतिनिधिक आकडा मानता येणार नाही. मात्र, नागरिकांना जाणवणाऱ्या आर्थिक ताणाचे हे महत्त्वाचे निदर्शक आहे. या पाहणीत तूप, लोणी आणि खाद्यतेले, ताज्या भाज्या, तांदूळ, गहू आणि इतर तृणधान्ये महाग झाल्याकडे नागरिकांनी निर्देश केला तर दूध, दुग्धजन्य पदार्थ, फळे आणि डाळींच्या किमतींबाबतही मोठ्या प्रमाणात तक्रारी नोंदल्या गेल्या. या वाढत्या खर्चाला सामोरे जाण्यासाठी कुटुंबांना मनोरंजन, बाहेरचे जेवण आणि खरेदी यासारख्या अनावश्यक खर्चात कपात करावी लागत आहे. दूध, दुग्धजन्य पदार्थ किंवा पौष्टिक आहाराचे सेवन तसेच फळे आणि भाज्यांचे प्रमाण घटवले आहे. ही परिस्थिती केवळ खरेदीच्या सवयी बदलण्यापुरती मर्यादित नाही. पोषण, शिक्षण, आरोग्य आणि भविष्यातील आर्थिक सुरक्षितता यांवरही तिचे परिणाम होऊ शकतात. महागाईसाठी सर्वसामान्य नागरिक सरकारला दोषी ठरवत असला तरी अनेक बाबी सरकारच्या नियंत्रणाबाहेर असतात याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. महागाईची कारणे शोधताना जागतिक परिस्थितीही पहावी लागते. रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील अनिश्चितता यांचा परिणाम कच्चे तेल, वाहतूक आणि उत्पादन खर्चावर होतो. भारताला कच्चे तेल आयात करावे लागत असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढल्या तर वाहतूक आणि मालवितरण महागते. त्याचा परिणाम अखेरीस किराणा, भाजीपाला आणि इतर वस्तूंच्या किमतींवर होतो. जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यास खाद्यतेल आणि काही अन्नपदार्थांच्या आयातीवरही दबाव निर्माण होतो. निसर्गातील बदल हे महागाईचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. उत्पादन घटले की बाजारातील आवक कमी होते आणि मागणी कायम असल्याने किमती वाढतात. यंदा अपुरा मान्सून आणि एल निनोच्या परिस्थितीचा फटका शेतकऱ्यांना आणि ग्राहकांना दोघांनाही बसतो. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर शिरीष चंद्र मुर्मू यांनीही नुकतेच भू-राजकीय तणाव आणि प्रतिकूल हवामानामुळे कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांवर अधिक आर्थिक दबाव येत असल्याचे स्पष्ट केले. कुटुंबांकडे पुरेशी बचत किंवा आर्थिक संरक्षण नसल्याने अचानक वाढलेला खर्च भागवण्यासाठी त्यांना कर्जाचा आधार घ्यावा लागतो. कर्ज घेण्यापूर्वी कर्जदारांना त्याच्या अटी स्पष्टपणे समजावून सांगण्यावरही त्यांनी भर दिला. या विधानाचा अर्थ लक्षात घेणे आवश्यक आहे. मुर्मू यांनी महागाई रोखण्यासाठी थेट व्याजदर कपात किंवा करसवलतींचा कार्यक्रम जाहीर केलेला नाही तर आर्थिकदृष्ट्या असुरक्षित कुटुंबांचे कर्जाच्या दुष्टचक्रापासून संरक्षण करण्याची भूमिका मांडली आहे. सूक्ष्म वित्त कर्जासाठी असलेली वार्षिक तीन लाख रुपयांची कौटुंबिक उत्पन्नमर्यादा पुन्हा तपासण्याचे संकेतही त्यांनी दिले. या उपायांचा संबंध महागाईच्या थेट नियंत्रणापेक्षा आर्थिक सुरक्षिततेशी अधिक आहे. दरम्यान, महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी केंद्र सरकारकडून विविध उपाय केले जात आहे. कांद्याच्या किमती नियंत्रित करण्यासाठी सरकारने २०२६-२७ मध्ये दोन लाख टनांचा राखीव साठा उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. तांदळाच्या बाबतीतही सरकारने महत्त्वाचे निर्णय घेतले. खाद्यतेलांच्या बाबतीतही आयात शुल्कात कपात करून देशांतर्गत पुरवठा वाढवण्याचा प्रयत्न झाला आहे. डाळींच्या आयातीसाठी काही प्रकारांवर सवलती कायम ठेवण्यात आल्या आहेत. महागाईचा सामना करण्यासाठी सरकारने बाजारातील साठेबाजीवर कठोर नियंत्रण ठेवणे, शेतमालाच्या साठवणुकीची आणि वाहतुकीची व्यवस्था सुधारणे, कृषी उत्पादनाला हवामानाच्या धक्क्यांपासून संरक्षण देणे आणि गरजू कुटुंबांपर्यंत अन्नसुरक्षेच्या योजना प्रभावीपणे पोहोचवणे आवश्यक आहे. किंमत स्थिरीकरणासाठी राखीव साठ्याचा वेळेवर वापर झाला पाहिजे. त्याचबरोबर कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना परवडणाऱ्या दरात अन्नधान्य मिळण्याची खात्री करावी लागेल. शेवटी महागाईविरोधातील लढाईचा केंद्रबिंद सामान्य माणसाची क्रयशक्ती, आर्थिक सुरक्षितता आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार असला पाहिजे. कारण घरातील चुलीचा खर्च भागवताना कुटुंबाचे भविष्यच पणाला लागणार असेल तर आर्थिक विकासाच्या दाव्यांचा सामान्य माणसाला काय उपयोग?

दुष्काळाविषयी अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञांचे खुले पत्र...

प्रति,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
(प्रत : केंद्रीय गृहमंत्री, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याणमंत्री)

मा. मुख्यमंत्री महोदय,

राज्य सरकारने नुकत्याच दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केलेल्या ३०४ तालुक्यांतील शेतकरी, शेतकामगार, स्त्रिया आणि युवकांच्या उपजीविकेविषयी चिंता निर्माण झालेला, अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञांचा एक समूह म्हणून आम्ही आपणास हे पत्र लिहीत आहोत.

वर्षातील ज्या काळात खरीप पिकाला पावसाची सर्वाधिक आवश्यकता असते त्या काळात, अर्थात ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२६ मध्ये अगदी कमी पाऊस झाला. पीक हातचे गेल्याची किंमत शेतकरी परिवार मोजत आहेतच. कामगारांना त्यांची मौल्यवान कामाची रोजंदारी गमवावी लागली आहे. मदत योजना बहुधा फेब्रुवारी २०२७ पर्यंत सुरू होणार नाहीत, परंतु कदाचित तोवर बराच उशीर झाला असेल. या आपत्तीचे निवारण करण्यासाठी तातडीने, तितक्याच मोठ्या प्रमाणावर उपाय योजणे आवश्यक आहे.

आम्ही गोळा केलेल्या माहितीनुसार, दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये ऑगस्ट २०२६ मध्ये सरासरीच्या केवळ ४४ टक्के आणि सप्टेंबर २०२६ मध्ये सरासरीच्या ४७ टक्के पाऊस पडला आहे. यापैकी २१० तालुक्यांत ७५ टक्के शेतकरी राहतात. तेथे ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत सरासरीच्या निम्म्यापेक्षाही कमी पाऊस नोंदवला गेला. ऑक्टोबरमध्ये जवळजवळ शून्य पाऊस पडला, त्यामुळे २५ ऑक्टोबरपर्यंत पावसाचे प्रत्यक्ष प्रमाण केवळ ७ टक्के इतकेच राहिले. राज्य सरकारने केलेल्या ३७ हजार ४९६ गावांच्या सर्वेक्षणानुसार, लागवडीखालील १६६ लाख हेक्टर जमिनीपैकी १४१.५ लाख हेक्टर जमिनीवरील ३३ टक्क्यांपेक्षा अधिक पिकाची हानी झालेली आहे.

२५ ऑक्टोबर २०२६ च्या आकडेवारीनुसार, जलाशयांमधील शिल्लक पाणीसाठा क्षमतेच्या ६६ टक्के इतकाच आहे. मागच्या वर्षी याच वेळी तो ८९ टक्के इतका होता. मराठवाड्यातील जलाशयांमधील शिल्लक पाणीसाठा क्षमतेच्या ४० टक्के असून धाराशीव, जालना, बीड आणि लातूरमधील धरणे जवळ जवळ कोरडी पडली आहेत. २२३ तालुक्यांमधील भूजल पातळी खालावली आहे. जनावरांना फेब्रुवारी २०२७ पर्यंत पुरेल इतकाच चारा उपलब्ध आहे, असा कयास आहे.

पाणी तसेच जमिनीतील ओलावा संपत चालल्यामुळे रब्बी पिकांची पेरणी होणारच नाही. ही आणीबाणीची परिस्थिती अकस्मात उद्भवलेली नाही. १९०१ पासूनची जवळ जवळ निम्मी वर्षे मराठवाड्याने दुष्काळाला तोंड दिले आहे. जून २०२६ मध्येच केंद्रीय कृषी मंत्रालयाने या वर्षी दुष्काळाचा अंदाज असलेल्या ३१५ जिल्ह्यांची यादी प्रसृत केली होती. योग्य प्रमाणात मदतीचे नियोजन करणे शक्य व्हावे यासाठी, ज्यावर लक्ष केंद्रित करावे अशा महत्त्वाच्या समस्या आपल्या निदर्शनास आणून देणे हा या पत्राचा उद्देश आहे.

१४ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासनाच्या ठरावात १२ सवलतींची यादी दिली आहे. परंतु रकमेची तरतूद केलेली नाही. कामाची रोजंदारी, पशू छावण्या, पाण्याचे टँकर आणि यासाठीचा खर्च यांचा त्यात उल्लेख नाही. नाव घेण्यासारखी एकच घोषणा आहे. ती म्हणजे प्रत्येक शेतकऱ्याला ५,००० रुपये अग्रिम रक्कम देण्याची योजना. दीड कोटी शेतकऱ्यांसाठी याची एकूण रक्कम ७,५०० कोटी रुपये एवढी होते. सर्वांत महत्त्वाची बाब अशी, की सरकारने नमो शेतकरी महासन्मान निधीचे प्रत्येक शेतकऱ्यासाठीचे ४,००० रुपयांप्रमाणे मागचे दोन हप्ते थकवले असल्याने प्रत्यक्षात प्रत्येकी १,००० हजार रुपये एवढाच खर्च सरकारला करावा लागेल.

पैसे खात्यात जमा करण्यासाठी जमीन नावावर असण्याची अट असल्यामुळे, खंडाने जमीन कसणारे तसेच जमिनीचा काही भाग कसणारे शेतकरी यातून वगळले जाणार आहेत. मागच्या वर्षी पूरपरिस्थिती उद्?भवल्यानंतर आपल्या सरकारने ३ हेक्टरपर्यंत हेक्टरी रु. १८,५०० ते रु. ३२,५०० एवढी नुकसानभरपाई देण्याची घोषणा केली होती. या वर्षी मात्र प्रत्येक शेतकऱ्याला केवळ ५.००० रुपये देण्याची घोषणा शासनाने केली आहे.

शेतीसाठीच्या कर्जाच्या प्रश्नासंबंधी, सरकारने कर्जाची पुनर्रचना करण्याचे आश्वासन दिले आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नवीन नियमांनुसार, २५ सप्टेंबर २०२६ नंतर, ३० दिवसांपेक्षा अधिक मुदत उलटून गेली असल्यास ते खाते यातून वगळले जाणार आहे. परिणामी, राज्यातील किसान क्रेडिट कार्ड धारकांच्या खात्यांपैकी थकीत किंवा अनुत्पादक (NPA) असलेली सुमारे ४५ टक्के खाती वगळली जाण्याची शक्यता आहे. तसेच कर्जमाफीऐवजी पुनर्रचनेची पद्धत अवलंबल्यास कर्जावरील व्याज वाढत जाईल. येथे हेही नमूद करायला हवे, की २०२६च्या कर्जमाफीचा लाभ आत्तापर्यंत केवळ ५० टक्के शेतकऱ्यांना मिळाला आहे.

केंद्र सरकारच्या, काहीसे हातचे राखून असलेल्या १६व्या वित्त आयोगाच्या काळातील मानकानुसार आणि कामाच्या अधिकृत मोबदल्यानुसार सुद्धा, दुष्काळासाठीच्या मदतीच्या खर्चाचा अंदाज सुमारे ४६,९०० कोटी इतका येतो. तो आता शब्द दिलेल्या मदतीच्या रकमेच्या सहा पट आहे.

खालील उपाययोजनांची त्वरित घोषणा करण्याचे आवाहन आम्ही राज्य सरकारला करत आहोत.

●मागेल त्याला काम/ प्रत्येक गरजू व्यक्तीस कामः प्रत्येक ग्राम पंचायतीअंतर्गत सार्वजनिक कामांचे उपक्रम तातडीने सुरू करावे. आमच्या अंदाजानुसार, जून २०२७ पर्यंत कमीत कमी ३०.२ कोटी कामाच्या दिवसांची तरतूद करावी लागेल. प्रति दिवस ३५० रुपये इतकी रोजंदारी एका आठवड्याच्या आत दिली जाईल, असे गृहीत धरल्यास अंदाजे १७,६०० कोटी रुपये इतका खर्च येईल. दुष्काळ जाहीर केलेल्या तालुक्यांमध्ये १२५ दिवसांच्या रोजगार हमीमध्ये आणखी ५० दिवसांची भर घालावी आणि शेतीच्या मुख्य हंगामातील ६० दिवस रोजगार हमीच्या कामांना विराम देण्यात येतो, त्यास स्थगिती द्यावी.

●काम करणे शक्य नसलेल्या कुटुंबांना रोख रक्कमः वयोवृद्ध व्यक्ती, अपंग व्यक्ती आणि लहान मुलांचे पालनपोषण करणाऱ्या एकल माता असलेल्या अंदाजित १०.२ लक्ष कुटुंबांना २०२७ च्या जूनपर्यंत मासिक रोख रक्कम देणे आवश्यक आहे. यासाठीची आम्ही अंदाजित केलेली रक्कम १७,२०० कोटी रुपये इतकी असेल.

●हातचे गेलेल्या पिकाची नुकसान भरपाईः खरीप पिकासाठी शेतकऱ्यांनी आधीच १.३१ लाख कोटी रुपये इतक्या रकमेची गुंतवणूक केलेली आहे. अतिशय कमी पाऊस पडला तेथे पिकांच्या लागवडीसाठीचा संपूर्ण खर्च आणि इतर प्रदेशांत अर्धा खर्च सरकारने दिला पाहिजे. ही रक्कम १,१३,००० कोटी किंवा प्रति हेक्टर सरासरी ८०,००० रुपये इतकी होईल. शेतकरी संघटनेने मागणी केलेल्या हेक्टरी एक लाख रुपये या आकड्याच्या जवळपासच आमचा हा अंदाज आहे. किमान अंतरिम देयक म्हणून २०२५ मधील राज्य सरकारच्या दराने २५,६०० रुपये कोटी रुपये सरकारने त्वरित दिले पाहिजेत. जो प्रत्यक्षात जमीन कसत असेल त्यालाच रक्कम मिळाली पाहिजे. यामध्ये ग्राम सभेने निश्चित केलेले खंडाने जमीन कसणारे, जमिनीचा काही भाग कसणारे आणि महिला शेतकरी यांचा समावेश होईल. २ हेक्टरची नेहमीची कमाल मर्यादा सध्या स्थगित केली पाहिजे.

●पशू छावण्या सुरू करणे आणि साठा संपण्यापूर्वी चारा छावण्याही उघडणेः फेब्रुवारी २०२७ पासून राज्यातील ७३ लाख पशूसाठी सुमारे १४,७०० छावण्यांची गरज असेल. मोठ्या गुरांसाठी प्रत्येकी रु. १२० आणि शेळ्या, मेंढ्यांसाठी चारा पुरवावा लागेल. याचा खर्च अंदाजे १७,९०० कोटी रुपये इतका येईल.

●पिण्याच्या पाण्याची तरतूद करणे : ८५ लाख लोकांसाठी सरकारला जास्तीत जास्त ९,००० टँकर्सची व्यवस्था करण्याचे नियोजन करावे लागेल. त्याबरोबरच, नळयोजना आणि विहिरींची दुरुस्ती युद्धपातळीवर केली पाहिजे. सरकारला याचा खर्च अंदाजे ६५० कोटी रुपये इतका येईल.

●शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, कर्जाची पुनर्रचना नको : दुष्काळ जाहीर केलेल्या तालुक्यांमधील शेतकऱ्यांची सर्व पीककर्जे आणि मुदत कर्जे मुद्दल आणि व्याजासह माफ केली पाहिजेत, यामध्ये थकित किंवा अनुत्पादक (NPA) खात्यांचाही समावेश असेल. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्याच सल्ल्यानुसार, राज्याने बँकांना संपूर्ण देयक ४५ ते ६० दिवसांत दिले पाहिजे. प्रस्तुत विचाराधीन कर्जाची रक्कम जास्तीत जास्त २.३४ लाख कोटी रुपये इतकी आहे. शासनाने येत्या हंगामासाठी नव्याने कर्ज मिळण्याची हमी दिली पाहिजे आणि सूक्ष्म वित्त संस्था, खासगी वित कंपन्या व सावकारांकडून होणारी सक्तीची वसुली थांबवली पाहिजे. वित संस्थेच्या वसुली एजंट/दलालांकडून झालेल्या कथित छळामुळे नांदेड आणि लातूरमध्ये शेतकऱ्यांचे मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

आमच्या अंदाजानुसार, कर्जमाफी वजा जाता, मदत उपक्रमांचा एकूण खर्च १,६६ लाख कोटी रुपये इतका आहे. जाहीर केलेल्या तालुक्यांमध्ये सार्वत्रिक शिधावाटप करावे आणि अंगणवाडी व शाळेच्या माध्यमातून पोषक पूरक आहार द्यावा अशी आमची मागणी आहे. तसेच ग्रामसभेने तपासणी/ लेखापरीक्षण केलेले काम, वेतन, पाणी, चारा आणि छावण्या यांचे हिशोब आठवड्यातून एकदा सर्वांसमक्ष मांडले जावे.

या वर्षीचा महाराष्ट्राचा आपती प्रतिसाद निधी ५,७१८ कोटी रुपये इतका आहे. केंद्राच्या नियमानुसार, या ठराविक प्रमाणाशिवाय अधिकचा खर्च, राज्य सरकारला स्वतःच्या अर्थसंकल्पातून करता येतो आणि त्याची घोषणा केल्यापासून दोन महिन्यांच्या आत केंद्राकडे मदतीची मागणी करता येते. राज्य सरकारने केंद्राकडे ३१,००० कोटींची मागणी केली आहे, परंतु ती केवळ खरीप पिकांची हानी भरून काढण्यासाठी आहे. रब्बी हंगामासाठी वेगळ्या मदतीची मागणी करावी लागेल. रोजगार, रोख मदत, पशू छावण्या वा पिण्याच्या पाण्यासाठी कुठलीही मागणी केलेली नाही. केंद्र सरकारची मानके पाळली तरी या सर्वांचा अंदाजे खर्च ३३,३०० कोटी रुपये इतका येईल. राज्य सरकारने याचीही मागणी केंद्राकडे करावी.

किती खर्च करावा हा सरकारची राजकीय निर्णय असेल. दुष्काळाने होरपळलेल्या कुटुंबांची परिस्थिती आणखी खालावू नये, हा आम्ही सुचवलेल्या मदतीच्या उपायांचा उद्देश आहे. आवश्यक तेवढ्या प्रमाणात अशा उपाययोजना केल्या नाहीत, तर वर्षाच्या शेवटी अनेक कुटुंबे आणखी दारिद्र्यात ढकलली जातील, त्यापैकी काहींना आपली मालमत्ता गमवावी लागेल तर काहींना प्राणही गमवावे लागतील.

मागील काही वर्षात कित्येक गरीब शेतकऱ्यांनी संकटांमुळे स्वतःचाच बळी घेतला आहे आणि या वर्षीही अशा घटना घडू लागल्या आहेत. म्हणूनच, पुरेसे मदतीचे उपक्रम राबवणे हे अतिशय गंभीरपणे आणि त्वरेने केले पाहिजे.

आपण इच्छा दर्शविल्यास, प्रस्तुत मागण्या पूर्ण करण्यासाठी उपयोगात येणाऱ्या कार्यपद्धतींचे तपशीलवार निवेदन आपणास देण्याची आमची तयारी आहे. आमच्या योजनेविषयी चर्चा करण्यासाठी आपली भेट घेण्याची संधी मिळाल्यास आम्हास आनंद होईल.

आपले नम्र,
डॉ. नीरज हातेकर आणि
डॉ. रितू दिवाण
समन्वयक, महाराष्ट्र
दुष्काळ निवारण मंच
(या पत्रावर विविध क्षेत्रातील ३२७ जाणकार आणि तज्ज्ञांच्या स्वाक्षऱ्या आहेत.)

अनुदानाचा वर्षाव; कर्जाला बळ!

केंद्र सरकारने रब्बी हंगाम २०२६-२७ साठी खत अनुदानात मोठी वाढ केली. प्रधानमंत्री मुद्रा योजनेतील सूक्ष्म उद्योग कर्ज हमी निधीला पाच वर्षांसाठी मुदतवाढ दिली. या हजारो कोटी रुपयांचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत, तसेच जाचक अटी दूर करून खऱ्या नवउद्योजकांपर्यंत पारदर्शकपणे पोहोचवणे, हेच सरकारसमोरील खरे आव्हान असेल.

जागतिक भूराजकीय अस्थिरता आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत अर्थव्यवस्थेचे दोन सर्वांत महत्त्वाचे आधारस्तंभ म्हणजे शेती आणि सूक्ष्म उद्योग क्षेत्र सुरक्षित ठेवण्यासाठी केंद्र सरकारने घेतलेले दोन ताजे निर्णय धोरणात्मकदृष्ट्या हे अत्यंत महत्त्वाचे ठरतात. रब्बी हंगाम २०२६-२७ साठी ६२,३७० कोटी रुपयांचे खत अनुदान मंजूर करून डीएपी खताच्या ५० किलोच्या गोणीचा दर १,३५० रुपयांवर कायम ठेवण्याचा निर्णय आणि त्याच वेळी प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत सूक्ष्म उद्योगांसाठीच्या कर्ज हमी निधीला पुढील पाच वर्षांसाठी मुदतवाढ देत पाच हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करणे, ही दोन्ही पावले ग्रामीण आणि निमशहरी अर्थचक्राला गती देणारी आहेत. एका बाजूला शेतीचा उत्पादन खर्च नियंत्रणात ठेवून बळीराजाला दिलासा देणे आणि दुसऱ्या बाजूला विनातारण कर्जपुरवठा सुलभ करून नवउद्योजकांना बळ देणे, असा दुहेरी उद्देश या निर्णयांमागे स्पष्टपणे दिसतो.

भारतीय शेती सध्या दुहेरी संकटाचा सामना करत आहे. डिझेल, बियाणे, कीटकनाशके आणि मजुरीचे दर सातत्याने वाढत असताना शेतमालाला किफायतशीर भाव मिळण्याची शाश्वती कमीच राहते. अशा स्थितीत रब्बीच्या पेरणीच्या ऐन हंगामात खतांचे दर वाढले असते, तर शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले असते. पश्चिम आशियातील तणाव आणि रशिया-युक्रेन संघर्षाचे पडसाद अद्यापही आंतरराष्ट्रीय खत व कच्च्या मालाच्या बाजारावर उमटत आहेत. भारत आपल्या स्फुरद आणि पालाशयुक्त खतांच्या गरजेसाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून असल्याने जागतिक दरवाढीचा थेट फटका देशांतर्गत बाजारपेठेला बसतो; मात्र सरकारने मागील रब्बी हंगामाच्या तुलनेत यंदा अनुदानात तब्बल २४,४१८ कोटी रुपयांची वाढ करून हा वाढीव आर्थिक भार स्वतःच्या तिजोरीवर घेतला आहे.

पोषक तत्त्व आधारित अनुदान योजनेअंतर्गत नत्र, स्फुरद, पालाश आणि गंधकाच्या प्रतिकिलो दरांत केलेली सुधारणा ही काळाची गरज होती. खतांचे दर स्थिर राहिल्यास शेतीचा उत्पादन खर्च मर्यादित राहतो आणि त्यातून अंतिमतः अन्नधान्य महागाई नियंत्रणात राहण्यास मदत होते. त्यामुळे खत अनुदान हा केवळ तिजोरीवरील खर्च न मानता अन्नसुरक्षा आणि ग्रामीण क्रयशक्ती टिकवून ठेवण्यासाठीची आवश्यक गुंतवणूक मानली पाहिजे; परंतु धोरणात्मक पातळीवर हजारो कोटी रुपयांची तरतूद करणे आणि प्रत्यक्षात शेताच्या बांधावर उभ्या असलेल्या शेतकऱ्याला त्याचा लाभ मिळणे यांत आजही मोठी दरी आहे. दरवर्षी पेरणीच्या काळात खतांच्या टंचाईच्या तक्रारी, विक्री केंद्रांबाहेरील लांबच लांब रांगा, काळाबाजार आणि छापील किमतीपेक्षा अधिक दराने होणारी विक्री हे चित्र बदललेले नाही. अनेकदा खतांसोबत इतर अनावश्यक कृषी निविष्ठा खरेदी करण्याची सक्ती विक्रेत्यांकडून केली जाते. आधार संलग्न विक्री यंत्रणा कार्यान्वित असूनही साठेबाजी आणि मध्यस्थांची साखळी पूर्णपणे मोडीत



निघालेली नाही. खतांचा हा अतिरिक्त बोजा सरकार उचलत असेल, तर त्याची फळे नफेखोरांच्या पदरात पडू नयेत, यासाठी पुरवठा साखळीवर कडक डिजिटल आणि प्रत्यक्ष देखरेख ठेवणे अनिवार्य आहे. त्यासोबतच, रासायनिक खतांचा असंतुलित वापर कमी करून सेंद्रिय पर्यायांना चालना देणे आणि खत उत्पादनात देशाला आत्मनिर्भर बनवणे, हे दीर्घकालीन धोरणही तितक्याच गांभीर्याने पुढे न्यावे लागेल.

कृषी क्षेत्रासोबतच सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग हे भारतीय अर्थव्यवस्थेचे दुसरे मोठे रोजगारनिर्मिती केंद्र आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने सोळाव्या वित्त आयोगाच्या कालावधीसाठी म्हणजेच २०३१ पर्यंत सूक्ष्म उद्योग कर्ज हमी निधी योजना कायम ठेवण्याचा घेतलेला निर्णय लहान व्यावसायिकांसाठी मोठा आधार ठरणार आहे. पाच हजार कोटी रुपयांच्या या निधीच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांत १२.६ लाख कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, बँका आणि वित्तीय संस्थांसाठीचे वार्षिक कर्ज हमी शुल्क एक टक्क्यांवरून शून्य पूर्णांक पंचाहत्तर टक्क्यांपर्यंत कमी केल्याने बँकांचा संकोच कमी होऊन लहान उद्योजकांना विनातारण कर्ज मिळण्याचा मार्ग अधिक सुकर होईल. सप्टेंबर २०२६ पर्यंत मुद्रा योजनेअंतर्गत ६० कोटींहून अधिक कर्जे मंजूर होऊन ४३ लाख कोटी रुपयांहून अधिक निधी वितरित झाला आहे, ही आकडेवारी या योजनेची व्याप्ती दर्शवते.

तथापि, कर्जाच्या आकड्यांच्या पलीकडे जाऊन या योजनेच्या वास्तविक परिणामांचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे. मुद्रा योजनेतून वितरित झालेल्या कर्जांपैकी मोठा हिस्सा हा अतिशय लहान रकमेच्या शिशू गटातील कर्जांचा असतो. या निधीतून खरोखरच किती नवीन उद्योग उभे राहिले, किती जणांना शाश्वत रोजगार मिळाला आणि किती व्यवसाय कर्जाच्या ओझ्यातून बाहेर पडून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाले, याचा सखोल लेखाजोखा मांडला गेला पाहिजे. अनेकदा बँकांकडून कागदपत्रांची क्लिष्ट पूर्तता मागितली जाते किंवा थकीत कर्जाच्या भीतीने पात्र लाभार्थ्यांना डावलले जाते. दुसरीकडे, अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण वाढू नये म्हणून कर्ज वितरणासोबतच नवउद्योजकांना आर्थिक साक्षरता, बाजारपेठेची जोडणी आणि तांत्रिक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. एकंदरीत, शेती आणि सूक्ष्म उद्योग या दोन्ही क्षेत्रांचे हितसंबंध परस्परांशी घट्ट जोडलेले आहेत. शेतकऱ्याच्या हातात चार पैसे शिल्लक राहिले, तरच ग्रामीण बाजारपेठेत मागणी निर्माण होते आणि त्यातूनच लहान व्यापारी व सूक्ष्म उद्योगांना चालना मिळते. जागतिक अनिश्चिततेच्या काळात सरकारने दाखवलेली ही आर्थिक संवेदनशीलता स्वागतार्ह असली, तरी तिचे यश हे केवळ घोषणांच्या भव्यतेवर नव्हे, तर शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणाऱ्या पारदर्शक अंमलबजावणीवरच अवलंबून राहणार आहे.

या दोन्ही योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केंद्र आणि राज्य सरकारांमधील समन्वयालाही विशेष महत्त्व आहे. खतांच्या उपलब्धतेचे नियोजन करताना जिल्हानिहाय मागणी, पिकांची पद्धत आणि पेरणीचे क्षेत्र यांचा अचूक अंदाज घेणे आवश्यक आहे. केवळ अनुदान मंजूर करून भागणार नाही, तर प्रत्येक शेतकऱ्याला योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात खत उपलब्ध होईल, याची खात्री करावी लागेल. त्याचप्रमाणे मुद्रा योजनेतील कर्जाचा लाभ ग्रामीण भागातील महिला उद्योजक, तरुण आणि पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कारागिरांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचवणे गरजेचे आहे.

डिजिटल अर्ज प्रक्रिया सुलभ करणे, कर्ज मंजुरीतील विलंब कमी करणे आणि लाभार्थ्यांना व्यवसायवृद्धीसाठी मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, यावर भर दिला पाहिजे. शेती आणि उद्योग क्षेत्रातील या आर्थिक पाठबळाचा उपयोग केवळ तात्पुरता दिलासा देण्यासाठी न होता उत्पादनक्षमता, रोजगारनिर्मिती आणि स्थानिक बाजारपेठांची क्षमता वाढवण्यासाठी झाला, तरच या निर्णयांचे व्यापक आर्थिक लाभ देशाला मिळू शकतील.

प्रसाद पाटील

गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

वजनात 255 ग्रॅमची चोरी यवतमाळात ग्राहकांची खुलेआम लूट!

भाजीपाला विक्रेत्यांकडून मापात पाप,वैधमापन विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि . १८ : शहरातील प्रमुख चौकांमध्ये भाजीपाला विक्रीच्या नावाखाली ग्राहकांची वजनात फसवणूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. किलोभर मालाच्या मोबदल्यात ग्राहकांच्या हातात पाव किलोहून अधिक माल कमी पडत असेल, तर ही केवळ वजनातील तफावत नसून सर्वसामान्यांच्या खिशावर पडणारा उघड दरोडाच म्हणावा लागेल. विशेष म्हणजे, हा प्रकार सुरू असताना वैधमापन विभाग नेमकी कोणती कारवाई करीत आहे, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.



सध्या यवतमाळ शहरात तुरीच्या शेंगा आणि वटाण्यांच्या शेंगांची मोठ्या प्रमाणात विक्री सुरू आहे. दत्त चौक, स्टेट बँक चौक, आर्णी नाका यासह शहरातील विविध प्रमुख ठिकाणी हातगाड्यांवरून आणि इतर माध्यमांतून विक्रेते शेंगांची विक्री करीत आहेत. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी 'सव्वा किलो ५० रुपये', 'अडीच किलो १०० रुपये' अशा आकर्षक दरांच्या घोषणा केल्या जात आहेत. मात्र, प्रत्यक्ष वजनातच ग्राहकांची फसवणूक होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आर्णी नाका परिसरातून एका ग्राहकाने ५० रुपये किलो दराने एक किलो तुरीच्या शेंगा खरेदी केल्या. त्यानंतर मित्राच्या दुकानात वजन केले असता प्रत्यक्षात केवळ ७४५ ग्रॅम शेंगा भरल्या. म्हणजेच तब्बल २५५ ग्रॅम शेंगा कमी! पैसे मात्र पूर्ण एक किलोचे वसूल करण्यात आले. हा अनुभव ग्राहकांची कशी लूट होत आहे, याचे बोलके उदाहरण ठरतो. ऋतुमानानुसार बाहेरून येणारे व्यापारी आणि स्थानिक विक्रेते यांच्या माध्यमातून हा प्रकार सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. मात्र, सर्वच विक्रेत्यांना दोषी ठरविण्याऐवजी प्रत्यक्ष तपासणी करून सत्य समोर आणणे आवश्यक आहे. ग्राहकांची अशी उघड फसवणूक होत असताना वैधमापन विभागाचे भरारी पथक रस्त्यावर कधी उतरणार? विक्रेत्यांची वजनकाटी तपासण्याची जबाबदारी कोणाची? केवळ कार्यालयात बसून कारभार चालविण्याऐवजी संबंधित विभागाने शहरातील प्रमुख चौकांमध्ये अचानक तपासणी मोहीम राबवावी. दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. अन्यथा वजनातील या पापामुळे ग्राहकांची लूट सुरूच राहणार आणि प्रशासनाचा निष्क्रियपणा त्याला अप्रत्यक्षपणे खतपाणी घालणार, अशी संतप्त भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

न्यायालयीन कर्मचारी न्यायापासून वंचित; सुधारित वेतनश्रेणीसाठी राज्यव्यापी बेमुदत संप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पांढरकवडा, दि . १८ : दुय्यम न्यायालयातील न्यायिक कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १७ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी बेमुदत संप पुकारला आहे. या आंदोलनाला पांढरकवडा-केळापूर येथील कार्यरत तसेच सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही पाठिंबा दर्शविला आहे.

महाराष्ट्र राज्यातील समान कामासाठी समान वेतन या प्रलंबित मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. शासनाकडून वारंवार मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने कर्मचाऱ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांमध्ये महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी (गट क) संघटनेच्या मागणीनुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करणे, समान कामास समान वेतन देणे, तसेच न्यायालयीन कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्कांचे लाभ मिळवून देणे आदी मागण्यांचा समावेश आहे. या आंदोलनामुळे न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असून, शासनाने तातडीने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन आंदोलनाची दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

थोडक्यात

सहा नगरपंचायतींना १२ कोटींचा निधी, आता प्रत्यक्ष विकासकामांचे नियोजन

प्रत्येक नगरपंचायतीच्या वाट्याला दोन कोटी

यवतमाळ : जिल्ह्यातील सहा नगरपंचायतींच्या विकासकामांसाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत तब्बल १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पालकमंत्री संजय राठोड यांनी सुचविलेल्या कामांना उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास विभागाने हिरवा कंदील दिला असून, यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित झाला आहे. मात्र, निधी मंजूर होण्यापलीकडे प्रत्यक्षात दर्जेदार आणि वेळेत कामे पूर्ण होण्याचे आव्हान आता संबंधित नगरपंचायतींसमोर असणार आहे. कळंब, बाभूळगाव, मारेगाव, महागाव, राळेगाव आणि झरीजामणी या सहा नगरपंचायतींना प्रत्येकी दोन कोटी रुपये याप्रमाणे एकूण १२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. या निधीतून विविध प्रभागांमधील रस्ते, मूलभूत सुविधा आणि स्थानिक गरजांशी संबंधित विकासकामे मार्गी लावण्याचे नियोजन आहे. संबंधित नगरपंचायतींच्या माध्यमातून या कामांची अंमलबजावणी केली जाणार आहे. नगरपंचायत क्षेत्रांमध्ये अनेक ठिकाणी मूलभूत सुविधांचा प्रश्न कायम आहे. त्यामुळे मंजूर निधीचा विनियोग नेमका कोणत्या कामांसाठी होतो, कामांची निवड करताना स्थानिक गरजांना प्राधान्य मिळते का आणि खर्चाच्या तुलनेत कामांचा दर्जा राखला जातो का, याकडे नागरिकांचे लक्ष राहणार आहे. पालकमंत्र्यांच्या पाठपुराव्यामुळे निधी मंजूर झाला, ही सकारात्मक बाब असली तरी केवळ निधीची घोषणा म्हणजे विकास नव्हे. मंजूर कामे कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरली आणि नागरिकांना त्याचा लाभ मिळाला, तरच या १२ कोटींच्या निधीचे सार्थक होणार आहे.



बाळासाहेबांच्या स्मृतींना शिवसैनिकाकडून अभिवादन,पुसदच्या शिवसेना कार्यालयात श्रद्धांजली कार्यक्रम

पुसद : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या चौदाव्या स्मृतिदिनानिमित्त शिवसेना (शिंदे गट) पुसद तालुका व शहर कार्यकारिणीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी नवीन पुसद येथील पापीनवार बिल्डिंग मधील शिवसेना कार्यालयात श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. बाळासाहेबांनी मराठी माणसाच्या हक्कांसाठी उभारलेला लढा, हिंदुत्वाची भूमिका आणि शिवसेनेच्या उभारणीत दिलेले योगदान यांचे स्मरण यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला दीपक काळे, विकास जामकर, तालुकाप्रमुख संजय बयास, शहरप्रमुख दीपक उखळकर, अनिल चव्हाण, संतोष दरणे, बाबुराव पाईकराव, अनिल तोंडारे, विशाल पेन्शनवार, शाम ठाकूर, योगेश भाकरे, राजीक देशमुख, सोपीनाथ माने, तेजस कान्हेड, अशोक नेमाडे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते. बाळासाहेबांचे विचार आणि त्यांनी शिवसैनिकांमध्ये रुजवलेली संघटनात्मक बांधिलकी जपण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.



वसंत सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा शुभारंभ

शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

उमरखेड : तालुक्यातील पोफाळी येथील वसंतनगर परिसरातील वसंत सहकारी साखर कारखान्याच्या वतीने संचालित कारखान्यात गळीत हंगाम २०२६-२७ चा शुभारंभ मोळी व मशीन पूजनाने मोठ्या उत्साहात करण्यात आला. रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी आयोजित या सोहळ्याला राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. या शुभारंभ सोहळ्याप्रसंगी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते मोळी व मशीन पूजन करण्यात आले.यावेळी खासदार संजय देशमुख, माजी खासदार हेमंत पाटील, आमदार बाळाजी कल्याणकर, आमदार आनंद मंडारकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रमेश चव्हाण, आमदार बाबुराव कोहळीकर, आमदार किसनराव वानखेडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजय राव देशमुख यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यानंद जाधव यांनी केले. गळीत हंगामाच्या शुभारंभामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी हंगामात ऊस गाळपाला गती मिळण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

वाढदिवसाचा खर्च टाळून पशुधनाला विमा कवच माने दाम्पत्याचा सामाजिक पुढाकार!

१२१ दुधाळ जनावरांसाठी ६० लाख ५० हजारांचे विमा संरक्षण

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



उमरखेड, दि . १८ : दुष्काळात पिकांसोबतच पशुधनाचेही अस्तित्व धोक्यात येत असताना शेतकऱ्यांच्या आर्थिक आधाराला संरक्षण देण्यासाठी डॉ. विजयराव माने आणि ॲड. अर्चना माने यांनी वाढदिवसानिमित्त अनोखा सामाजिक उपक्रम राबविला आहे. तालुक्यातील १२१ दुधाळ गायी व म्हशींना एकूण ६० लाख ५० हजार रुपयांचे विमा कवच देण्याचा संकल्प त्यांनी केला आहे.

शेतकऱ्यांसाठी दुधाळ जनावरे हे केवळ पशुधन नसून कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन आहे. दुष्काळ, चारा-पाण्याची टंचाई आणि पशुखाद्याच्या वाढत्या किमतींमुळे पशुपालक आधीच आर्थिक संकटात आहेत. अशा परिस्थितीत जनावरांचा मृत्यू किंवा आजारपणामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी विमा संरक्षणाचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तालुका दूध संघाचे अध्यक्ष देवानंद मोरे यांच्या देखरेखीखाली या उपक्रमाची अंमलबजावणी होणार आहे. उमरखेड येथे दूध उत्पादक असोसिएशनच्या सभेत या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. संगम चिंचोली येथील शिवाजी रानबाजी नवसागरे यांच्या शेतातील गायी-म्हशींची ऑनलाइन विमा नोंदणी करून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. शिवानी मल्टीसर्विसेसचे संचालक पवन हामंद आणि एआयसी विमा प्रतिनिधी विजय चव्हाण यांचे सहकार्य लाभत आहे. "शेतकऱ्यांच्या पशुधनाला आर्थिक संरक्षण देण्याचा डॉ. विजयराव माने यांचा संकल्प स्तुत्य असून, वाढदिवस सामाजिक बांधिलकीतून साजरा करण्याचा हा आदर्श आहे," अशी प्रतिक्रिया देवानंद मोरे यांनी व्यक्त केली. यावेळी बालाजीराव च. वानखेडे, शिवाजीराव माने, आनंदजी मते, विलास नावडे, सुनील वानखेडे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

दिग्रसमध्ये तरुणाच्या कमरेला गावठी पिस्तूल! स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई ५० हजारांचे अग्निशस्त्र मॅग्झीनसह जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि . १८ : दिग्रस शहरात अवैध शस्त्र बाळगण्याचा प्रकार उघडकीस आला असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका २० वर्षीय तरुणाला गावठी पिस्तूल बाळगताना रंगेहात पकडले. त्याच्याकडून मॅग्झीनसह अंदाजे ५० हजार रुपये किमतीचे देशी बनावटीचे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले आहे.

१७ नोव्हेंबर रोजी पोलिसांना दिग्रस येथील खंडाई रोडवरील आरोग्यधाम हॉस्पिटलच्या मागील बाजूस एक तरुण कमरेला गावठी पिस्तूल खोचून फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पंचांसह घटनास्थळी धाव घेतली. संशयिताची झडती घेतली असता त्याच्याकडे गावठी पिस्तूल आढळले. पोलिसांनी आर्यन विनोद खंडारे (वय २०, रा. पाटील नगर, दिग्रस) याला ताब्यात घेतले. अग्निशस्त्र बाळगण्याचा कोणताही वैध परवाना त्याच्याकडे नसल्याचे तपासात स्पष्ट झाले. त्यामुळे पिस्तूल जप्त करून त्याच्याविरुद्ध दिग्रस पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ३ व २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकातील पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे व सहकाऱ्यांनी ही कारवाई केली. अवैध अग्निशस्त्र शहरात पोहोचतातच कशी आणि तरुणांच्या हातात ती येण्यामागे कोणते स्रोत आहेत, याचा सखोल तपास होणे गरजेचे आहे.

दुर्गंधीने रावेरीकराचे आरोग्य धोक्यात तक्रारदारला ग्रामसेवकाची धमकी!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

राळेगाव, दि . १८ : तालुक्यातील रावेरी येथे सडलेल्या माशांच्या दुर्गंधीमुळे नागरिकांचे जगणे कठीण झाले असून, आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेष म्हणजे, या समस्येबाबत ग्रामपंचायतीकडे दाद मागण्यासाठी गेलेल्या नागरिकालाच ग्रामसेवका कडून धमकी मिळाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांचा तक्रारींचे निवारण करण्याची जबाबदारी असलेल्या ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रावेरी येथील वार्ड क्रमांक २ मध्ये गणेश पुरुषोत्तम जामुनकर यांच्या घराशेजारी राहणारे बबन नान्हे हे अंगणात मासे सुकवत असल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत असल्याची तक्रार आहे. सडलेल्या माशांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून आरोग्यालाही धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. या समस्येची तक्रार घेऊन ग्रामपंचायत कार्यालयात गेलेल्या गणेश जामुनकर यांना ग्रामसेवक उंबरकर यांनी सहकार्य करण्याऐवजी, 'काम शिकवू नका, खोट्या फौजदारी गुन्ह्यात अडकवून टाकेन,' अशी धमकी दिल्याचा आरोप तक्रार अर्जात करण्यात आला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित तक्रारींची दखल घेण्याऐवजी तक्रारदारालाच धमकावले जात असेल, तर ग्रामपंचायतीकडे न्याय मागायचा तरी कुणाकडे? असा सवाल उपस्थित होत आहे. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दुर्गंधी पसरविणाऱ्यांवर तसेच अरेरावीच्या आरोपांची सत्यता आढळल्यास संबंधित ग्रामसेवकावरही कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

आदिवासी जनजाती गौरव सप्ताह निमित्त शासकीय आश्रम शाळेत वैद्यकीय तपासणी संपन्न.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि . १८ : शासकीय माध्यमिक आश्रम शाळा खेरखेडा तालुका पुसद जिल्हा यवतमाळ येथे आदिवासी जनजाती गौरव दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी ही वैद्यकीय पथकाच्या मार्फत करण्यात आली.

यानिमित्ताने डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना आरोग्य आणि आहार यांचा सहसंबंध हा उघडून सांगितला. त्याचबरोबर शरीर निरोगी कसे राहील याविषयी मार्गदर्शन केले विशेषतः आश्रम शाळेमध्ये विद्यार्थी निवासी एकत्र राहत असल्याने साथीचे रोग किंवा संसर्गजन्य त्वचारोगापासून स्वतःची कशी काळजी घ्यावी या संदर्भाने सुद्धा विद्यार्थ्यांना माहिती दिली. विविध आजारांविषयी असणारे समाज गैरसमज याबाबतीत सुद्धा वैद्यकीय पथकाने विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. सदरील कार्यक्रम हा प्रकल्प अधिकारी पुसद अमोल मेतकर यांच्या संकल्पनेतून घेण्यात आला. या कार्यक्रमामुळे निश्चितच आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांचे शरीर निरोगी राहण्याकरिता उपयोग होईल. याप्रसंगी शाळेतील मुख्याध्यापक डॉ. अशोक झुंजारे व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी गण उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ माध्यमिक शिक्षक ए.पी.राठोड सर यांनी केले तर आभार प्रदर्शन हे एस.जे.अजगर सर यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या शाळाही चोरट्यांच्या निशाण्यावर!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी, दि . १८ : गावातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणाऱ्या शाळेलाही चोरट्यांनी सोडले नाही. शाळेला सुट्टी असल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी पिंप्रळ पठार येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या कार्यालयाचे कुलूप तोडून चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.

या प्रकारामुळे शैक्षणिक संस्थांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ५ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत शाळेला सुट्टी होती. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी शाळेच्या कार्यालयाला लक्ष्य केले. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी शिक्षक व कर्मचारी शाळेत पोहोचले असता कार्यालयाच्या दरवाजाचे कुलूप तुटलेले, तर आतील कपाट उघड्या अवस्थेत आढळले. कार्यालयाची पाहणी केली असता दप्तर, शालेय रेकॉर्ड आणि इतर साहित्याची चोरी झाल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांना याबाबत कळविण्यात आले. या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करून चोरट्यांचा शोध घेण्याची मागणी होत आहे. विशेष म्हणजे, शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीशी संबंधित महत्त्वाचे दस्तऐवज आणि साहित्य असते. अशा ठिकाणी सुरक्षेची पुरेशी व्यवस्था नसल्यास चोरट्यांचे धाडस वाढणारच. शाळांच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल या घटनेच्या निमित्ताने उपस्थित होत आहे. पोलिसांनी या चोरीची गांभीर्याने दखल घेऊन तपास करावा आणि शाळेतील चोरीचा छडा लावावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

४,७३१ गावांवर जलसंकटाचे सावट, १२९ कोटींच्या टंचाई आराखड्याला मंजुरी!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि . १८ : जिल्ह्यातील ग्रामीण भागावर आगामी उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाईचे सावट गडद होण्याची शक्यता आहे. तब्बल ४ हजार ७३१ गावे आणि वाड्यांमध्ये संभाव्य जलसंकट लक्षात घेऊन जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने तयार केलेल्या २०२६-२७ च्या टंचाई निवारण कृती आराखड्याला जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली आहे. तब्बल १२९ कोटी २६ लाख २० हजार रुपयांच्या खर्चातून १० हजार २९२ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

मात्र, टंचाईचा अंदाज बांधण्यापलीकडे प्रत्यक्ष उपाययोजनांची अंमलबजावणी कितपत वेळेत होणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. हा आराखडा तीन टप्प्यांत विभागण्यात आला आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर या पहिल्या टप्प्यात १,७२३ गावे-वाड्यांसाठी ६,१७९ उपाययोजना प्रस्तावित असून, त्यासाठी ७१ कोटी १३ लाख ६५ हजार रुपये खर्च अपेक्षित आहे. जानेवारी ते मार्चदरम्यान १,५७८ गावांसाठी २,१७० उपाययोजनांवर ३३ कोटी २४ लाख ५ हजार रुपये खर्च होणार आहेत. तर एप्रिल ते जून या कालावधीत १,४३० गावांसाठी १,९६३ उपाययोजना आखण्यात आल्या असून, २४ कोटी ८ लाख ५० हजार रुपयांची तरतूद अपेक्षित आहे. विशेष म्हणजे, यंदा तब्बल ८६३ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विंधन विहिरी, विहिरींचे अधिग्रहण, खोल करणे, नळ योजनांची दुरुस्ती आणि जलस्रोत बळकटीकरण अशा उपाययोजनांचा यात समावेश आहे. जिल्ह्यातील हजारो गावांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागणार असल्याचे चित्र आराखड्यातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे मंजूर निधी वेळेत उपलब्ध होणे, कामे उन्हाळ्यापूर्वी पूर्ण होणे आणि टँकरपुरवठ्यात पारदर्शकता राखणे, याकडे प्रशासनाला विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. अन्यथा कोट्यवधींचा आराखडा कागदावरच राहण्याची भीती आहे. मंजूर आराखडा पुढील कार्यवाहीसाठी विभागीय आयुक्तांकडे सादर करण्यात आला आहे.

फुलसावंगीत डेंग्यूचा संशय,तीन रुग्ण आढळल्याने आरोग्य यंत्रणेची चिंता वाढली!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

फुलसावंगी, दि . १८ : फुलसावंगी परिसरात ताप, हिवताप, सर्दी, पडसे आणि डेंग्यू सदृश्य आजारांनी डोके वर काढले असून खासगी दवाखान्यांमध्ये रुग्णांची गर्दी वाढत आहे. विशेष म्हणजे, मागील दहा ते बारा दिवसांत प्रभाग क्रमांक दोनमध्ये डेंग्यू सदृश्य आजाराचे तीन रुग्ण आढळल्याची माहिती समोर आल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

सायराबानो कमर खान (वय ६५), साहिबा सिराज सोहेल खान (वय २७) आणि मुजीब खान अजीज खान पठाण (वय ६०) अशी या रुग्णांची नावे आहेत. त्यांच्यावर नांदेड व पुसद येथे उपचार सुरू असल्याचे समजते. याच प्रभागात काही संशयित रुग्ण असल्याचीही चर्चा असून ते बाहेरगावी उपचार घेत असल्याची माहिती आहे. मात्र, या रुग्णांना डेंग्यूचे निदान झाल्याची अधिकृत पुष्टी झालेली नाही. दुसरीकडे, दोन महिन्यांपासून ग्रामपंचायतीचा कारभार प्रशासकांच्या हाती असताना गावातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. प्रशासक सुरेश चव्हाण आणि ग्रामसचिव विनोद चव्हाण यांनी केवळ दोन वेळाच ग्रामपंचायतीला भेट दिल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. सांडपाण्याच्या नाल्या तुंबल्या असून रस्त्यांवर ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. अशा परिस्थितीत डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी ठोस उपाययोजना मात्र दिसून येत नाहीत. डेंग्यू सदृश्य रुग्ण आढळत असताना प्रशासन आणखी किती दिवस परिस्थिती गंभीर होण्याची वाट पाहणार? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. तातडीने फॉगिंग, नाल्यांची स्वच्छता आणि कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची मागणी होत आहे. याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विठ्ठल सल्लावार म्हणाले, "आमच्या वाह्यरुग्ण विभागात सध्या एकही डेंग्यू सदृश्य रुग्ण आढळलेला नाही. खासगी दवाखान्यांतून परस्पर पुसद किंवा नांदेड येथे उपचार घेत असलेले रुग्ण पॉझिटिव्ह असल्यास गावात चौकशी करून लवकरच फॉगिंग मशीनद्वारे मच्छरनाशक फवारणी करण्यात येईल."

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

स्थलांतरित पक्ष्यांनी यंदा फिरवीली

अप्पर वर्धा जलाशयाकडे पाठ

अमरावती/का.प्र.

दरवर्षी हिवाळ्याच्या आगमनासोबतच देशी-विदेशी पक्ष्यांच्या किलबिलाटाने गजबजून जाणारा मोर्शी येथील नळ-दमयंती सागर (अप्पर वर्धा धरण) परिसर यंदा मात्र पूर्णपणे शांत आणि अबोल झाला आहे. धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होऊन काठ तब्बल एक ते दोन किलोमीटर आत सरकल्याने, या जलाशयाकडे दरवर्षी आकर्षित होणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांनी यंदा या परिसराकडे पाठ फिरवल्याचे चित्र समोर आले आहे.

मुबलक अन्नासाठी उत्तर गोलार्धातून पक्षी हिवाळ्यात स्थलांतर करत असतात. भारतामध्ये येणारे पक्षी मंगोलिया, सायबेरिया, रशिया, उझबेकिस्तान आणि कझाकिस्तान तसेच युरोपातील देशांमधून या जलाशयावर स्थलांतर करतात. या पक्ष्यांमध्ये प्रामुख्याने राजहंस, कलहंस, चक्रवाक, तलवार बदक, थापट्या बदक, तरंग बदक, भुवईबदक तसेच युरोपातील काही देशांमधून काळा करकोचा, कुरव, सुरय, मोर शराटी येतात.



यंदा मान्सूनने महाराष्ट्राच्या बहुतांश भागात ओढ दिल्याने विदर्भ आणि मराठवाड्यात तीव्र दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचा थेट फटका केवळ शेती आणि पिण्याच्या पाण्यालाच बसला नसून, जैवविविधता आणि पक्षीजीवनावरही गंभीर परिणाम झाला आहे. नुकत्याच करण्यात आलेल्या पक्षी निरीक्षणादरम्यान सिंभोरा धरणाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यालगत असलेल्या आयटीआयच्या मागील बाजूस जलाशयाचे पात्र पूर्णपणे कोरडे पडल्याचे आढळून आले.

दरवर्षी या काळात येथे गल,राजहंस, नदी सुरय, गॉडविट, आर्ली यांसारख्या विविध प्रजातींच्या स्थलांतरित पक्ष्यांची मोठी मांदियाळी पाहायला मिळते. थव्याथव्याने अन्न शोधणारे हे पक्षी या परिसराला जिवंतपणा आणत असतात. मात्र, यंदा पाण्याची पातळी कमालीची

'तदितर खग भेणें वेगळाले पळाले, उपवन-जन केली जे कराया मिळाले' रघुनाथ पंडितांच्या 'नल-दमयंती स्वयंवर' आख्यानातील या काव्यपंक्तींची प्रचिती आज या जलाशयाची अवस्था पाहून येत आहे.

प्र. सु. हिरुरकर,
निसर्गप्रेमी आणि पक्षी निरीक्षक

खालावल्याने संपूर्ण परिसरात शुकशुकाट पसरला आहे. या पाहणीत केवळ दोन हळदी-कुंकू पक्ष्यांचे कुटुंब, तीन शेकाट्या, दोन उघड्या चोचीचे करकोचे आणि चार टिटव्या इतक्याच मोजक्या स्थानिक पक्ष्यांचे दर्शन घडले.

वाढते जागतिक तापमान, 'एल-निनो'चा प्रभाव, वितळणारे हिमनग आणि गेल्या तीन-चार दशकांपासून मानवाने विकासाच्या नावाखाली केलेले निसर्गाचे अपरिमित दोहन यामुळे निसर्गचक्र बिघडले आहे. निसर्गाच्या या हासामुळे आज स्थलांतरित पक्ष्यांवर आपला मार्ग बदलण्याची वेळ आली आहे. हीच परिस्थिती कायम राहिल्यास भविष्यात मानवावरही पाण्यासाठी स्थलांतर करण्याची वेळ येईल की काय, अशी भीती पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

संक्षिप्त


लता शेटे यांचे मरणोत्तर नेत्रदान



अमरावती-संभाजी नगर येथील रहिवासी स्व. लता भगवंत शेटे यांचे नुकतेच निधन झाले. शेटे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळले, परंतु अशाही परिस्थितीत मुलगा ज्ञानेश्वर शेटे यांनी आपली आई स्व.लता शेटे यांचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. दिशा ग्रुप व दिशा एज्युकेशन फाऊंडेशन द्वारा संचालित दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मदाय नेत्रपेढीने मरणोत्तर नेत्रकमळ दान करून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली.नेत्रदानाचे पवित्र कार्य केल्याबद्दल दिशा एज्युकेशन फाऊंडेशन व दिशा इंटरनॅशनल आय बँकच्या संचालक मंडळाद्वारे शेटे कुटुंबियांचे आभार व्यक्त करण्यात आले. शेटे परीवाराला नेत्रदान केल्याबद्दल मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा अंतर्गत नेत्रदानाचे प्रमाणपत्र देण्यात आले.

उद्या जातनिहाय जनगणना परिषद

अमरावती-समाज क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त अखिल भारतीय काँग्रेस कमिटी (ओबीसी विभाग) आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत महात्मा ज्योतिबा फुले द्विशताब्दी जयंती उत्सव समितीच्या वतीने उद्या शुक्रवार २० नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वा कोटला मार्ग नवी दिल्ली येथील इंदिरा भवन येथे म. फुले द्विशताब्दी जयंती उत्सव तथा जातनिहाय जनगणना परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर परिषदेला काँग्रेसचे राष्ट्रीय नेतृत्व, महाराष्ट्रातील खासदार, प्रदेशस्तरीय पदाधिकारी, ओबीसी समाजाचे नेते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



परिषदेचे उद्घाटन राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थान अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अनिल जयहिंद भूषविणार आहेत.कार्यक्रमाला खासदार तथा माजी केंद्रीय मंत्री मुकुल वासनिक,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी विधानसभा अध्यक्ष नानाभाऊ पटोले, विजय वडेट्टीवार जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकारी समितीच्या सदस्या तथा माजी मंत्री यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा काँग्रेस कार्यकारी समितीचे सदस्य आणि गोवा राज्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, राजीव घुटे, राजाभाऊ हाडोळे, ओबीसी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मनोज अंबाडकर, विदर्भ प्रसिद्धी प्रमुख अॅड प्रभाकर वानखडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मानसिक आरोग्याबाबत जनजागृतीचा संदेश

इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन
श्रावणी बागडे प्रथम



अमरावती/का.प्र.

मानसिक आरोग्य हे निरोगी आणि आनंदी जीवनाचा महत्त्वपूर्ण आधार असून, मानसिक आजारांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे काळाची गरज आहे. याच उद्देशाने विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीद्वारा संचालित इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयात मानसिक स्वास्थ्य दिनानिमित्त 'मानसिक आजार आणि मानसिक स्वास्थ्य' या विषयावर आधारित पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींनी विविध संदेशपूर्ण पोस्टर्सच्या माध्यमातून मानसिक आरोग्याचे महत्त्व, मानसिक आजारांविषयीची जागरूकता आणि सकारात्मक विचारांची आवश्यकता प्रभावीपणे मांडली.

नुकतेच आयोजित या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय कोल्हे आणि विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावतीच्या कार्यकारिणी सदस्य डॉ. प्रा. पूनमताई चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थिनींच्या कलात्मक सादरीकरणाचे कौतुक केले तसेच त्यांना प्रोत्साहन दिले. या पोस्टर प्रदर्शनामध्ये विद्यार्थिनींनी मानसिक स्वास्थ्य, मानसिक आजारांची कारणे, त्यावरील उपाययोजना, तणाव व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्याबाबत सामाजिक दृष्टिकोन अशा विविध विषयांवर माहितीपूर्ण व जनजागृतीपर पोस्टर्स सादर केले.

स्पर्धेत श्रावणी बागडे हिने प्रथम क्रमांक पटकावला.धनश्री वानखडे हिने द्वितीय, तर ज्ञानेश्वरी तायडे हिने तृतीय क्रमांक मिळविला.या संपूर्ण प्रदर्शनाचे आयोजन मानसशास्त्र अभ्यास मंडळाच्या विद्यार्थिनींनी केले. संचालन मानसशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. अरुणा तसरे यांनी केले.मानसिक आरोग्याविषयी खुलेपणाने संवाद साधणे, गैरसमज दूर करणे आणि गरजूंना योग्य वेळी मानसिक आधार देणे, हा सकारात्मक संदेश या प्रदर्शनातून देण्यात आला.

राजकमल रेल्वे ब्रिज प्रकरणावरून काँग्रेस आक्रमक

२६ रोजी मशाल आंदोलन;अमरावती बंदची तयारी

अमरावती/का.प्र.

शहराची लाईफ लाईन म्हटल्या जाणाऱ्या राजकमल रेल्वे ब्रिजच्या नवनिर्माणाचे गेल्या सव्वा वर्षापासून सुरू आहे.या कामाबाबत होत असलेल्या विलंबाची लेखी कारणे स्पष्ट करावी यासह शहर जिल्हा काँग्रेसने जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन दिले.

निवेदनात शहरातील सर्वात महत्त्वाच्या ब्रिजच्या नवनिर्माणात झालेल्या सव्वा वर्षाच्या विलंबाची लेखी कारणे स्पष्ट करण्याची,रेल्वे-सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित पक्षांची समन्वय बैठक बोलावण्याची आणि प्रकल्पासाठी मंजूर निधी, आतापर्यंत झालेला खर्च व निधीअभावी काम थांबल्या बाबतचा तपशील मागण्यात आला. यासंदर्भात २६ नोव्हेंबर रोजी मशाल मार्च काढण्यात येणार आहे.याकडे प्रशासनाने लक्ष दिले नाहीतर अमरावती बंद करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, या उड्डाणपुलाचे बांधकाम निश्चित कालबद्ध कार्यक्रम तयार करून पूर्ण करण्याची अंतिम तारीख लेखी स्वरूपात जाहीर केली जावी. आरओबी बांधकामा बाबत कोणतीही तांत्रिक, प्रशासकीय किंवा आर्थिक अडचण असल्यास ती दूर करण्याच्या उपाययोजनेचा तपशीलही प्रशासनाकडे



मागितला. राजकमल रेल्वे ब्रिज हा शहराच्या वाहतुकीसाठी महत्त्वाचा प्रकल्प आहे.तसेच शहरातील नागरिकांना वाहतुकीच्या मूलभूत सुविधेपासून वंचित ठेवून त्यांच्या संयमाची परीक्षा घेतली जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात तात्काळ लक्ष घालून सार्वजनिक बांधकाम, रेल्वे प्रशासन आणि इतर यंत्रणांची संयुक्त बैठक बोलवावी, अशी मागणी करण्यात आली.

सव्वा वर्षात ब्रिज पूर्णपणे तोडलाही गेला नाही, यावरून कामाची गती कळते. यामुळे आता काँग्रेस आक्रमक झालेली आहे. मागण्या पूर्ण नाही झाले तर तीव्र आंदोलन करणार असल्याचे निवेदन देण्यात आले आहे. निवेदन देतेवेळी बबलू शेखावत, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल, स्वीकृत नगरसेवक मिलिंद चिमोटे, नगरसेवक अनिता कौल, प्रशांत महल्ले, लखन तंवर, राजश्री जठाले, धीरज हिवसे, मालती गवई, डॉ. अर्चना आवाम, अस्मा फिरोज खान, विक्की बानखडे, सुनिता मले, ललिता रनावा, डॉ. संजय शिरभाते, अफसर जही, मो. रेहान आदी अनेक काँग्रेस पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

जी एच रायसोनी विद्यापीठात

अॅमेथिस्ट टोस्टमास्टर्स क्लबची कार्यकारिणी गठीत

विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व व नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी विशेष उपक्रम

अमरावती/का.प्र.

जीएच रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथे अॅमेथिस्ट टोस्टमास्टर्स क्लबचे औपचारिक चार्टरिंग समारंभ नुकताच पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये सार्वजनिक वक्तृत्व, प्रभावी संवाद कौशल्य आणि नेतृत्व क्षमता विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाची सुरुवात अतिथींचे स्वागत आणि दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी जीएच रायसोनी बिझनेस स्कूल, नागपूरच्या संचालिका डॉ. आरती देशपांडे, टोस्टमास्टर्सच्या मुख्य मार्गदर्शिका डॉ. मनीषा झिल्पेलवार, कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे,विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत



अवचट, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल,कम्युनिकेशन ट्रेनर तथा टोस्टमास्टर्स क्लब इंचार्ज अश्विनी राठी आणि विद्यार्थी मार्गदर्शिका रानी त्रिवेदी उपस्थित होत्या.

क्लब इंचार्ज अश्विनी राठी यांच्या मार्गदर्शनाखाली नवगठित क्लबच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. प्रांजल जाधव यांची अध्यक्षपदी, आदित्य वानखेडे यांची सल्लागारपदी, श्रेयांश पाटील यांची उपाध्यक्षपदी आणि प्रेरणा भेलावे यांची सार्जंट-अॅट-आर्म्सपदी निवड झाली. जनरल कौन्सिल सदस्यांचा परिचय, बॅज अलंकरण, सॅश वितरण आणि शपथग्रहण समारंभही झाला. डॉ. मनीषा झिल्पेलवार यांनी पदाधिकाऱ्यांना शपथ दिली.

कार्यक्रमात टोस्टमास्टर्स इंटरनॅशनलच्या पाथवेज लर्निंग प्रणालीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. प्रत्येक पाथमध्ये किमान १४ प्रकल्प असतात, ज्याद्वारे सार्वजनिक वक्तृत्व, संवाद, नेतृत्व आणि इतर ३०० हून अधिक कौशल्ये विकसित करता येतात. हे सर्व ऑनलाइन बेस कॅम्प प्रणालीद्वारे उपलब्ध असून, विद्यार्थी स्वतःच्या गतीने आणि गरजेनुसार प्रगती करू शकतात. यासोबतच भाषण स्पर्धा आणि नेतृत्व विकासाच्या विविध संधींचीही माहिती देण्यात आली.

प्रदर्शनात्मक बैठकीत जान्हवी हाडोले,अनुष्का सोलाओ आणि आदित्य वानखेडे यांनी उत्कृष्ट भाषणे केली. अनुष्का सोलाओला सर्वोत्कृष्ट वक्ता, वंशिका अग्रवालला सर्वोत्कृष्ट सहाय्यक भूमिका आणि सक्षम चौधरीला सर्वोत्कृष्ट प्रमुख भूमिकेसाठी सन्मानित करण्यात आले.

अंजनगाव सुर्जीत वाहतूक पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

वाहनचालकांना विनाकारण त्रास देत असल्याची सभापतींची पोलीस अधीक्षकांकडे तक्रार

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

शहरातील वाहतूक कोंडीच्या समस्येकडे दुर्लक्ष करून एका विशिष्ट ठिकाणी उभे राहून वाहनचालकांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी अंजनगाव सुर्जी नगर परिषदेचे बांधकाम सभापती इब्राहिम बेग हसन बेग यांनी थेट अमरावती जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दाखल केली असून, संबंधित ट्रॅफिक पोलीस कर्मचाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

१७ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक, अमरावती यांना दिलेल्या निवेदनात सभापती इब्राहिम बेग यांनी वाहतूक पोलिसांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या निवेदनाच्या प्रती उपविभागीय पोलीस अधिकारी आणि अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांनाही देण्यात आल्या आहेत.निवेदनात नमूद केल्यानुसार, अंजनगाव सुर्जी शहरातील ज्या प्रमुख चौकांमध्ये आणि रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते, त्या ठिकाणी वाहतूक पोलीस कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नाहीत. परिणामी, नागरिकांना आणि प्रवाशांना दररोज वाहतूक कोंडीचा मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. मात्र, दुसरीकडे वाहतूक पोलीस कर्मचारी राजाराम मेसरे हे शहरातील एका विशिष्ट ठिकाणी उभे राहून वाहनचालकांना वारंवार अडवून जाणीवपूर्वक त्रास देत असल्याचा गंभीर आरोप सभापतींनी केला आहे. वाहतूक नियमांची अंमलबजावणी करणे हे पोलिसांचे कर्तव्य असले तरी, अधिकाराचा



वापर सामान्य नागरिकांना वेठीस धरण्यासाठी होता कामा नये. अशा मनमानी कारभारामुळे नागरिकांमध्ये पोलीस प्रशासनाबद्दल असंतोष पसरत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

या प्रकरणाची केवळ औपचारिक दखल न घेता प्रत्यक्ष चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी सभापतींनी केली आहे.संबंधित वाहतूक पोलीस कर्मचारी राजाराम मेसरे यांच्या वर्तनाची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत निष्पक्ष चौकशी करावी.त्यांनी वाहनचालकांवर केलेल्या कारवाईच्या नोंदी, दंडाच्या पावत्या आणि परिसरातील उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करावी.अधिकारांचा गैरवापर किंवा जाणीवपूर्वक त्रास दिल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर कठोर विभागीय व कायदेशीर कारवाई करावी. शहरातील वाहतूक कोंडी होणाऱ्या प्रमुख ठिकाणी कर्मचारी नियमित का उपस्थित राहत नाहीत, याची चौकशी करून तिथे कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त नेमावा.

नगरसेवकांना पत्रकारांची बॅटिंग भारी!

नगरसेवक विरुद्ध पत्रकार संघ क्रिकेट सामन्यात पत्रकारांचा २३ धावांनी दणदणीत विजय

चांदुर रेल्वे/वार्ताहर

चांदूर रेल्वे शहरात आयोजित नगरसेवक विरुद्ध पत्रकार संघाच्या रंगतदार क्रिकेट सामन्यात पत्रकार संघाने आपल्या दमदार फलंदाजी आणि भेदक गोलंदाजीच्या जोरावर नगरसेवकांच्या संघावर २३ धावांनी दणदणीत विजय मिळविला. या सामन्यामुळे मैदानावर चांगलाच उत्साह आणि खेळाचा थरार पाहायला मिळाला.



सुयश बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित क्रिकेट स्पर्धेअंतर्गत पत्रकार संघ आणि नगरसेवक संघ यांच्यात हा सामना रंगला. प्रथम फलंदाजी करताना पत्रकार संघाने केवळ एक खेळाडू बाद होऊ देत ६३ धावांची दमदार मजल मारली. त्यानंतर नगरसेवकांच्या संघासमोर विजयासाठी ६४ धावांचे आव्हान ठेवण्यात आले.मात्र, पत्रकार संघाच्या गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर गोलंदाजी करत नगरसेवकांच्या फलंदाजांना मैदानावर टिकू दिले नाही. वजियाचे ६४ धावांचे लक्ष्य गाठण्याच्या प्रयत्नात नगरसेवकांचा संपूर्ण संघ अवघ्या ४१ धावांवर बाद झाला. परिणामी पत्रकार संघाने तब्बल २३ धावांनी विजयावर शिक्कामोर्तब केले.

विशेष म्हणजे, मैदानावर नेहमी जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका मांडणाऱ्या पत्रकारांनी यावेळी क्रिकेटच्या मैदानावरही आपली ताकद दाखवून दिली. तर नगरसेवकांना पत्रकारांच्या गोलंदाजीचा सामना करताना चांगलीच कसरत करावी लागली.या सामन्याच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी आणि पत्रकार यांच्यातील सलोखा, मैत्री आणि क्रीडाभावनेचे सुंदर दर्शन घडले. विजयामुळे पत्रकार संघाच्या खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

चारगड लघु प्रकल्पातून रब्बी हंगामासाठी सिंचनाचे पाणी उपलब्ध

तातडीने अर्ज करण्याचे आवाहन

अमरावती/का.प्र.

चारगड लघु प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना आगामी रब्बी हंगाम २०२६-२७ साठी प्रकल्पातील पाणीसाठा उपलब्ध असून, सिंचनासाठी कालव्याद्वारे आणि नदी-नाल्यांवरील उपसाद्वारे दोन पाळ्यांमध्ये पाणी देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. इच्छुक लाभधारक शेतकऱ्यांनी तातडीने संबंधित उपविभागीय कार्यालयात पाणी मागणीचे अर्ज सादर करावेत, असे आवाहन मध्यम लघु पाटबंधारे विभागाचे (अचलपूर) कार्यकारी अभियंता श्री.गु.उमप यांनी केले आहे.

चारगड लघु प्रकल्प मुख्य कालवा ० कि.मी. ते ३.४८ कि.मी. व त्यावरील वितरिका ७.३७ कि.मी. व त्यावरील सर्व लघु कालवे व उप लघुकालवे ,विमोचक, जलाशयावरील अधिसुचित नदी-नाल्यांवरील लाभधारकांना हे पाणी उपलब्ध आहे. तूर, हरबरा, कापूस, मिरची, भाजीपाला, हळद व इतर रब्बी पिकांसाठी पाणी दिले जाणार असून त्यासाठी शेतकऱ्यांनी या पिकांची पेरणी नोव्हेंबर २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. बंदिस्त नलिका संचालन कार्यक्रम हा प्राप्त मागणी क्षेत्रानुसार करण्यात येणार आहे.

पाणी मागणीसाठी पाणी मागणी अर्ज 'नमुना नं. ७' सोबत शेतीचा सातबारा उतारा जोडणे अनिवार्य असून नमुना नं. ७ अ आणि ७ ब चे कोरे अर्ज उपविभागीय कार्यालयात विनामूल्य उपलब्ध आहेत. अर्ज करतांना शेतकऱ्यांना मागील थकबाकीपैकी एक तृतीयांश (१/३) रक्कम आणि चालू हंगामाची अग्रिम पाणीपट्टी भरणे बंधनकारक आहे. सिंचन पाळी सुरू होण्यापूर्वी शेतकऱ्यांनी आपली शेतचारी स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे.

शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचवण्यासाठी 'टेल टू हेड' (पुच्छ भागाकडून मुखाकडे) पद्धतीने सिंचन केले जाईल. तसेच शेतकऱ्यांनी दिवस-रात्र पाणी घेणे बंधनकारक असून, कोणीही परस्पर गेट उघडून पाण्याचा अपव्यय करू नये. विहिरीवरील शेतचारी आणि बंदिस्त नलिका यांमध्ये किमान तीन मीटरचे अंतर असावे. दोन पाळ्यांमध्ये साधारण १० दिवसांचे अंतर राहणार असल्याने, हलक्या जमिनीत पर्यायी पाण्याची व्यवस्था असल्याशिवाय भुईमुगासारखी पिके घेऊ नयेत असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच नैसर्गिक आपत्ती व काही अपरिहार्य कारणास्तव ,अन्य तांत्रिक कारणास्तव पाणी पुरवठा शक्य नझाल्यास व त्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास मध्यम व लघु पाटबंधारे विभाग अचलपूर जबाबदार राहणार नाही असेही कळविण्यात आले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय



अमरावती शहराचा आत्मा म्हणजे राजकमल चौक. सध्या या चौकातील रेल्वे स्टेशन पुलाच्या नवनिर्माण कामाला प्रारंभ झाला असून रेल्वे पुलाचा काही भाग पाडण्यात आला आहे. ड्रोनद्वारे पुलाच्या बांधकामाचे टिपण्यात आलेले छायाचित्र.

शेती-समाजावरील साधे सरळ भाष्य...



वसुधा सरदार यांना २०११ मध्ये महाराष्ट्र शासनाचा सेंद्रिय कृषिभूषण पुरस्कार मिळालेला आहे. परंतु ही त्यांची एकमेव ओळख नाही; समाज परिवर्तनाच्या चळवळीतील प्रत्यक्ष सहभाग आणि नेतृत्व या प्रक्रियेतून घडलेली, ग्रामीण महिलांच्या साथीने दारुमुक्तीचे पथदर्शी आंदोलन उभारणारी एक कार्यकर्ती त्यांच्यात सतत वस्तीला आहे. शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्त्या या दोन्हीही भूमिकांचे प्रतिबिंब त्यांच्या या लेखनात उमटलेले आहे. पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे हे साधे सरळ आणि संवादी लेखन आहे.

पुस्तकातील लेखांची मांडणी 'सामाजिक', 'महिला', 'दारूमुक्ती', 'सेंद्रिय शेती', 'निसर्ग आणि माणूस' आदी सात विभागांत केलेली आहे. गावोगावच्या महिला मंडळाचे कार्यक्रम आणि बचत गटांच्या बैठकांत म्हटल्या जाणाऱ्या वसुधाताईंनी रचलेल्या 'सावित्रीच्या ओव्या', 'शिकले होते म्हणून बाई सारे बदलले' या व इतर प्रसिद्ध गाण्यांचा समावेश देखील या पुस्तकात करण्यात आलेला आहे. पुस्तकातील लेखांमध्ये गोष्टी, किस्से, संवाद, कविता यांची रेलचेल आहे. समाजातील खटकणाऱ्या गोष्टींवर बोट ठेवताना लेखिकेची संवेदनशीलता आणि विनोदबुद्धी दोन्हीही जाग्या आहेत. 'हे असंच चालायचं' या लेखात लेखिकेकडे स्वयंपाकाचे काम करणाऱ्या मावशी एकेदिवशी त्या कामाला येणार नाहीत व त्यांच्या स्वतःच्या घरच्या पुरणपोळीच्या जेवणाचे ताट त्या लेखिकेसाठी घेऊन येणार आहेत असे तिला सांगतात. लेखिका जेव्हा 'मधेच कसल्या पुरणपोळ्या?' अशी चौकशी करते तेव्हा रूढी परंपरांचा आणि त्यासाठी काढलेल्या कर्जाचा संदर्भ देत, 'आमची पद्धत आहे, करावंच लागतं', असे त्या सांगतात. हे ऐकून लेखिकेला गावातील एका रंग उडालेल्या, पत्रा फाटलेल्या गाडीच्या मागे 'हे असंच चालायचं' असे लिहिले असते त्याची आठवण होते. लग्न, बारसे, मयताचे दिवस, जावळे अशा एकेका कारणापोटी कर्ज काढून ते फेडण्यात आयुष्य खर्ची पडते त्याबद्दल विचार करणे नाकारून 'करावाच लागतो' म्हणून प्रसंग साजरा करत राहणे म्हणजे मोडकळीला आलेल्या गाडीसारखीच अवस्था असताना त्याच्या दुरुस्तीचा गांभीयनि विचार न करता 'हे असंच चालायचं' म्हणून ते मोडकेपण वागवत जगण्यासारखे आहे हे ध्यानात येते.

दारूची सामाजिक प्रतिष्ठा कमाल उंचावलेली असण्याच्या काळात 'आम्हाला एवढी दारू सापडते तुम्हाला कशी मिळत नाही?' असे पोलिसांना खडसावणाऱ्या महिलांच्या दारूमुक्तीच्या लढ्याची कथा आपल्याला या पुस्तकात वाचायला मिळते. 'दारूमुक्ती' या विभागातील लेखात आपले गाव वर्षभरात हातभट्टीच्या दारूवर किती पैसे खर्च करते याची नेमकी आकडेमोड करणारे तरुण आणि महिला भेटतात. एक गाव हातभट्टीवर पन्नास लाख रुपये खर्च करते आणि हातभट्टीवाले खूप श्रीमंत होताना दिसत नाहीत म्हणजे शेवटी हा सगळा पैसा कुठे जात असेल ते देखील समजते. महिलांच्या आंदोलनामुळे राज्यात पहिल्यांदाच एक बीअरबार कसा बंद झाला, याची कहाणी देखील वाचकांना येथे वाचता येईल, दारुमुक्तीचा प्रश्न एवढा महत्त्वाचा आहे की या क्षेत्रात दिशादर्शक काम करणाऱ्या लेखिकेने या कामाबद्दल अधिक तपशीलवार लेखन केले पाहिजे, असे हे लेख वाचून माझ्या मनात आले.

सेंद्रिय शेती या विभागात शेताव कुजवलेल्या जलपर्णीवर भेडीचं बेफाम पीक आल्याचा अनुभव वाचायला मिळाला तसेच शहरात तयार होणारा कचरा शहरालगतच्या शेतांमध्ये नेता येत नाही याला ओला आणि सुका कचरा वेगळा करण्यासारख्या साध्या बाबीसंदर्भातील आपल्या समाजाची अनास्था कारणीभूत आहे हे वेदनादायी वास्तवही समजले. लेखिकेने तिची शाळा, तिचे वडील व सासरे, महाविद्यालयीन जीवनात बाबा आमटे यांच्या श्रमसंस्कार छावणीत घेतलेले अनुभव, सामाजिक चळवळीत सक्रीय होतान सुरुवातीच्या काळात घेतलेले अनुभव सगळ्यांबद्दल देखील लिहिले आहे. पारंपरिक पद्धतीपेक्षा वेगळ्या रीतीने देखील एका सक्ष मुलीची जडणघडण कशी होऊ शकते, या चित्रही या लेखांमधून वाचकांसमोर आपोआ उलगडेल. सकाळ प्रकाशन, पुणे यांनी हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. (साभार-सकाळ ॲग्रोवन)

मुक्ता दाभोलकर
(लेखिका अंधश्रद्धा निर्मूलन, पंचाय राज प्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत)

आव्हानांना सामोरे जाण्याचा माईंडसेट

दहावी किंवा बारावीची परीक्षा जवळ आली की, अनेक विद्यार्थ्यांच्या मनात एक प्रश्न येतो - 'हे सगळे माझ्याच बाबतीत का?' अभ्यासाचा ताण, मोठा अभ्यासक्रम, टेस्टचे गुण, अपेक्षा, तुलना, पुढे काय होईल याची चिंताष्ठ आणि मग मन म्हणते, 'माझ्यासाठी सगळे इतके कठीण का आहे? इतरांना सगळे सहज कसे जमते?' पण इथेच आपल्या विचारांची दिशा बदलण्याची गरज असते. कारण प्रश्न कठीण आहे की आपण त्याच्याकडे कसे पाहतो, यावर आपल्या पुढच्या कृती ठरतात. आव्हानं आली की पहिला विचार असतो—'Why me?' पण एकदा स्वतःला विचारा, 'Why not me?' जर ही परीक्षा माझ्यासमोर आली आहे, तर कदाचित माझ्यात ती पार करण्याची क्षमता निर्माण करण्याची हीच संधी आहे. जीवन नेहमी सोपा रस्ता देईलच असे नाही. काही रस्ते चढाचे असतात, काही वळणावळणाचे असतात; पण त्यावरून चालताना आपली ताकद वाढत जाते.

समजा तुमच्यासमोर दहावीचा किंवा बारावीचा मोठा अभ्यासक्रम आहे. मन म्हणते, 'इतके सगळे कसे होणार?' इथेच प्रॉब्लेम माईंडसेट आणि ग्रोथ माइंडसेट यांच्यात फरक पडतो. प्रॉब्लेम माईंडसेट म्हणतो, 'हे माझ्याकडून होणार नाही.' ग्रोथ माईंडसेट विचारतो, 'हे माझ्याकडून होण्यासाठी मला काय शिकायला हवं?' पहिला विचार आपल्याला थांबवतो; दुसरा विचार आपल्याला पुढे नेतो. मानसशास्त्रात याला cognitive reframing म्हणजेच परिस्थितीकडे पाहण्याची चौकट बदलणे असे म्हणता येईल. परिस्थिती लगेच बदलत नाही; पण त्या परिस्थितीबद्दलचा आपला अर्थ बदलला की, आपली भावना आणि कृती बदलू शकतात.



'माझ्यावर अभ्यासाचा खूप ताण आहे' या विचाराऐवजी 'आज मी त्यातील एक भाग पूर्ण करतो' असा विचार केला, तर मोठी समस्या छोट्या कृतींमध्ये विभागली जाते. आणि एक महत्त्वाचा प्रश्न स्वतःच्या मनाला विचारा - 'मी या आव्हानाला तोंड देण्यासाठी माझे मजबूत हात, शांत आणि विचार करणारा मेंदू आणि पुढे चालणारे पाय वापरणार आहे का?' हात म्हणजे मेहनत करण्याची तयारी, मेंदू म्हणजे योग्य नियोजन आणि विचार करण्याची क्षमता, आणि पाय म्हणजे थांबून न जाता पुढे जाण्याची कृती. फक्त 'मला जमायला हवे' म्हणणे पुरेसे नाही; जमवण्यासाठी रोज काहीतरी करणे महत्त्वाचे आहे.

परीक्षेच्या काळात स्वतःशी बोलण्याची पद्धतही बदला. 'माझे मार्क्स कमी आहेत' ऐवजी, 'माझे मार्क्स सध्या कमी आहेत; पण ते सुधारण्यासाठी मी काय करू शकतो?' 'मला गणित जमत नाही' ऐवजी, 'गणितातील हा भाग मला अजून समजलेला नाही.' या दोन वाक्यांमध्ये खूप मोठा फरक आहे. पहिले वाक्य स्वतःवर शिक्का मारते; दुसरे वाक्य सुधारण्याची शक्यता उघडतं. दहावी-बारावीची परीक्षा म्हणजे फक्त पुस्तकातील ज्ञानाची परीक्षा नाही. ती स्वतःला व्यवस्थित ठेवण्याची, वेळेचं नियोजन करण्याची, अडचणी आल्या तरी पुन्हा सुरुवात करण्याची आणि स्वतःवर विश्वास ठेवण्याचीही एक संधी आहे. त्यामुळे एखाद्या दिवशी कमी अभ्यास झाला, टेस्टमध्ये अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाले किंवा एखादा विषय कठीण वाटला, तर स्वतःला अपयशी घोषित करू नका. चूक म्हणजे शेवट नाही; ती पुढची स्ट्रॅटेजी बदलण्याची माहिती आहे. एक साधी सवय लावा. जेव्हा मनात 'Why me?' येईल, तेव्हा तीन प्रश्न विचारा - 'माझ्या हातात काय आहे?' 'आता मी काय करू शकतो?' 'पुढची छोटी पायरी कोणती?' कारण माईंडसेट म्हणजे सतत पॉझिटिव्ह राहणे नाही. 'सगळे छान होईल' असे स्वतःला सांगत बसणे म्हणजे माईंडसेट नाही. कठीण आहे हे मान्य करूनही, 'मी यावर काम करणार' असे ठरवणे म्हणजे मजबूत माईंड सेट.

तुम्हाला नेहमी सोपा मार्ग मिळेलच असे नाही. पण प्रत्येक कठीण रस्ता तुम्हाला एक गोष्ट शिकवू शकतो - तुम्ही स्वतःला वाटतं त्यापेक्षा जास्त सक्षम आहात. म्हणून पुढच्या वेळी अभ्यासाचा मोठा डोंगर समोर दिसला, तेव्हा 'हे माझ्याच वाट्याला का?' असे म्हणत बसू नका. स्वतःला सांगा - 'हो, हे कठीण आहे. पण मीही कमकुवत नाही. माझ्याकडे विचार करणारा मेंदू आहे, मेहनत करणारे हात आहेत आणि पुढे चालत राहण्याची ताकद आहे. मला संपूर्ण डोंगर आज चढायचा नाही. मला फक्त आजची पुढची पायरी चढायची आहे.' हाच माइंड सेट दहावी-बारावीच्या परीक्षेला सामोरे जाण्याची खरी ताकद बनू शकते.

डॉ. स्वाती गानू

लिफ्ट सुरक्षेचे नवे नियम स्वागतार्ह!

सध्याच्या अनेक मजली इमारतीच्या जमान्यात लिफ्ट (उद्वाहक) ही एक अत्यावश्यक बाब बनली असून मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर इत्यादी महानगरातील उंच इमारती आणि गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये लिफ्टचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मात्र यासोबतच लहान मुलांच्या लिफ्टमधील अपघातांच्या घटनाही चिंताजनक रीतीने वाढत आहेत. ही परिस्थिती लक्षात घेता यापुढे १२ वर्षाखालील मुलांना एकट्याने लिफ्ट वापरण्यास बंदी घालण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. १ नोव्हेंबर २०२६ पासून मुंबई, पुणे, नागपूरसह संपूर्ण राज्यभरात 'महाराष्ट्र लिफ्ट्स, एस्कलेटर आणि मूव्हिंग वॉकवेज नियम, २०२६' अंतर्गत तो लागू करण्यात आला आहे. यासोबतच सर्व लिफ्टमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, स्वयंचलित बचाव उपकरण आणि ओव्हरलोड संरक्षण उपकरण बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे

लहान मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने स्वागतार्ह असलेला हा नियम जागृत नागरिक आणि सोसायट्यांनी सतर्क राहून तसेच पालकांनी आपल्या १२ वर्षाखालील मुलांना या नियमाचे गांभीर्य समजावून सांगितल्यास खऱ्या अर्थाने यशस्वी होईल. कारण केवळ कायदा करून चालणार नाही, तर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे तितकेच गरजेचे आहे. त्यासाठी गृहनिर्माण संस्थांनी इमारतीतील सुरक्षारक्षक व सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे यावर काटेकोर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

प्रदीप मोरे

हिंदूंच्या श्रद्धेचा बाजार मांडू नका !

सध्या 'रामायण' चित्रपटावरून सर्वत्र चर्चा आणि वादंग निर्माण झाला आहे. चित्रपटाला समाजातील विविध स्तरांतून विरोध होत आहे. कारणही तसेच आहे, चित्रपटाला केवळ धार्मिक मुलामा देऊन प्रत्यक्षात मात्र त्यातील मूळ मूल्यांनाच हरताळ फासल्याचे दिसत आहे. या चित्रपटात रावणाला नायकाच्या स्वरूपात रंगवण्यात आले आहे. त्यामुळे चित्रपटाचे नाव 'रामायण' नसून 'रावणायण' ठेवायला हवे होते, असा विचार कुणाच्याही मनात येईल.

एका नेटकऱ्याने तर 'मला आता रामापेक्षा रावणच आवडू लागला आहे', अशी टिप्पणी केली आहे. ही केवळ एक टिप्पणी नसून हिंदूंच्या श्रद्धास्थानांचे विकृतीकरण किती गंभीर पातळीवर चालले आहे, याचे उदाहरण आहे. अशा प्रकारे रावणाचे उदात्तीकरण करून प्रभु श्रीरामांच्या आदर्शांचे महत्त्व कमी करण्याचे धाडस येते कुठून? 'रामायण' आणि 'महाभारत' हे केवळ मनोरंजनासाठी रचलेले काल्पनिक कथाग्रंथ नसून भारतीय संस्कृतीचे आधारस्तंभ आणि जीवनाला दिशा देणारे महान ग्रंथ आहेत. त्यांतील प्रसंग आजही मानवाला धर्माचरण, कर्तव्यनिष्ठा, त्याग, संयम, धैर्य आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देतात. रावण हा अहंकार, वासनांधता आणि अधर्म यांचे प्रतीक आहे, तर प्रभु श्रीराम हे धर्म, मर्यादा आणि आदर्श आचरणाचे प्रतीक आहेत. असे असतांना रावणाला स्त्रीरक्षक, गरिबांचा तारणहार आणि लोककल्याणकारी राजा म्हणून रंगवणे, हा इतिहास व धर्मपरंपरेशी केलेला विपर्यास आहे. सीतेचे अपहरण करणाऱ्या, स्वतःच्या अहंकारापायी सर्वनाश ओढवून घेणाऱ्या रावणाचे उदात्तीकरण करणे, हे कोणत्या विचारसरणीचे द्योतक आहे? आजही समाजात रावण, कंस यांच्याप्रमाणे अहंकार, अत्याचार आणि दुष्ट प्रवृत्तींचे समर्थन करणाऱ्या वृत्ती दिसतात. अशा प्रवृत्तींना खतपाणी घालण्याचे काम हा चित्रपट करत आहे. अशा प्रकारचे चित्रण समाजासाठी घातक ठरू शकतात. चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजमन घडवणारे प्रभावी माध्यम आहे, याचे भान निर्मात्यांनी ठेवले पाहिजे.

हिंदूंच्या श्रद्धास्थानांचा वापर करून प्रसिद्धी आणि पैसा मिळवायचा; मात्र त्याच श्रद्धास्थानांचे विकृतीकरण करायचे, हा प्रकार आता खपवून घेतला जाणार नाही. रामायण दाखवण्याचे धाडस नसेल, तर रामायणाच्या नावाखाली रावणाचे उदात्तीकरण करण्याचा अट्टहास कशासाठी? हिंदूंच्या श्रद्धा, भावना आणि धर्मपरंपरा या कोणाच्याही व्यावसायिक प्रयोगशाळा नाहीत.

चित्रपट निर्मात्यांनी कलात्मक स्वातंत्र्याच्या नावाखाली धार्मिक श्रद्धांचा अवमान करण्याचे थांबवावे. हिंदूंच्या श्रद्धेचा बाजार मांडू नका; रामायणातील सत्य, धर्म आणि आदर्श यांचे विकृतीकरण न करता सत्य दाखवण्याचे धाडस दाखवावे!

प्रांजली ब्रम्हे,
नागपूर

आधुनिक 'रामायण' चित्रपटातून रामाचे अवमूल्यन आणि अवमान!

भगवान श्रीराम हे समस्त हिंदूंचे आराध्य दैवत आहे. त्रेतायुगात विष्णुने राम अवतार धारण करून आपल्या जीवनचरित्राने आदर्श जीवन कसे असावे याचा आदर्श पाठ घालून दिला. राम हा आदर्श राजा होता. रामराज्य म्हणजे सर्व प्रजेचे कल्याण करणारे राज्य. वनवासात असताना त्याने वालीचा वध केला, त्याच्या दुष्ट प्रवृत्तीची, त्याच्या अवगुणांची त्याला जाणीव करुन देऊन त्याचा उद्धार केला आणि त्याचा भाऊ सुग्रीव याला राज्य मिळवून दिले. म्हणून गीत रामायणकार ग.दी.माडगूळकरांनी गीतरामायणात 'वाली वध ना खल निर्दालन' असे या प्रसंगाचे वर्णन केले आहे.

शिळा होऊन पडलेल्या शापित अहिल्येचा उद्धार रामाच्या पदस्पर्शाने होतो. इतके रामाचे महत्त्व आहे. वनवासात असताना शबरी या भिल्लीणीची उष्टी बोरे देखील रामाने आनंदाने ग्रहण केली कारण देवाला भक्ताची निस्सीम भक्ती आवडते बाह्य गोष्टींची अपेक्षा नसते. लंकेवर स्वारी करण्यासाठी निघालेल्या रामाला जेव्हा समुद्र वाट करून देत नव्हता तेव्हा रामाने त्याला त्याच्या उद्दामपणाची जाणीव करून दिली आणि तुला दंडीत करीन असे सांगितले, तेव्हा समुद्राने त्याला वाट करून दिली.

'भय बिन होय न प्रीत' हे त्याचे उदाहरण आहे. कायद्याचा धाक



असेल तरच व्यक्ती योग्य मार्गाने चालते . हा बोधप्रद संदेश यातून दिला गेला. 'राम से बडा राम का नाम' म्हणून वानर सेनेने प्रत्येक शिळेवर 'राम' असे लिहून त्या पाण्यात टाकल्या तेव्हा त्या पाण्यात न बुडता पाण्यावर तरंगल्या आणि रामसेतू तयार झाला आणि रामाची वानर सेना लंकेला पोहोचली.

लंकेचा राजा रावण हा ब्राह्मण होता, विद्वान होता, शिवभक्त होता परंतु वृत्ती राक्षसी होती. कपटाने त्याने सीतेचे अपहरण केले होते तो दुष्ट होता अत्याचारी होता, त्याच्या दुष्कर्माने पृथ्वीला वेदना होत होत्या म्हणून त्याचा नाश करून रामाने लंकेचे राज्य त्याचा धर्मपरायण भाऊ बिभीषण याला दिले. लंका सोन्याची असली तरी मातृभूमीचे महत्व अनन्यसाधारण आहे.

रामायण हा केवळ काव्य ग्रंथ नसून तो स्फूर्तीदायक, अनुकरणीय इतिहास आहे. हिंदूंच्या इतिहासाचे विद्रुपीकरण करण्याचा अधिकार कोणालाही पोहचत नाही. व्यक्ती स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या मर्यादा यामध्ये पुष्कळ अंतर आहे. चित्रपटा सारख्या प्रभावी माध्यमातून हिंदूंच्या श्रद्धास्थानांचा अवमान करण्याचा प्रयत्न कोणी करत असेल तर त्याला समस्त हिंदूंनी एकवटून विरोध करायलाच हवा. खरे तर चित्रपट परीनिरीक्षण मंडळाने अशा चित्रपटांना अनुमती द्यायला नको. पण परिनिरीक्षण मंडळ हिंदूंना न्याय देत नाही, असा आजवरचा अनुभव आहे. म्हणून आता हिंदूंनी त्यांना समजेल, त्यांना जाणीव होईल आणि त्यांचे डोळे उघडतील अशा भाषेतच त्यांना उत्तर द्यायला हवे. रावणाच्या अमानुष वृत्तीचे, अन्याय्य कृतीचे उदात्तीकरण ऱ्हण करण्याचे षड्यंत्र हाणून पाडायला हवे.

संध्या काटदरे

आंतरराष्ट्रीय पुरुष दिवस



मानवी संस्कृतीच्या प्रवासात काही दिवस असे असतात, जे केवळ दिनदर्शिकेतील तारखा न राहता समाजमनाला अंतर्मुख करणारे आरसे ठरतात. नोव्हेंबरची गुलाबी थंडी हळूहळू चाहूल देऊ लागली की, या महिन्याच्या १९ तारखेला एक शांत, काहीसा दुर्लक्षित पण तितकाच अर्थपूर्ण दिवस/अर्थगर्भ टप्पा येऊन ठेपतो. कुटुंब, समाज, राष्ट्र आणि पर्यावरण यांसाठी पुरुषांनी दिलेल्या सकारात्मक योगदानाचा गौरव करणे आणि त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. या वर्षासाठी या दिनाची जागतिक संकल्पना आहे. 'भविष्य प्रत्येकाचे आहे' (दि फ्युचर इज एव्हरीवन). वरवर साधे भासणारे हे तीन शब्द केवळ एक घोषवाक्य नसून, ते विसाव्या शतकातील संघर्षमय लिंगभाव चर्चेला एकविसाव्या शतकातील समंजस, समावेशक आणि सहप्रवासाच्या दिशेने नेणारे वैचारिक सूक्त आहे.

सुरक्षित आणि चांगले जग घडवणे. प्रत्येक व्यक्ती सुरक्षित राहून आपल्या पूर्ण क्षमतेने प्रगती करू शकेल पुरुषांवर होणारा अन्याय आणि भेदभाव समोर आणणे या साठी या दिवसाची मुहूर्तमेढ रोवली. पुरुषांचे कुटुंबातील व समाजातील सकारात्मक योगदान अधोरेखित करणे आणि त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्याविषयी संवाद घडवून आणणे, हा यामागील मूळ हेतू होता. गेल्या अडीच दशकांत जगभरातील ऐंशीहून अधिक देशांमध्ये हा विचार रुजला. मात्र, यंदाची 'भविष्य प्रत्येकाचे आहे' ही संकल्पना एका अत्यंत महत्त्वाच्या सामाजिक वळणावर आली असून सर्वसमावेश कता, एकत्रित जबाबदारी आणि लैंगिक समानतेवर भर देते. यात संपूर्ण मानवजातीच्या सहअस्ति त्वाचा, परस्पर आदराचा आणि संतुलित समाजरचनेचा एक मोठा आशय दडलेला आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत आणि एकूणच जागतिक परिप्रेक्ष्यात 'पुरुष' या संकल्पनेभोवती शतकानुशतके कणखरपणाचे एक अदृश्य कवच विणले गेले आहे. 'मुलगा रडत नाही', 'कुटुंबाचा आधारस्तंभ कधीच डगमगत नाही' आणि 'कर्तव्याच्या वेदीवर भावनांचा बळी द्यायचा असतो' अशा अलिखित नियमांच्या ओझ्याखाली पुरुषांचे संवेदनशील मन दबले गेले. साहित्यात आणि लोकजीवनात पुरुषाचे चित्रण नेहमीच एकतर 'नायक' म्हणून झाले किंवा 'खलनायक' म्हणून; पण या दोहोंच्या मधला, स्वतःच्या असुरक्षिततेशी झगडणारा, थकलेला आणि तरीही चेहऱ्यावर शांत स्मित ठेवून जबाबदाऱ्या पेलणारा 'सामान्य माणूस' अनेकदा दुर्लक्षित राहिला.

आज बदलत्या काळानुसार ही साचेबद्ध चौकट हळूहळू विरघळू लागली आहे. आधुनिक काळातील तरुण पिढी पुरुषत्वाची नवी व्याख्या लिहीत आहे. आजचा पिता आपल्या मुलाच्या संगोपनात केवळ आर्थिक आधार न राहता भावनिक ओलावा शोधत आहे. आजचा जोडीदार घरातील जबाबदाऱ्या समानतेने वाटून घेण्यात आणि स्वतःच्या मनातील भीती किंवा अस्वस्थता मोकळेपणाने व्यक्त करण्यात कमीपणा मानत नाही. पुरुष जेव्हा स्वतःच्या वेदनांना शब्द देतो, तेव्हा तो दुर्बल होत नाही, तर तो अधिक माणूस बनतो. या प्रक्रियेतून घडणारा मुलगा अधिक संवेदनशील जोडीदार आणि अधिक समंजस नागरिक बनतो. आज पुरुषांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्न हा केवळ व्यक्तिगत राहिलेला नसून तो एक गंभीर सामाजिक विषय बनला आहे. कामाचा वाढता ताण, आर्थिक अस्थिरता, बदलत्या नातेसंबंधांचे पेच आणि स्वतःच्या भावना दडपून ठेवण्याची वृत्ती यांमुळे पुरुषांमधील नैराश्य आणि आत्महत्येचे प्रमाण चिंतेचा विषय ठरत आहे. अशा वेळी पुरुषांच्या आरोग्याकडे, त्यांच्या हक्कांकडे आणि त्यांच्या भावनिक सुरक्षिततेकडे लक्ष देणे म्हणजे स्त्री-समानतेच्या चळवळीला विरोध करणे नव्हे, तर एका निरोगी समाजाची पायाभरणी करणे होय. एका पंखावर कोणताही पक्षी उंच भरारी घेऊ शकत नाही; त्यासाठी दोन्ही पंखांमध्ये समान बळ आणि लय असावी लागते. स्त्री आणि पुरुष हे निसर्गाने घडवलेले असेच दोन पंख आहेत. त्यांच्यातील संवाद संघर्षाऐवजी सहानुभूतीची असावी.

तारा व्दा शर्मा

■ गुरुवार, १९ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सदय

अकोला
जिल्हा विशेष

पातूर पुरवठा विभागाचा कारभार रामभरोसे!

निरीक्षक कार्यालयात गैरहजर, फोनलाही प्रतिसाद नाही

रेशन तांदळाच्या कथित तस्करीकडे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष?

■ प्रतिनिधी | पातूर ■

सर्वसामान्यांच्या हक्काचे रेशन धान्य सुरक्षितपणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी असलेल्या पातूर तहसील पुरवठा विभागाचाच कारभार सध्या संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. तालुका पुरवठा निरीक्षक शीतल मोरखडे (दांदळे) या कार्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. कार्यालयात गेल्यावर अधिकारी भेटत नाहीत आणि मोबाईलवर संपर्क साधला तरी प्रतिसाद मिळत नाही. मग नागरिकांनी न्याय मागायचा तरी कोणाकडे? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

शासकीय कार्यालये ही जनतेच्या सेवेसाठी असतात की नागरिकांना हेलपाटे मारायला लावण्यासाठी, असा प्रश्न पातूरच्या पुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवरून उपस्थित होत आहे. रेशनकार्डमधील दुरुस्ती, धान्य वितरण आणि अन्य शासकीय कामांसाठी



नागरिक कार्यालयात पोहोचतात; मात्र संबंधित अधिकारी उपलब्ध नसल्याने त्यांची कामे रखडत असल्याच्या तक्रारी आहेत. अधिकारी कार्यालयात नाहीत, संपर्क यंत्रणा प्रतिसाद देत नाही आणि नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेणारेही कोणी नाही, अशी अवस्था असेल तर प्रशासकीय उत्तरदायित्वाचा अर्थ काय उरतो? असा यक्षप्रश्न या निमित्ताने सुज्ञ नागरिक उपस्थित करीत आहे. याप्रकरणी तालुका पुरवठा निरीक्षक यांना त्यांची बाजू जाणून घेण्याकरिता संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

जिल्हा प्रशासनाने झोपेचे सोंग सोडावे!

या प्रकरणात जिल्हाधिकारी आणि जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालण्याची मागणी होत आहे. पातूर पुरवठा कार्यालयाची आकस्मिक तपासणी करून निरीक्षकांच्या उपस्थितीची नोंद तपासावी. प्रलंबित प्रकरणांचा आढावा घ्यावा. तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांच्या साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी करून धान्याची आवक-जावक आणि वितरणाची तपासणी करावी. कथित गैरव्यवहारात तथ्य आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी. कार्यालयात अधिकारी नाहीत, फोनला प्रतिसाद नाही आणि रेशन धान्याच्या कथित तस्करीच्या तक्रारी सुरूच! हा केवळ कार्यालयीन अनागोंदीचा विषय नाही, तर सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केवळ अहवाल मागवून समाधान मानू नये. प्रत्यक्ष चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी. अन्यथा गरीबांच्या हक्काच्या धान्याचे रक्षण करण्यासाठी असलेली यंत्रणाच नेमकी कोणाच्या हितासाठी काम करतेय, असा प्रश्न अनुत्तरितच राहील!

रेशनचा तांदूळ लाभार्थ्यांच्या ताटात की काळ्याबाजारात?

पुरवठा विभागाच्या कार्यालयीन कारभारावर प्रश्न उपस्थित होत असतानाच तालुक्यात रेशनच्या तांदळाची कथित अवैध वाहतूक आणि तस्करी होत असल्याचे आरोपही पुढे येत आहेत. स्वस्त धान्य दुकानांमधून गरीब कुटुंबांसाठी वितरित होणाऱ्या तांदळाची परस्पर विल्हेवाट लावली जात असल्याच्या तक्रारींची सत्यता तपासणे आवश्यक आहे. कारण हा प्रश्न केवळ धान्याचा नसून गरीबांच्या हक्कावर पडणाऱ्या संभाव्य दरोड्याचा आहे. धान्याचा साठा किती आला, किती वितरित झाला आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांना किती मिळाला, याचा हिशेब ठेवण्याची जबाबदारी पुरवठा यंत्रणेची आहे. मग कथित तस्करीच्या तक्रारींवर ठोस कारवाई का दिसत नाही? स्वस्त धान्य दुकानांची नियमित तपासणी होते का? धान्याच्या वाहतुकीवर लक्ष ठेवले जाते का? की तपासणी आणि नियंत्रण केवळ कागदावरच सुरू आहे? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने देणे आवश्यक आहे.

भारती प्लॉटमध्ये रस्ता रुंदीकरणातील अतिक्रमण हटविले!

रस्त्याच्या बांधकामातील अडथळा दूर करण्यासाठी पुढाकार

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील रस्ते विकासाच्या कामांना अतिक्रमणांचा अडथळा ठरत असल्याने महानगरपालिकेने आता निष्कासनाची मोहीम हाती घेतली आहे. याचाच एक भाग म्हणून जुने शहरातील भारती प्लॉट परिसरात रस्ता रुंदीकरणाच्या कामात अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत व अतिक्रमित निवासी बांधकामावर बुधवारी (दि. १८ नोव्हेंबर) महानगरपालिका प्रशासनाने निष्कासनाची कारवाई केली.

महानगरपालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पश्चिम झोनअंतर्गत प्रभाग क्रमांक १० मधील भारती प्लॉट येथे ही मोहीम राबविण्यात आली. रस्त्याच्या बांधकामासाठी



महानगरपालिकेची निष्कासन कारवाई

आवश्यक असलेल्या जागेत अतिक्रमण असल्याने विकासकामात अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे संबंधित अनधिकृत बांधकाम हटविण्याची कार्यवाही करण्यात आली. या कारवाईत सहायक अतिक्रमण अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, कनिष्ठ अभियंता रवींद्र जाधव, समीर मालवे यांच्यासह अतिक्रमण निर्मूलन पथकातील मनीष भोमळे, कुणाल शाहू, निलेश तायडे, मोहम्मद अजहर, निकिता शिरसाट, आदित्य माहूलकर, योगेश देवकते, तुषार गांधे आणि स्वप्नील पवार यांनी सहभाग घेतला. महानगरपालिका प्रशासनाच्या या कारवाईमुळे भारती प्लॉट परिसरातील रस्ता रुंदीकरणाच्या कामातील अडथळा दूर करण्याच्या दृष्टीने पाऊल पडले आहे. शहरातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी अतिक्रमणांविरोधातील कारवाईला प्रशासनाकडून प्राधान्य दिले जात असल्याचे या मोहिमेतून स्पष्ट झाले.

एज्यु एक्स्पो- २०२६ मध्ये युवकांना उपलब्ध झाली रोजगाराची संधी

अकोला : एज्यु एक्स्पोअंतर्गत दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित मेगा जॉब फेअर अंतर्गत जवळपास २ हजार युवकांनी रोजगार मेळाव्यामध्ये सहभाग नोंदविला. यामध्ये महाराष्ट्रातील जवळपास ६० पेक्षा जास्त कंपन्यांनी या मेळाव्यामध्ये युवकांच्या मुलाखती व त्यांना असलेल्या संधीबाबत मार्गदर्शन केले. अकोला एज्यु एक्स्पोची महत्वाची उपलब्धी म्हणजे या मेगा जॉब फेअरअंतर्गत ४०० युवकांना रोजगाराच्या सुवर्णसंधी उपलब्ध झाल्या. आजपासून http://www.akolajobs.com या वेबसाईटवर नोंदणी सुरू झाली असून युवकांनी यावर आपली नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

किड्स पॅराडाईज स्कूलला 'एज्युकेशनल एक्सलन्स अँड इनोव्हेशन अवॉर्ड'

■ प्रतिनिधी | पातूर ■

शैक्षणिक गुणवत्ता, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या पातूर येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजला प्रतिष्ठेच्या 'एज्युकेशनल एक्सलन्स अँड इनोव्हेशन अवॉर्ड-२०२६' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अकोला येथे युवा सक्षम फाउंडेशनच्या वतीने आयोजित एज्यु एक्स्पो २०२६ अंतर्गत झालेल्या दिमाखदार सोहळ्यात संस्थेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शाळेने शिक्षण क्षेत्रात राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम, संकल्पनाधारित व कृतीआधारित शिक्षणपद्धती, शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेऊन या

एज्यु एक्स्पो २०२६ मध्ये गौरव; ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या उपक्रमांची दखल



पुरस्कारासाठी संस्थेची निवड करण्यात आली.

या पुरस्कार वितरण सोहळ्याला तज्ज्ञ प्रशिक्षक डॉ. प्रदीप सोमानी, प्रभात किड्सचे संचालक व शिक्षणतज्ज्ञ डॉ. गजानन नारे, आर.डी.जी. शिक्षण संस्थेचे संचालक दिलीपराज गोयनका, ललित कोचिंग क्लासचे संचालक ललित काळपांडे, समर्थ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नितीन बाठे तसेच विज्ञान संशोधक नितीन ओक यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे आणि कार्यकारी संचालिका ज्योत्स्ना गाडगे यांना पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी शाळेचे शिक्षक बजरंग भुजबटराव, अविनाश पाटील आणि नीतू ढोणे उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक, दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने किड्स पॅराडाईज स्कूलने विविध शैक्षणिक प्रयोग राबविले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, आर्थिक साक्षरता, तंत्रज्ञानाची आवड, क्रीडागुण आणि सर्जनशीलता विकसित करण्यावर शाळेने विशेष भर दिला आहे.

ग्रामीण शिक्षणाच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब

शहरी शैक्षणिक संस्थांच्या बरोबरीने ग्रामीण भागातील शाळाही नाविन्यपूर्ण प्रयोग आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करू शकतात, हे किड्स पॅराडाईज स्कूलने या यशातून अधोरेखित केले आहे. या पुरस्कारामुळे पातूरच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, संस्थेच्या यशाबद्दल व्यवस्थापन, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

'युआयडीएआय' चा उपक्रम

अकोल्यात सातही दिवस चालणारे आधार सेवा केंद्र सुरू



अकोला : भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या मुंबई प्रादेशिक कार्यालयातर्फे नवीन आधार सेवा केंद्राचे उद्घाटन अकोल्यात निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांच्या हस्ते आज झाले.

'अकोला येथील हे आधुनिक आधार सेवा केंद्र आपल्या नागरिकांसाठी जलद, अधिक सोयीस्कर आणि पारदर्शक आधार सेवा सुनिश्चित करेल. 'डिजिटल इंडिया'चे स्वप्न साकार करण्याच्या आणि आपला राष्ट्रीय विस्तार वाढवण्याच्या दिशेने हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे, असे प्रतिपादन श्री. मालठाणे यांनी यावेळी केले. आधार सेवा केंद्र व्यवस्थापक रवी पवार आणि युआयडीएआय प्रादेशिक एएम मनोज गुप्ता यांच्यासह सेवा पुरवठादार संस्था प्रोटीयन ई-गव्ह टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित होते. हे आधार सेवा केंद्र, ग्राउंड फ्लोअर, रुद्रराज फिटनेस सेंटर जवळ, सर्वे नं १०, रिंगरोड, केशव नगर चौक, अकोला, महाराष्ट्र - ४४४००४ येथे स्थित असून, आठवड्याचे ७ दिवस सुरू राहील. येथे नावनोंदणी, ५ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांसाठी मोफत बायोमेट्रिक अपडेट्स, जनसांख्यिकीय सुधारणा आणि जागेवरच तक्रार निवारण यांसारख्या सेवा उपलब्ध असतील.

हे केंद्र आधुनिक सुविधा, व्हीलचेअर प्रवेश, सुलभ स्वच्छतागृह आणि अखंड सेवा वितरण सुनिश्चित करण्यासाठी एका समर्पित आधार सेवा केंद्र व्यवस्थापकाने सुसज्ज आहे. नागरिक युआयडीएआय अपॉइंटमेंट पोर्टल https://bookappointment.uidai.gov.in) वर पूर्व-नोंदणी करू शकतात, तर भूवन आधार पोर्टलवर (https://bhuvan-app3.nrsc.gov.in/aadhaar) जिओ-टॅग केलेली आधार सेवा केंद्र ठिकाणे उपलब्ध आहेत. पुढील पिढीची डिजिटल ओळख सुरक्षित करण्यासाठी शाळांमध्ये विशेष बायोमेट्रिक अपडेट शिबिरांचे आयोजन केले जात आहे.

अवैध सावकारीत बळकावलेली १.१८ हेक्टर शेतजमीन मूळ मालकाला परत

अवैध सावकारीविरुद्ध प्रशासनाची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

अवैध सावकारीच्या माध्यमातून बळकावण्यात आलेली १.१८ हेक्टर शेतजमीन मूळ मालकाला परत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले आहेत. अकोला तालुक्यातील घुसरवाडी येथील शेतकरी अनिल शालिग्राम घावट यांना या आदेशामुळे दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्र सावकारी (नियमन)



अधिनियम २०१४ मधील कलम १८ (२) अन्वये ही कारवाई करण्यात आली. संबंधित शेतजमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारात अवैध सावकारीचा प्रकार झाल्याचे चौकशीतून निष्पन्न झाले. त्यामुळे शेतजमीन मूळ मालकाला परत करण्याचे आदेश १८ नोव्हेंबर २०२६ रोजी पारित करण्यात आले.

सहकार विभागाचे जिल्हा निबंधक गितेशचंद्र साबळे आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यवाही करण्यात आली. आदेश

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे आदेश

वितरणावेळी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, शेतकरी व नागरिकांनी कर्जाची गरज असल्यास सहकारी बँका, पतसंस्था किंवा परवानाधारक सावकारांकडूनच कर्ज घ्यावे. अवैध सावकारांच्या तावडीत सापडू नये. तसेच अवैध सावकारीसंदर्भात काही तक्रार असल्यास सहकार विभागाकडे निर्भीडपणे तक्रार करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे

भाजपला लालाजींचा कळवळा ; विधानसभेला उमेदवारी का दिली नाही ?

उद्धवसेनेच्या जिल्हा संघटिका सरिता वाकोडे यांचा भाजपवर घणाघाती हल्ला

■ प्रतिनिधी | अकोला ■

भाजपचे दिवंगत ज्येष्ठ आमदार गोवर्धन शर्मा यांच्या सहकार्यामुळे सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत अकोला पूर्व मतदारसंघातून अवघ्या २ हजार ४४० मतांनी निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत लालाजींच्या कुटुंबीयांना उमेदवारी का दिली नाही? असा परखड सवाल करत उद्धवसेनेच्या जिल्हा संघटिका डॉ. सरिता वाकोडे यांनी भाजपवर पलटवार केला आहे. भाजपला अचानक लालाजींचा कळवळा का आला? व्यक्तिगत स्वार्थासाठी भाजपमधील काही लोकप्रतिनिधींकडून लालाजींच्या नावाचा वापर करणे अत्यंत वेदनादायी असल्याचे डॉ. वाकोडे म्हणाल्या.



शहराचे आराध्य दैवत राजेश्वर मंदिराच्या विकासासाठी राज्य शासनाकडून नुकताच १९ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. सन २०१४ मध्ये राज्यात भाजपची सत्ता होती. त्याचवेळी राजेश्वर मंदिराला तीर्थक्षेत्राचा दर्जा व विकास कामांसाठी निधी का मिळाला नाही? यासाठी १२ वर्षांचा प्रदीर्घ कालावधी का लागला, असा सवाल डॉ. सरिता वाकोडे यांनी उपस्थित केला. धार्मिक मुद्द्यांच्या आडून अकोलेकरांच्या मनात द्वेषाची बीजे पेरण्याचे काम भाजपकडून केले जात असल्याचा आरोप संघटिका डॉ. सरिता वाकोडे यांनी केला. भाजपमधील एकाधिकारशाही, हुकूमशाही व एककल्ली कारभारामुळेच अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात २०२४ मधील विधानसभा निवडणुकीत भाजपच्या उमेदवाराला पराभवाचे तोंड पहावे लागल्याची टीका डॉ. वाकोडे यांनी केली. पत्रकार परिषदेला जिल्हाप्रमुख गोपाल दातकर, जिल्हाप्रमुख मुकेश मुरूमकार, उपजिल्हाप्रमुख विकास पागृत, योगेश्वर वानखडे, महिला आघाडी निवासी उपजिल्हा संघटिका संगीता राठोड, शहर संघटिका वर्षा पिसोडे, अर्चना ठाकरे, शहर प्रमुख आशिष गावंडे (अकोला पश्चिम), शहर प्रमुख राहुल कराळे (अकोला पूर्व) तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर म्हैसने, संजय भांबेरे, किरण अवताडे, युवासेना शहरप्रमुख विकी इंगळे उपस्थित होते.

भाजपकडून सामाजिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न

अकोला पश्चिम मतदारसंघात भाजपला नाकारून सर्वसामान्य जनतेने निवडून दिलेल्या काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांच्याकडून राजेश्वर मंदिराच्या विकासासाठी प्रयत्न केले जात असतील तर त्याचा भाजपला इतका द्वेष का? असा सवाल करत भाजपकडून शहरातील सामाजिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे डॉ. सरिता वाकोडे म्हणाल्या.

मनपात टिपू सुलतानच्या नामकरणाला भाजपाची संमती

महापालिकेत सन २०१२-१३ मध्ये स्थायी समिती सभागृहाला टिपू सुलतान यांचे नाव देण्यात आले. हा प्रस्ताव त्यावेळी तत्कालीन सभापती विजय अग्रवाल यांनी मंजूर केला होता. त्याच विजय अग्रवाल यांना भाजपने २०२४ मधील विधानसभा निवडणुकीत उमेदवारी दिली होती. राजकीय स्वार्थासाठी टिपू सुलतान यांच्या नावाला भाजपमध्ये पडद्याआडून संमती असल्याचा आरोप डॉ. सरिता वाकोडे यांनी केला.

शेतकरी आंदोलनाचा धसका

उद्धवसेनेचे उपनेता तथा आमदार नितीन देशमुख यांनी विदर्भातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी आंदोलन छेडल्यामुळे भाजपमधील स्थानिक लोकप्रतिनिधींच्या पायाखालची वाळू सरकली आहे. यामुळे बिथरलेल्या भाजपकडून सोशल मीडियावर कथित, बनावट व सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करणारे मेसेज व्हायरल केले जात असल्याचा आरोपही डॉ. वाकोडे यांनी केला.

जाहीर नोटीस

वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१२६२/२०२६ — प्रोसेस नं.१३३१९/२०२६
चौ.ता. ३१/१०/२०२६ — दिनांक : १९/१०/२०२६

अर्जदार : श्री. जगन्नाथ पांडुरंग कठाळकर रा. विवेकानंद आश्रम जवळ, सुधिर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : १. श्री. भानुदास पांडुरंग कठाळकर रा. मु. पो. चतारी, विठ्ठल मंदिर जवळ, ता. पातूर, जि. अकोला. २. श्री. प्रकाश पांडुरंग कठाळकर रा. बलोदे लेआउट, आरोग्य कॉलनी, हिंगणा रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. इंदू नानाआप्पा करने रा. आझाद चौक, बुधवारा, अमरावती. ता. अमरावती व जि. अमरावती. ४. सौ. निर्मला वसंतआप्पा सातरकर रा. इंदिरा कॉलनी, बुऱ्हानपूर, ता. जि. बुऱ्हानपूर, एम. पी. ५. सौ. शोभाताई संभाजीआप्पा कडगे रा. समर्थ नगर, ता. कन्नड, जि. संभाजीनगर

मयताचा पत्ता :- मयत : श्री. पांडुरंग तुकाराम कठाळकर

पत्ता :- रा. विवेकानंद आश्रम जवळ, सुधिर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. पांडुरंग तुकाराम कठाळकर यांचे दि. २९/०८/२०११ रोजी डेहनकर हॉस्पिटल, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनाक ३१/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे अजय सुरेश थोरात रा. भीरड वाडी, जुने शहर, बाळापुर रोड, अकोला, ता. जी. अकोला यांचे मालकीचे प्लॉट चे मूळ रजी. खरेदी खत क्र. ३६५२ दिनांक २६/०७/१९९९ या क्रमाकाचे मूळ रजी. खरेदी खत दिनांक ०२/११/२०२६ रोजी डाबकी रोड परिसरात हरवले आहे. अजय सुरेश थोरात यांच्या मालकीचे व ताब्यात असलेली मालमत्ता ज्याचे वर्णन :- खाजगी नकाशातील प्लॉट क्र. १११, शेत सर्वे क्र. २१/पार्ट, कसबे – अकोला, ता. जी. अकोला ज्याचे मोजमाप एकून क्षेत्रफळ ७५.०० चौ. मीटर, ज्याचे चातुर्सिमा - पूर्वेस - प्लॉट क्र. ११२, पश्चीमेस - प्लॉट क्र. १११ मधील उर्वरित जागा, उत्तरेस - ९ मीटर रस्ता, दक्षिणेस - सर्विस लेन. त्याबाबत अजय सुरेश थोरात यांनी दि. १४/११/२०२६ रोजी पोलीस स्टेशन जुने शहर, अकोला येथे तक्रार दाखल केली आहे, त्याचे online तक्रार क्र. १९३७३०३१०७२६००३०० असा आहे तसेच साना क्र. १५/२६ दिनांक १४/११/२०२६ असा आहे.

सदरहू मालमत्ता गहान ठेवून अजय सुरेश थोरात हे कर्ज घेत आहेत. तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ७ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी. तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक :- १८/११/२०२६

ॲड. अजय वा. गोडे
ऑफीस - शॉप क. २३ - ए, दुसरा माळा, शार्कभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला
ता. जि. अकोला, मो. क्र.९१७५९३८२४२

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३३५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

निवडून तर आले, आता पुढे काय? पदवीधरांच्या दशा आणि दिशेचे उत्तर द्या!



सहा वर्षांचा हिशोब जनतेसमोर मांडा; बेरोजगारी, रखडलेली नोकरभरती आणि खासगीकरणावर आ.अभिजीत वंजारी यांनी ठोस भूमिका घ्यावी...

वर्धा/रवींद्र लाखे

पदवीधर मतदारसंघाची निवडणूक पार पडली. मतदारांनी पुन्हा एकदा विश्वास दाखवला आणि अभिजीत वंजारी यांना दुसऱ्यांदा विधानपरिषदेत पाठवले. मात्र,निवडणुकीतील विजय हा केवळ राजकीय यशाचा उत्सव साजरा करण्यासाठी नसतो,तर तो हजारो पदवीधर युवकांच्या अपेक्षा,प्रश्न आणि भविष्याची जबाबदारी घेऊन येतो.त्यामुळे आता एकच प्रश्न उपस्थित होत आहे,निवडून तर आले,पुढे काय? पदवीधरांच्या आयुष्याची दशा बदलणार की त्यांच्या प्रश्नांची दिशा पुन्हा निवडणुकीच्या आश्वासनांमध्येच हरवणार,अभिजीत वंजारी यांनी यापूर्वी सहा वर्षे याच पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. आता दुसऱ्यांदा त्यांना संधी मिळाली आहे. त्यामुळे त्यांच्या मागील सहा वर्षांच्या कार्यकाळाचा हिशोब मागणे हा मतदारांचा अधिकार आहे.या काळात किती बेरोजगार पदवीधरांना न्याय मिळाला,किती युवकांच्या नोकरीचा प्रश्न मार्गी लागला,किती रखडलेल्या भरती प्रक्रियांना गती मिळाली,किती शासकीय विभागांतील रिक्त पदे भरण्यासाठी सरकारला धारेवर धरण्यात आले,या प्रश्नांची उत्तरे आता मतदारांना हवी आहेत.

आज राज्यातील लाखो सुशिक्षित तरुण पदव्या घेऊन नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत. शासकीय विभागांमध्ये हजारो पदे रिक्त असल्याची चर्चा सातत्याने होते. मात्र, प्रत्यक्ष भरतीच्या वेळी शासनाकडून कधी आर्थिक अडचणी, कधी प्रशासकीय कारणे तर कधी धोरणात्मक निर्णयांचे कारण पुढे केले जाते. परीक्षांची अनिश्चितता,भरती प्रक्रियेतील विलंब,कंत्राटी नियुक्त्या आणि रोजगाराच्या संधींचा अभाव यामुळे तरुणांचे वय निघून जात आहे.शिक्षणासाठी कर्ज काढणाऱ्या पालकांच्या अपेक्षा आणि पदवी घेऊनही बेरोजगार फिरणाऱ्या युवकांचे वास्तव यामध्ये मोठी दरी निर्माण झाली आहे.

एकीकडे सरकारी क्षेत्रातील नोकऱ्यांची दारे आकुंचन पावत आहेत, तर दुसरीकडे शिक्षण, आरोग्य आणि अन्य क्षेत्रांत खासगीकरणाचा विस्तार होत आहे. अशा परिस्थितीत पदवीधरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदारांनी केवळ सभागृहात उपस्थिती लावून चालणार नाही. खासगीकरणामुळे निर्माण होणारी रोजगाराची असुरक्षितता, कंत्राटी पद्धतीतील शोषण, वेतनातील तफावत आणि युवकांच्या भविष्याचा प्रश्न यावर ठोस भूमिका घेणे गरजेचे आहे.

पदवीधर मतदारसंघातील मतदारांनी आमदार निवडून दिला तो केवळ राजकीय पक्षाची बाजू मांडण्यासाठी नव्हे, तर शिक्षित बेरोजगारांच्या प्रश्नांना विधानपरिषदेत आवाज मिळावा यासाठी. त्यामुळे आता युवकांच्या प्रश्नांवर केवळ निवेदन देणे किंवा आश्वासने देणे पुरेसे ठरणार नाही. शासनाकडे सातत्याने पाठपुरावा, रिक्त पदांची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी, नियमित नोकरभरतीचे धोरण, भरतीचे वेळापत्रक आणि बेरोजगारांसाठी ठोस उपाययोजना यासाठी आक्रमकपणे भूमिका घ्यावी लागेल.

आ.वंजारी यांनी आता आपल्या दुसऱ्या कार्यकाळात काही प्रश्नांची उत्तरे द्यावीत. मागील सहा वर्षांत पदवीधरांसाठी नेमके कोणते ठोस निर्णय घडवून आणले, किती युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले,आगामी काळात बेरोजगारी कमी करण्यासाठी त्यांचा कृती आराखडा काय आहे.

राजकारणात निवडून येणे ही एक गोष्ट आणि जनतेच्या अपेक्षांना न्याय देणे ही दुसरी गोष्ट. दुसऱ्यांदा मिळालेली संधी ही केवळ सत्तेतील उपस्थिती वाढवण्याची संधी नसून कामाचा ठसा उमटवण्याची संधी आहे. पदवीधरांच्या मतांची किंमत केवळ मतदानापुरती मर्यादित ठेवू नये.त्यांच्या शिक्षणाला रोजगाराची जोड मिळाली पाहिजे. त्यांच्या स्वप्नांना संधी मिळाली पाहिजे आणि त्यांच्या कष्टांना न्याय मिळाला पाहिजे.

आमदारांनी स्वतःचे राजकीय भवितव्य घडविण्याबरोबरच ज्या युवकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला, त्यांचेही भवितव्य घडविण्यासाठी प्रयत्न करावेत. कारण पदवीधर मतदारसंघाचा आमदार हा केवळ एका पक्षाचा किंवा व्यक्तीचा प्रतिनिधी नसतो,तर तो हजारो सुशिक्षित बेरोजगारांच्या आशा-आकांक्षांचा आवाज असतो.

आता सहा वर्षांच्या कामाचा हिशोब आणि पुढील सहा वर्षांचा कृती आराखडा द्या. पदवीधरांच्या प्रश्नांवर केवळ भाषणे नकोत,तर निर्णय हवेत.निवडून तर आले,आता युवकांचे भले करून दाखवा स्वतःचे राजकीय सोने करण्यापेक्षा पदवीधर युवकांच्या आयुष्याचे सोने करा. हीच मतदारांची अपेक्षा आणि हीच दुसऱ्या विजयाची खरी कसोटी आहे.

ग्रामीण भागातील पोलिसिंगला बळ
पिंपळखुटा, मासोद येथे पोलीस मदत केंद्र सूरू

वर्धा/जनमाध्यम

ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना पोलिसांची मदत सहज उपलब्ध व्हावी, तसेच गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवून कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी खरांगणा पोलिसांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली खरांगणा पोलीस ठाण्यांतर्गत पिंपळखुटा आणि मासोद येथे नव्याने पोलीस मदत केंद्र तथा बिट कार्यालय सुरू करण्यात आले आहे.१६ नोव्हेंबर रोजी स्थानिक नागरिक,पोलीस पाटील आणि प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीत या केंद्रांचे उद्घाटन करण्यात आले.

या परिसरात मोठ्या प्रमाणात जंगल आणि वनक्षेत्र असल्याने नागरिकांना लहान-मोठ्या तक्रारींसाठी खरांगणा पोलीस ठाण्यापर्यंत धाव घ्यावी लागत होती. विशेषत महिला, शेतकरी आणि युवकांना कायदेशीर मदत मिळविण्यासाठी अंतर पार करावे लागत होते. ही गैरसोय दूर करण्यासाठी पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने स्वतंत्र खोल्या उपलब्ध करून घेत त्यांची दुरुस्ती व रंगरंगोटी करून बिट कार्यालये कार्यान्वित केली. या नव्या केंद्रांमुळे नागरिकांच्या तक्रारींचे स्थानिक पातळीवर निवारण करणे, पोलिसांशी थेट संपर्क साधणे आणि आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत मिळविणे अधिक सुलभ होणार आहे. तसेच ग्रामीण भागातील संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे आणि गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यास मदत होणार आहे.पोलीस आणि जनता यांच्यातील दरी कमी करून पोलिसिंग थेट गावपातळीवर पोहोचविण्याच्या दृष्टीने खरांगणा पोलिसांचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

फरार आरोपींना शोधण्यासाठी पोलिसांची मोहीम
जिल्ह्याभरात २४ पथके तैनात

वर्धा/जनमाध्यम

जिल्ह्यातील गुन्हे दाखल झाल्यानंतर पोलिसांना गुंगारा देणाऱ्या फरार आणि पाहिजे आरोपींची आता खैर नाही. अशा आरोपींचा शोध घेऊन त्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी वर्धा जिल्हा पोलीस दलाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. जिल्हाभरात तब्बल २४ विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी आता तंत्रज्ञानाचीही मदत घेण्यास सुरुवात केली आहे.

पोलीस महासंचालकांच्या निर्देशानुसार राज्यभरात १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत फरार व पाहिजे आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत वर्धा जिल्ह्यातील सर्व १९ पोलीस ठाण्यांना प्रत्येकी एक पथक देण्यात आले आहे. याशिवाय चार उपविभागीय पोलीस अधिकारी पथके आणि स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक अशा एकूण २४ पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या मोहिमेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी १४ नोव्हेंबर रोजी पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक घेण्यात आली. यावेळी फरार आणि पाहिजे आरोपींचा शोध घेण्यात येत असलेल्या अडचणी, आतापर्यंतची कार्यवाही आणि पुढील नियोजनाचा आढावा घेण्यात आला. प्रत्येक ठाणेदाराने या मोहिमेला गांभीर्याने घेत नियोजनबद्ध पद्धतीने आरोपींचा शोध घेण्याचे निर्देश पोलीस अधीक्षकांनी दिले. केवळ पारंपरिक तपासावर अवलंबून न राहता NATGRID आणि समन्वय पोर्टलसारख्या आधुनिक प्रणालींचा प्रभावी वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. उपलब्ध माहितीचे तांत्रिक विश्लेषण करून आरोपींचा माग काढण्यासोबतच इतर जिल्हे आणि राज्यांतील पोलीस यंत्रणांशी समन्वय साधण्यावर भर देण्यात आला आहे.बैठकीला अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

गौळच्या शाळेत शिक्षकांचा दूष्काळ; विद्यार्थ्यांच्या भविष्याचे काय

गौळ/जनमाध्यम

सरकारी शाळा सक्षम करण्याच्या घोषणा करायच्या, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे गोडवे गायचे आणि प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पुरेसे शिक्षकही द्यायचे नाहीत. शिक्षण विभागाच्या या कारभारामुळे गौळ येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षण व्यवस्थेचे तीनतेरा वाजले आहेत. सात वर्गांसाठी केवळ तीन शिक्षक प्रत्यक्ष अध्यापन करीत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य टांगणीला लागले आहे. सात वर्गांचा डोंगर तीन शिक्षकांनी उपसायचा तरी कसा, हा गंभीर प्रश्न आता पालक आणि ग्रामस्थांसमोर उभा ठाकला आहे.

गौळ येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत वर्ग आहेत. या सात वर्गांसाठी एकूण चार शिक्षक कार्यरत आहेत. मात्र, त्यापैकी एका शिक्षकाकडे मुख्याध्यापकपदाचा कार्यभार असल्याने प्रशासकीय कामकाज, शासकीय अहवाल आणि इतर जबाबदाऱ्यांमध्ये त्यांचा बहुतांश वेळ जातो. परिणामी प्रत्यक्ष अध्यापनाची जबाबदारी केवळ तीन शिक्षकांवर येऊन पडली आहे. एका शिक्षकाने दोन वर्ग सांभाळायचे, विद्यार्थ्यांना शिकवायचे, अभ्यासक्रम पूर्ण करायचा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडेही लक्ष द्यायचे. ही शिक्षण व्यवस्था आहे की शिक्षकांची अग्निपरीक्षा, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

तीन शिक्षकांनी सात वर्गांना शिकवायचे तरी कसे

प्रत्येक वर्गाचा अभ्यासक्रम वेगळा आहे. विद्यार्थ्यांची आकलनक्षमता वेगळी आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र वेळ देणे, नियमित सराव घेणे आणि शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. मात्र, एकाच वेळी दोन वर्गांची जबाबदारी सांभाळताना शिक्षकांची दमछाक होणे स्वाभाविक आहे. एका वर्गात अध्यापन सुरू असताना दुसऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांचे शिक्षण नेमके कसे होणार, हा प्रश्न अनुत्तरित आहे. शिक्षकांची कमतरता भरून काढण्याऐवजी उपलब्ध शिक्षकांवरच अतिरिक्त भार टाकून शिक्षण विभागाने हात झटकले आहेत काय, असा प्रश्न पालकांकडून उपस्थित केला जात आहे.

सरकारी शाळा वाचवायच्या की केवळ घोषणा करायच्या

गौळ गावाची लोकसंख्या सुमारे अडीच हजार आहे. शिक्षणासाठी जावे लागू नये आणि गावातीलच जिल्हा परिषद शाळेत दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी पालक आणि ग्रामस्थ सातत्याने प्रयत्न करीत आहेत. मात्र, शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरेसे शिक्षकच मिळत नसतील तर सरकारी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या घोषणांना अर्थ काय उरतो.अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी सरकारी शाळांमध्ये प्रवेश घ्यावा, अशी अपेक्षा ठेवताना त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्यास प्रशासन तयार आहे काय, हा खरा प्रश्न आहे. शिक्षण विभागाने गौळ येथील जिल्हा परिषद शाळेची परिस्थिती गांभीर्याने घ्यावी. किमान एका अतिरिक्त शिक्षकाची तातडीने नियुक्ती करावी आणि मुख्याध्यापकांचा प्रत्यक्ष अध्यापनासाठी पुरेसे शिक्षक उपलब्ध करून द्यावेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा होण्यापूर्वी प्रशासनाने ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे.

सात वर्गांचा भार तीन शिक्षकांवर टाकून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा करणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी तडजोड करण्यासारखे आहे. शिक्षण विभागाने आता तरी कागदी नियोजनाच्या बाहेर येऊन गौळच्या शाळेकडे लक्ष द्यावे. अन्यथा सरकारी शाळा सक्षम करण्याच्या घोषणा आणि प्रत्यक्षातील शिक्षकांची वानवा यातील विरोधाभास अधिकच उघड होईल. अतिरिक्त शिक्षकाची नियुक्ती तातडीने करावी, अशी जोरदार मागणी पालक आणि ग्रामस्थांकडून होत आहे.

१०३ विद्यार्थी बनले 'सडक सूरक्षा मित्र'
अपघात रोखण्याची घेतली जबाबदारी



समुद्रपूर/जनमाध्यम

रस्त्यांवरील अपघातांचे वाढते प्रमाण आणि त्यात होणारी जीवितहानी रोखण्यासाठी आता युवकांनीच पुढाकार घेतला आहे. भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय आणि MY Bharat यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'सडक सुरक्षा मित्र' उपक्रमांतर्गत समुद्रपूर येथील आयटीआय महाविद्यालयात १०३ विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा विषयक प्रशिक्षण देण्यात आले. मंगळवारी आयोजित या एकदिवसीय प्रशिक्षणात CoERS, IIT मद्रासच्या पथकातील कर्नल संजीव शर्मा आणि रणजीत चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमांतर्गत १०३ विद्यार्थ्यांची MY Bharat पोर्टलवर स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्यात आली. हे विद्यार्थी आता 'सडक सुरक्षा मित्र' म्हणून समाजात जनजागृती करणार आहेत.

महामार्ग सुरक्षा विभागाचे पोलीस अधीक्षक डॉ. लोहित मतानी यांनी रस्ता सुरक्षा ही केवळ पोलिसांची नव्हे,तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगितले. अपघातमुक्त समाजासाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमासाठी आयटीआयचे प्राचार्य रासेकर,चौधरी तसेच महामार्ग सुरक्षा केंद्र जामच्या एपीआय सरिता यादव आणि अंमलदार चंद्रकांत जीवतोडे यांनी सहकार्य केले.

शहर स्वच्छ ठेवणाऱ्या हातांना भाऊबीजेची मायेची ओवाळणी
महिला सफाई कर्मचाऱ्यांचा नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्या हस्ते साडी चोळी देऊन सन्मान



वर्धा/जनमाध्यम

दिवस असो वा रात्र, ऊन असो वा पाऊस, शहराच्या स्वच्छतेसाठी अहोरात्र राबणाऱ्या महिला सफाई कर्मचाऱ्यांच्या कष्टांची जाणीव ठेवत नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनी भाऊबीजेच्या निमित्ताने त्यांच्याशी आपुलकीचे नाते जपले. नगराध्यक्षांच्या दालनात महिला सफाई कर्मचाऱ्यांसोबत भाऊबीजेचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी औक्षण करून घेत साडी चोळी आणि भेटवस्तू देत या स्वच्छता दूतांचा सन्मान करण्यात आला.

शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यामागे महिला सफाई कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेताना स्वतःच्या सुखसोयी बाजूला ठेवून त्या दररोज कर्तव्य बजावतात. त्यांच्या श्रमांची दखल घेत भाऊबीजेच्या निमित्ताने त्यांना सन्मान आणि आपुलकीची भेट देण्यात आली.

यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ म्हणाले की, महिला सफाई कर्मचारी या केवळ नगर परिषदेच्या कर्मचारी नसून शहराच्या आरोग्याच्या खऱ्या रक्षक आहेत. त्यांच्या मेहनतीमुळेच शहर स्वच्छ आणि सुंदर राहते. त्यांच्या कार्याचा गौरव करणे ही आपली सामाजिक जबाबदारी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. नगराध्यक्षांकडून मिळालेल्या सन्मानामुळे महिला कर्मचाऱ्यांनीही आनंद व्यक्त केला. प्रशासनाकडून मिळालेली ही आपुलकी काम करण्याचा उत्साह वाढविणारी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाला नगर परिषदेच्या शिक्षण सभापती प्रियंका खंगार, उपमुख्याधिकारी अभिजीत मोटघरे, स्वच्छता विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने महिला सफाई कर्मचारी उपस्थित होत्या.शहराच्या स्वच्छतेसाठी झटणाऱ्या हातांना भाऊबीजेच्या निमित्ताने मिळालेली ही मायेची ओवाळणी सामाजिक जिव्हाळ्याचा संदेश देणारी ठरली.



क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची जयंती उत्साहात

वर्धा- क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त व जनजातीय गौरव दिवसाचे औचित्य साधून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात भगवान बिरसा मुंडा जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून आर्वीच्या नायब तहसीलदार सुजाता उईके, वर्धाचे नायब तहसीलदार अजय धर्माधिकारी उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे विदर्भ अध्यक्ष चंद्रशेखर मडावी, जिल्हाध्यक्ष शरद आडे, बिरसा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष हरिदास टेकाम यांची उपस्थिती होती. यावेळी सहाय्यक प्रकल्प अधिकारी शैलेंद्र खडसे तसेच प्रकल्प कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधून समाजाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन केले.

नावात बदल

माझे पूर्वी SHARDA PRAKASH TAJNE असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील SHARDA PRAKASH TAJANE नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता: राजश्री शाहू नगर देशपांडे लेआऊट नालवाडी वर्धा 442001

नावात बदल

माझे पूर्वी PRAKASH DEORAO TAJNE असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील PRAKASH DEORAO TAJANE नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता: राजश्री शाहू नगर देशपांडे लेआऊट नालवाडी वर्धा 442001

नावात बदल

माझे पासपोर्ट नंबर M1564016 वरील माझे SANSKAR PRAKASH TAJNE असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील SANSKAR PRAKASH TAJANE नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.
पत्ता : राजश्री शाहू नगर देशपांडे, लेआऊट नालवाडी वर्धा 442001

अखेर दहशत पसरविणारे अस्वल वनविभागाच्या जाळयात

सेलू/जनमाध्यम

शेतात जायचे तरी कसे, असा प्रश्न निर्माण करणाऱ्या अस्वलाच्या दहशतीचा अखेर अंत झाला आहे. झडशी सहवन क्षेत्रातील आकोली, आमगावसह परिसरातील गावांमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून धुमाकूळ घालणाऱ्या अस्वलाला वर्धा वनविभागाने जेरबंद केले. वनविभाग आणि रेस्क्यू टीमच्या या धडक कारवाईमुळे शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामस्थांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

सेलू तालुक्यातील झडशी सहवन क्षेत्रांतर्गत जंगलालगत असलेल्या आकोली, आमगाव, रिधोरा, तामसवाडा, बोरखेडी



कला आणि गिरोली या गावांमध्ये अस्वलाचा वावर वाढला होता.अस्वलाच्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आमगाव येथील ६७ वर्षीय शेतकरी गौळकर यांच्यावर अस्वलाने हल्ला करून त्यांना जखमी केले होते. त्यामुळे शेतात जाणाऱ्या शेतकरी आणि मजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला होता.

अखेर आंजी ते आकोली मार्गावरील मौजा वडगाव शिवारालगत नदीकाठच्या झुडपांमध्ये अस्वलाचे ठिकाण शोधण्यात आले. त्यानंतर पथकाने नियोजनबद्ध मोहीम राबवत अस्वलाला सावधगिरीने जेरबंद केले.उपवनसंरक्षक हरवीर सिंग आणि सहायक वनसंरक्षक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली. वनपरिक्षेत्र अधिकारी मीनल तुरखेडे,वनपाल सुनील कोटजावर,वनरक्षक काळे, वाघाळबांडे, आष्टीकर, खेडुलकर,ऋषिकेश घोडसे,धुर्वे तसेच मानद वन्यजीव रक्षक कौस्तुभ गावंडे आणि त्यांच्या रेस्क्यू पथकाने या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली.

अनेक दिवसांपासून अस्वलाच्या दहशतीखाली वावरणाऱ्या गावकऱ्यांना या कारवाईमुळे मोठा दिलासा मिळाला आहे. वनविभागाच्या या कामागिरीचे परिसरातील ग्रामस्थांकडून स्वागत होत असून शेतकरी आणि शेतमजुरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वपूर्ण ठरली आहे.

MAHATRANSCO

TENDER NOTICE

MSETCL invites offers through SRM e-tendering from the eligible registered bidders for following work of.

Sr. No.	Name of work	Tender amount	Tender No	Sale period	Submission Deadline
1	Structural strengthening work of Old RCC equipment structure at 220kV Wardha S/stn Dist. Chandrapur.	Rs. 2,50,91,286.61 (Including GST) Rs. 2,12,63,802.21 (Excluding GST)	T-27/26-27/ MSETCL/ CO/CIVIL/ RFx No. 7000042103	19/11/2026 to 28/11/2026	28/11/2026 up to 18:00 Hrs.

Interested bidders may obtain further information available on MSETCL's SRM e-tendering website- **https://srmetender.mahatransco.in**
Contact Person:- Assistant Engineer (Civil), 022-69595011 M.No.7039279363.
Sd/- **Chief Engineer (Civil), C.O. MSETCL**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३५१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

संविधान सन्मान महासभेला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहा

निरीक्षक उत्तम वनशिव यांचे आवाहन



अमरावती येथे वंचित बहुजन आघाडीची आढावा बैठक

अमरावती/प्रतिनिधीः- वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात संविधान सन्मान सभा आयोजित करण्यात आली असून सदर संविधान सन्मान सभेला अमरावती जिल्ह्यातून तमाम संविधान प्रेमी जनता तसेच कार्यकर्त्यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नवनियुक्त निरीक्षक उत्तम वनशिव यांनी केले.

दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ रोजी शिवाजी पार्क मुंबई येथील आयोजित संविधान सन्मान महासभा तसेच आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे नवनियुक्त निरीक्षक उत्तम वनशिव अमरावती शहरात आले असताना त्यांनी वंचित बहुजन आघाडी पूर्व व पश्चिम विभाग जिल्हा कार्यकारिणी, तालुका कार्यकारिणीचा आढावा घेतला.

यावेळी बोलताना वनशिव पुढे म्हणाले की, कार्यकर्त्यांनी स्वतः भूमिका घेऊन जनतेच्या प्रश्नांना न्याय दिला पाहिजे. आगामी काळात जिल्हा परिषदेत वंचित बहुजन आघाडीचे सदस्य मोठ्या संख्येने निवडून येतील असा विश्वासही वनशिव यांनी व्यक्त केला. यावेळी मंचावर जिल्हा प्रभारी डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, जिल्हाध्यक्ष राहुल मेश्राम, जिल्हाध्यक्ष संजय चौरपगार, महासचिव अशोक नवलकार, साहेबराव वाकपांजर, युवा आघाडी जिल्हाध्यक्ष अंकुश वाकपांजर, सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हाध्यक्ष अजय तायडे उपस्थित होते. याप्रसंगी मुंबई येथील संविधान सन्मान महासभेला जिल्हाभरातून मोठ्या संख्येने संविधान प्रेमी जनतेसह सहभागी होणार असा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

आयोजित आढावा सभेला यावेळी ज्येष्ठ नेते आनंदराव इंगळे, पुरुषोत्तम बागडी, बी आर धाकडे, रमेश आठवले, युवा आघाडी जिल्हा महासचिव सागर भवते, सुरेश तायडे, तिवसा तालुका अध्यक्ष मनीष खरे, धामणगाव तालुका अध्यक्ष प्रशांत नाईक, दर्यापूर तालुका अध्यक्ष रायबोले, अतुल नळकांडे, विजय डोंगरे, बबलू रामटेके, शैलेश बागडे, प्रमोद राऊत, चंदू उके, शुभम हेंडवे, सुरेंद्र फूसाटे, अमोल जवंजाळ, नकुल नाईक, दिनेश भटकर हंसराज अघम, सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अमरावती जिल्ह्यात वंचित सत्ता काबीज करणार-डॉ. पुंडकर

अमरावती जिल्ह्यातील आंबेडकरी जनतेने वंचित बहुजन आघाडीला कायम साथ दिली आहे. कार्यकर्त्यांनी जनसंपर्क कायम ठेवून लोकहिताच्या कार्याला प्राधान्य द्यावे. महानगरपालिका निवडणुकीत कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत कौतुकास्पद असून आगामी निवडणुकीत वंचित अमरावती मध्ये सत्ता काबीज करणार हे निश्चित आहे असा विश्वास जिल्हा प्रभारी डॉ. धैर्यवर्धन पुंडकर यांनी व्यक्त केला. बैठकीचे संचालन व प्रास्ताविक सागर भवते यांनी केले.

ॲड.अमोल ठाकरे यांना समाजभूषण पुरस्कार

विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून गौरव



अमरावती/प्रतिनिधीः- शिव संभाजी स्वराज्य प्रतिष्ठानच्या वतीने अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य तसेच प्रसिद्ध इन्कम टॅक्स प्रॅक्टिशनर व टॅक्स कन्सल्टंट ॲड. अमोल ठाकरे यांना नुकताच समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानाबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. रवींद कडू, सिनेट सदस्य तथा विद्यापीठ विकास मंचचे अमरावती विभागीय निमंत्रक राजेंद्रप्रसाद पाण्डे, सिनेट सदस्य प्रा. श्रीकांत काळीकर, गिरीश शेरेकर, सुनील तिप्पट, प्रा. डॉ. श्याम मुंजे, वैद्यकीय क्षेत्रातील सेवाव्रती डॉ. नंदकिशोर लोहाना, डॉ. बायस्कर, अमोल यांचे वडील ज्येष्ठ अधिवक्ता अरुण ठाकरे, अमोल यांच्या पत्नी अधिवक्ता अपर्णा ठाकरे आणि प्राचार्या ममता पाण्डे आदी मान्यवर उपस्थित होते.

ॲड. अमोल ठाकरे यांचे धार्मिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे. समाजभूषण पुरस्कार हा त्यांच्या कार्याची दखल घेणारा सन्मान असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. त्यांच्या या यशाबद्दल आनंद व्यक्त करीत मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

एटीएम कार्ड बदलून ४२ हजार लंपास

बडनेरा येथील घटना



अमरावती/प्रतिनिधीः- एटीएममधून पैसे काढण्यासाठी मदत करण्याच्या बहाण्याने दोन अज्ञात ठगांनी बडनेरा येथील एका इसमाचे एटीएम कार्ड बदलून दिले आणि वेगवेगळ्या एटीएम सेंटर मधून त्यांच्या खात्यातून ४२ हजार ७०० रुपये काढून घेतले.

ही घटना रविवारी रात्री सुमारे ११ वाजता बडनेरा येथील आठवडी बाजार स्थित बँक ऑफ महाराष्ट्र एटीएम सेंटरमध्ये घडली. तक्रारदार अरविंद यशभानजी खांडेकर (वय ५६, रा. प्रोफेसर कॉलनी, नवी वस्ती, बडनेरा) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन अज्ञात आरोपीं विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

माहितीनुसार, अरविंद खांडेकर रविवारी रात्री सुमारे ११ वाजता पैसे काढण्यासाठी एटीएम सेंटरमध्ये गेले होते. दोन वेळा प्रयत्न करूनही तांत्रिक कारणामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे मशीनमधून पैसे निघाले नाहीत.याच दरम्यान एटीएम सेंटरच्या बाहेर उभ्या असलेल्या दोन अज्ञात तरुणांनी त्यांना मदत करण्याच्या बहाण्याने आत प्रवेश केला. आरोपींनी त्यांच्या मदतीच्या बहाण्याने त्यांचे एटीएम कार्ड घेतले आणि चलाखीने पिन नंबरही पाहून घेतला. रुपये काढण्याचे नाटक केल्यानंतर त्यांनी मशीनमधून पैसे न निघण्याची बाब सांगितली आणि मोठ्या सफाईने अरविंद खांडेकर यांचे खरे कार्ड स्वतःकडे ठेवून त्यांना दुसरे मिळते-जुळते कार्ड दिले. यानंतर अरविंद खांडेकर घरी परतले.

घरी परतल्यानंतर काही वेळातच त्यांच्या मोबाईलवर खात्यातून पैसे निघाल्याचे मेसेज येऊ लागले. चौकशी केल्यानंतर कळले की, आरोपींनी वेगवेगळ्या एटीएम सेंटरमधून त्यांच्या खात्यातून एकूण ४२ हजार ७०० रुपये काढून घेतले आहेत.

फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तात्काळ पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींचा शोध सुरू केला आहे.

दीड महिन्यापासून पती गायब; पत्नीची पोलिसांत धाव

अमरावती/प्रतिनिधीः- पत्नी आणि मुलांच्या आजारपणामुळे त्यांना माहेरी सोडून आठ दिवसांत परत आणण्याचे आश्वासन देणारा पती दीड महिना उलटूनही घरी परतला नाही.

वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही प्रतिसाद मिळत नसल्याने पत्नीने नातेवाइकांकडे शोध घेतला. मात्र, पतीचा ठावठिकाणा लागत नसल्याने अखेर पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली. जीवन मोरे असे बेपत्ता पतीचे नाव असल्याचे तक्रारीत नमूद आहे. पत्नी आणि मुले आजारी असल्याने त्यांनी त्यांना वरूड येथे माहेरी सोडण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी पत्नीला आठ दिवसांनी परत नेण्यासाठी येईल, असे आश्वासन दिल्याचे सांगण्यात आले.

मात्र, आठ दिवस उलटून गेले तरी पती परतला नाही. सुरुवातीला काही कारणामुळे येण्यास विलंब होत असावा, अशी पत्नीची समजूत होती. परंतु दिवस उलटत गेले आणि संपर्कही होत नसल्याने चिंता वाढली. दरम्यान, पत्नी आणि मुलांची प्रकृती सुधारल्यानंतर ती मलकापूर येथे परत आली. घरी आल्यानंतर शेजाऱ्यांकडे पतीबाबत चौकशी केली असता, तो कोणालाही काही न सांगता निघून गेल्याची माहिती मिळाल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर पत्नीने नातेवाइकांकडेही चौकशी केली. संभाव्य ठिकाणी शोध घेऊनही जीवन मोरे यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाली नाही.

दीड महिन्यापासून पतीचा संपर्क नसल्याने चिंतेत असलेल्या पत्नीने अखेर पोलीस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार नोंदविण्यात आली.

शेतातील खोली फोडून पाच क्विंटल सोयाबीन लंपास

अमरावती/प्रतिनिधीः- शेतमालाला चांगला भाव मिळण्याची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्याच्या साठवणुकीतील सोयाबीनवर चोरट्याने डल्ला मारला. शेतातील खोलीचे कुलूप आणि कोंडा तोडून तब्बल पाच क्विंटल सोयाबीन चोरून नेण्यात आले. सुमारे ३० हजार रुपयांच्या या चोरीप्रकरणी लोणी पोलिसांनी एका संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ओंकारराव तुळशीरामजी बिटने (वय ५५, रा. शिवनगर, अमरावती) यांच्या मालकीच्या शेतातील खोलीत सोयाबीनचा साठा ठेवण्यात आला होता. काढणी केलेला शेतमाल सुरक्षित राहावा, या उद्देशाने तो खोलीत ठेवण्यात आला होता. मात्र, चोरट्याने या खोलीलाच लक्ष्य केले.

१६ नोव्हेंबर रोजी रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास जावरा शिवारात हा प्रकार उघडकीस आला. अज्ञात व्यक्तीने खोलीचे कुलूप तसेच कोंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर तेथे ठेवलेले सोयाबीनचे दहा कट्टे चोरून नेले. या कट्टयांमध्ये एकूण पाच क्विंटल सोयाबीन होते. चोरीला गेलेल्या मालाची किंमत अंदाजे ३० हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. शेतातील खोलीची अवस्था पाहिल्यानंतर चोरी झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर संबंधित शेतकऱ्याने पोलिसांकडे धाव घेतली.

प्रतिबंधित पानमसाल्याची तस्करी; ११.२५ लाखांचा माल जप्त

पोलिसांची चाहूल लागताच चालक पसार



अमरावती/प्रतिनिधीः- महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या सुगंधित पानमसाल्याच्या अवैध वाहतुकीवर अमरावती शहर गुन्हे शाखेने जोरदार प्रहार केला आहे. राहाटगाव मार्गावर सापळा रचून पोलिसांनी ७५ किलो सुगंधित पानमसाला, नामांकित कंपन्यांचे पॅकेजिंग रोल आणि सहा लाख रुपये किमतीची बलेनो कार असा तब्बल ११ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मात्र, पोलिसांचा सापळा लक्षात येताच वाहनचालक कार घटनास्थळी सोडून पसार झाला. गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक दशरथ आडे हे १६ नोव्हेंबर रोजी पथकासह शहरात गस्तीवर होते. त्यावेळी नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ड्रीमलँड ते राहाटगाव मार्गावरून रेकॉर्डवरील आरोपी सुनील कैथवास (रा. मातापैल, बडनेरा) हा प्रतिबंधित सुगंधित पानमसाल्याची वाहतूक करणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी दोन पंचांना सोबत घेऊन राहाटगाव मार्गावरील मारुती सुझुकी सर्व्हिस सेंटरजवळ सापळा रचला. काही वेळातच संशयित मारुती सुझुकी बलेनो (एमएच २७/बीझेड ६०६७) तेथे दाखल झाली. पोलिसांनी वाहन थांबविण्याचा प्रयत्न करताच चालकाने कारची चावी काढली आणि वाहन जागेवरच सोडून पळ काढला.

पोलिसांनी पंचांसमक्ष कारची झडती घेतली असता दोन बॅगांमध्ये सुमारे ७५ किलो सुगंधित पानमसाला आढळला. त्याची किंमत १ लाख ५० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय पान बहार कंपनीचे चार पॅकेजिंग रोल (३ लाख रुपये) आणि विमल पानमसाल्याचा एक पॅकेजिंग रोल (७५ हजार रुपये) मिळून आला. सहा लाख रुपये किमतीची बलेनो कारही जप्त करण्यात आली. अशा प्रकारे एकूण ११ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल गुन्हे शाखेने ताब्यात घेतला.

या प्रकरणी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात सुनील कैथवास याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २२३, २७४, २७५ आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ च्या कलम ५९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाहनचालक पसार झाल्याने या प्रतिबंधित मालाचा पुरवठा नेमका कुठून झाला आणि तो कुठे पोहोचविण्यात येणार होता, याचा तपास आता पोलिसांसमोर महत्त्वाचा ठरणार आहे. पॅकेजिंग रोलच्या उपस्थितीमुळे या मालाच्या व्यवहारामागील साखळी शोधण्याची गरजही अधोरेखित झाली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, शाम घुगे, प्रांजली सोनवणे आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, अतुल वर, सहायक पोलीस निरीक्षक दशरथ आडे, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनोने, सचिन माकोडे आणि राहुल महाजन यांच्यासह पथकातील अधिकारी व अंमलदारांनी सहभाग घेतला.

आमझरीत दिवाळीचा खरा आनंद

आदिवासी बांधवांना फराळ, कपडे वाटप आणि व्यसनमुक्तीचा संदेश



अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- आमझरी येथे दिवाळीच्या निमित्ताने आदिवासी बांधव आणि भगिनींसाठी भव्य व्यसनमुक्ती मार्गदर्शन, फराळ व कपडे वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमाला गावकऱ्यांसह सामाजिक कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. मराठा सेवा संघ अंजनगाव सुर्जी, उडान महिला चॅरिटेबल ग्रुप आणि संकल्प व्यसनमुक्ती केंद्र कारला यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी आदिवासी बांधवांना दिवाळी निमित्त फराळाचे वाटप करण्यात आले, तसेच गरजू कुटुंबांना कपड्यांचेही वाटप करण्यात आले. केवळ वाटपापुरता हा कार्यक्रम मर्यादित न राहता, व्यसनमुक्तीपर सखोल मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.व्यसनामुळे कुटुंब, आरोग्य आणि समाजावर होणारे दुष्परिणाम याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. व्यसन सोडण्यासाठी इच्छाशक्ती, कुटुंबाचा आधार आणि समुपदेशन किती महत्त्वाचे आहे, हे यावेळी उदाहरणांसह स्पष्ट करण्यात आले. तरुण पिढीने व्यसनापासून दूर राहून शिक्षण, शेती आणि व्यवसायाकडे वळावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.या कार्यक्रमाला मराठा सेवा संघाचे अध्यक्ष डॉ. शोण देशमुख, अरुण पाटील गावंडे, हिम्मतराव बारेवार, संकेत इंगळे, संकल्प व्यसनमुक्ती केंद्राच्या अध्यक्षा उमा दाळू, सचिव एम. एम. भांबेरे, डॉ. अरुणा दोड, समुपदेशक गोपाल जी. जांबेकर, उडान महिला चॅरिटेबल ग्रुपच्या सारिका धामोळे, राजीव पानुरकर यांच्यासह सर्व पक्षाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि मानवसेवा संस्थेतील कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शोण देशमुख यांनी केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात व्यसनमुक्त समाज हाच खरा प्रगत समाज असल्याचे सांगत, प्रत्येक गावात व्यसनमुक्तीची चळवळ पोहोचवण्याची गरज व्यक्त केली. तर गोपाल जांबेकर यांनी आभार प्रदर्शन केले. दिवाळीच्या आनंदात समाजातील वंचित घटकांना सोबत घेऊन त्यांना मदतीचा हात देणे आणि त्यांना व्यसनमुक्त जीवनाकडे वळवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश यशस्वी झाल्याची भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केली.

गाडगेनगरमध्ये बंद पडली एसटी



अमरावती/प्रतिनिधीः- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या परतवाडा डेपोची बस आज बुधवार १८ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता गाडगे नगर परिसरातील शासकीय तंत्र महाविद्यालयासमोर अचानक बंद पडली. बसमध्ये बिघाड झाल्याने दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. बस बंद पडताच चालक वाहक वाहनातून गायब झाले. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या त्रासाचा सामना करावा लागला.

माहिती नुसार परतवाडा आगाराची बस बुधवारी सकाळी प्रवाशांना घेऊन निघाली होती. मात्र गाडगे नगर येथे पोहोचताच अचानक बस मध्ये बिघाड झाला आणि बस बंद झाली.

बस अचानक बंद पडल्याने प्रवासी रस्त्यावरच अडकले. काही प्रवाशांना दुसऱ्या वाहनाने जावे लागले, तर काहींना ताटकळत उभे राहावे लागले. चालक-वाहकांनी प्रवाशांना कोणतीही माहिती न देता तेथून पळ काढल्याने प्रवाशांमध्ये संताप व्यक्त केला जात होता.

धामणगाव रेल्वेतील घरफोडीचा २४ तासांत छडा; दोन आरोपी जेरबंद

गॅस सिलिंडर आणि ११ हजार ७०० रुपयांची रोकड हस्तगत

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील मोहम्मदपुरा परिसरात झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या २४ तासांत छडा लावला. या प्रकरणात दोन आरोपी निष्पन्न करण्यात आले असून, त्यांच्याकडून चोरीस गेलेला गॅस सिलिंडर आणि ११ हजार ७०० रुपयांची रोकड, तसेच गुन्ह्यात वापरलेली लोखंडी सळई असा एकूण १३ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

धामणगाव रेल्वे येथील मोहम्मदपुरा, वॉर्ड क्रमांक ४ येथे राहणाऱ्या रेखा ईश्वर मानकर (वय ५५) यांच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला होता. चोरट्यांनी घरातून एचपी कंपनीचा गॅस सिलिंडर, पितळी ताटे आणि कपाटातील २० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण २२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. याप्रकरणी दत्तापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१ (३), ३३१ (४) आणि ३०५ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी घरफोडी व चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक रोहित कुदळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला. १८ नोव्हेंबर रोजी चांदूर रेल्वे परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय बातमीदाराकडून संशयित आरोपींबाबत माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने मोहम्मदपुरा परिसरात जाऊन संशयितांची चौकशी केली. चौकशीदरम्यान त्यांनी घरफोडी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात हृषीकेश मनोज पटले (वय २६) आणि कृष्णा सुधाकर नेवारे (अंदाजे वय ३०), दोघेही रा. मोहम्मदपुरा, वॉर्ड क्रमांक ४, धामणगाव रेल्वे, असे दोन आरोपी निष्पन्न करण्यात आले. त्यांच्याकडून एचपी कंपनीचा गॅस सिलिंडर, ११ हजार ७०० रुपयांची रोख रक्कम आणि चोरीसाठी वापरलेली लोखंडी सळई असा एकूण १३ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला. चोरी केलेल्या रोख रकमेपैकी काही रक्कम खर्च केल्याचे आरोपींनी सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम आणि अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकात पोलीस उपनिरीक्षक रोहित कुदळे, सुधीर बावणे, सचिन गायधने आणि चालक एएसआय संजय प्रधान यांचा समावेश होता.

दिवाणी न्यायालय (क.स्तर) तथा प्र.श्रे.न्यायदंडाधिकारी, चांदूरबाजार (कोर्ट नं.१)

कि.को.फौ.अर्ज क्र. ३९६/२०२६ ने.ता.०४.१२.२०२६

अर्जदार - नसीम अहेमद अब्दुल खालिक, वय ४३ वर्षे, व्यवसाय - व्यापार रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निबंधक जन्म मृत्यू, ग्रामपंचायत कार्यालय, शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

जन्म व मृत्यू नोंदाणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे होण्याबाबत.

अर्जदार हा शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचा रहिवासी आहे. अर्जदाराची मौसी नामे **कैंसर बानो मोहम्मद खाँ** यांचा जन्म दिनांक **०४.११.१९७१** रोजी शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला आहे.

ज्याअर्थी उपरोक्त वरील अर्जदार यांनी गैरअर्जदाराविरुध्द जन्म मृत्यू नोंदणी दुरुस्ती अधिनियम २०२६ चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी सदर अर्जास गैरअर्जदार अथवा इतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने अगर नेमलेल्या वकीलामार्फत दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूरबाजार येथे हजर रहावे. अन्यथा गैरअर्जदाराच्या गैरहजेरीत प्रकरण पुढे चालविण्यात येईल.

आज दि.२८.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दिनांक २८.१०.२०२६

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार
शिक्का

दिवाणी न्यायालय (क.स्तर) तथा प्र.श्रे.न्यायदंडाधिकारी, चांदूरबाजार (कोर्ट नं.१)

कि.को.फौ.अर्ज क्र. ३९३/२०२६ ने.ता.१४.१२.२०२६

अर्जदार - सिराजुद्दीन अंसारुद्दीन काजी, वय २६ वर्षे, व्यवसाय - वकील रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निबंधक जन्म मृत्यू, ग्रामपंचायत कार्यालय, शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

जन्म व मृत्यू नोंदाणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे होण्याबाबत.

अर्जदार हा शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचा रहिवासी आहे. अर्जदाराचे नांव **सिराजुद्दीन अंसारुद्दीन काजी** यांचा जन्म दिनांक २७.०१.२००० रोजी शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला आहे.

ज्याअर्थी उपरोक्त वरील अर्जदार यांनी गैरअर्जदाराविरुध्द जन्म मृत्यू नोंदणी दुरुस्ती अधिनियम २०२६ चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी सदर अर्जास गैरअर्जदार अथवा इतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने अगर नेमलेल्या वकीलामार्फत दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूरबाजार येथे हजर रहावे. अन्यथा गैरअर्जदाराच्या गैरहजेरीत प्रकरण पुढे चालविण्यात येईल.

आज दि.२८.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दिनांक २८.१०.२०२६

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार
शिक्का

दिवाणी न्यायालय (क.स्तर) तथा प्र.श्रे.न्यायदंडाधिकारी, चांदूरबाजार (कोर्ट नं.१)

कि.को.फौ.अर्ज क्र. ३९०/२०२६ ने.ता.०४.१२.२०२६

अर्जदार - नसीम अहेमद अब्दुल खालिक, वय ४३ वर्षे, व्यवसाय - व्यापार रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निबंधक जन्म मृत्यू, ग्रामपंचायत कार्यालय, शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

जन्म व मृत्यू नोंदाणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे होण्याबाबत.

अर्जदार हा शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचा रहिवासी आहे. अर्जदाराची आई नामे **साजेदा बानो मोहम्मद खाँ** यांचा जन्म दिनांक **१३.०५.१९६७** रोजी शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला आहे.

ज्याअर्थी उपरोक्त वरील अर्जदार यांनी गैरअर्जदाराविरुध्द जन्म मृत्यू नोंदणी दुरुस्ती अधिनियम २०२६ चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी सदर अर्जास गैरअर्जदार अथवा इतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने अगर नेमलेल्या वकीलामार्फत दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूरबाजार येथे हजर रहावे. अन्यथा गैरअर्जदाराच्या गैरहजेरीत प्रकरण पुढे चालविण्यात येईल.

आज दि.२८.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दिनांक २८.१०.२०२६

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक,
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार
शिक्का

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ७६
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

संक्षिप्त



जवळा शहापूर येथे रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

टाकरखेडा शंभू- चांदूरबाजार तालुक्यातील जवळा शहापूर येथे श्री सर्वज्ञ महानुभाव सेवा समिती, जवळा शहापूर आणि मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला युवकांसह परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.अमरावती जिल्हा ग्रामीण महानुभाव सेवा मंडळाच्या प्रेरणेने आयोजित श्री पंचकृष्ण समाजप्रबोधन व्याख्यानमाला, श्रीमद्भागवत कथा तसेच महानुभाव पंथीय भव्य मेळाव्याच्या निमित्ताने या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.रक्तदान हे श्रेष्ठदान असून, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या उदात्त हेतूने अनेक रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक बांधिलकी जपत आयोजकांनी मानवसेवेचा आदर्श निर्माण केला.शिबिराच्या यशस्वितेसाठी श्री सर्वज्ञ महानुभाव सेवा समितीचे पदाधिकारी, अक्षय ठाकरे मित्र परिवारातील सदस्य तसेच परिसरातील कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

२२० केव्ही वीज उपकेंद्रातून तांब्याचे ब्लेड रॉड चोरीला

अमरावती- बडनेरा येथील २२० केव्ही वीज उपकेंद्रातून अज्ञात चोरट्याने सुमारे २० हजार रुपये किमतीचे तांब्याचे ब्लेड रॉड चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम १३६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, १५ नोव्हेंबर रोजी दुपारी २ ते ५ वाजताच्या दरम्यान बडनेरा येथील २२० केव्ही अवादा सोलर वाहिनीच्या ॲक्सिलरी आयसोलेटरच्या फेजचे तांब्याचे ब्लेड रॉड अज्ञात चोरट्याने चोरून नेले.या चोरीची माहिती १७ नोव्हेंबर रोजी दुपारी १.५६ वाजता दीपक ठोंबरे यांनी फोनद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर उपकार्यकारी अभियंता दिलीपराव लहाने यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता आयसोलेटरचे तांब्याचे ब्लेड रॉड चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. चोरीस गेलेल्या साहित्याची किंमत अंदाजे २० हजार रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी दिलीपराव लहाने यांच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नवसारीतील एकविरा कॉलनीत घरफोडी

अमरावती- गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवसारी येथील एकविरा कॉलनीत अज्ञात चोरट्याने घरफोडी करून ३५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना १६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० ते रात्री ८ वाजेदरम्यान घडली.या प्रकरणातील फिर्यादी गजानन श्रीरामजी विधाते (वय ५९) हे कुटुंबीयांसह दवाखान्यात गेले होते. घरी परतल्यानंतर घरातील सामान अस्ताव्यस्त दिसून आले. अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाचे कुलूप व कोंडा तोडून घरात प्रवेश केला होता.चोरट्याने कपाटातील टायटन कंपनीचे मनगटी घड्याळ (२ हजार रुपये), पर्समधील ४ हजार रुपये रोख, काळ्या मण्यांसह दोन ग्रॅम सोन्याचे दागिने (१५ हजार रुपये), अर्धा ग्रॅम वजनाची सोन्याची बोर (३ हजार रुपये) आणि लक्ष्मी व गणपतीची छाप असलेली नऊ चांदीची नाणी (९ हजार रुपये) असा एकूण ३५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.विधाते यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून,पुढील तपास सुरू आहे.

गटविकास अधिकाऱ्यांच्या कक्षात चोरी

अमरावती- भातकुली पंचायत समिती कार्यालयातील गटविकास अधिकाऱ्यांच्या कक्षाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने २० हजार रुपये किमतीचा ६५ इंची कमर्शियल एलईडी टीव्ही चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.१७ नोव्हेंबर रोजी सकाळी कार्यालय उघडण्यासाठी शिपाई राजू खांडेकर गेले असता गटविकास अधिकारी यांच्या कक्षाचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत आढळले. त्यांनी कक्षात जाऊन पाहणी केली असता तेथील जुना वापरता ६५ इंची कमर्शियल एलईडी टीव्ही गायब असल्याचे निदर्शनास आले.या टीव्हीची अंदाजे किंमत २० हजार रुपये असून, अज्ञात चोरट्याने कार्यालयाचे कुलूप तोडून आत प्रवेश करत हा टीव्ही चोरून नेला.याप्रकरणी पंचायत समितीतील कनिष्ठ लिपिक पांडुरंग बावणे (वय ५६) यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.



पोलिसांकडून तीन दुर्गा मंडळांची उत्कृष्ट मंडळ म्हणून निवड

आसेगाव पूर्णा- पोलीस स्टेशन आसेगाव पूर्णा यांच्या वतीने दुर्गोत्सव २०२६ अंतर्गत उत्कृष्ट आयोजन, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम तसेच उत्सवातील शिस्तबद्ध नियोजनाच्या निकषांवर तीन दुर्गा मंडळांची उत्कृष्ट दुर्गा मंडळ म्हणून निवड करण्यात आली आहे.यामध्ये आसेगाव पूर्णा येथील नवयुवक बहुउद्देशीय दुर्गा मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर अमृत बोबडे, राजणा पूर्णा येथील आदर्श नवदुर्गा उत्सव मंडळाचे अध्यक्ष सतीश विनायक वैराळे आणि टाकरखेडा पूर्णा येथील पूर्णा माय नवदुर्गा उत्सव मंडळाचे अध्यक्ष दीप सुरेश बोबडे यांच्या मंडळांचा समावेश आहे.पोलीस प्रशासनाच्या या निवडीमुळे संबंधित मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. धार्मिक उत्सव शांततेत, शिस्तीत आणि सामाजिक सलोखा जपत साजरे करण्याच्या दृष्टीने हा गौरव प्रोत्साहन देणारा ठरणार आहे.

कर्जमाफी मिळूनही शेतकरी पीक कर्जापासून वंचित

खाते बंद करण्याच्या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी; नवीन पीक कर्ज तातडीने वाटप करण्याची मागणी

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर



येथील तालुक्यातील कर्जमाफीचा लाभ मिळूनही कर्जखाती बंद न झाल्याने नवीन पीक कर्जापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर प्रहार संघटनेने भंडारज येथील सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखेसमोर आंदोलन सुरू केले आहे. पात्र शेतकऱ्यांची कर्जखाती तातडीने बंद करून नवीन पीक कर्जाचे वाटप सुरू करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे.

प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष निलेश विनोदराव चोपडे यांनी १८ नोव्हेंबर रोजी बँक व्यवस्थापकांना निवेदन देऊन शेतकऱ्यांची समस्या मांडली. शासनाकडून कर्जमाफी मिळाली असतानाही अनेक शेतकऱ्यांची कर्जखाती अद्याप बंद झालेली नसल्याने त्यांना नवीन पीक कर्ज मिळण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे आगामी शेती हंगामासाठी शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

दरम्यान, बँक प्रशासनाने १८ नोव्हेंबर रोजी लेखी उत्तर देत वरिष्ठ कार्यालयाशी चर्चा झाल्याचे सांगितले. संबंधित सर्व कर्जखाती दहा दिवसांत बंद करण्यात येतील. त्यानंतर नवीन पीक कर्जाचे वाटप सुरू करण्यात येईल, तसेच दररोज २० ते २५ शेतकऱ्यांना कर्ज दिले जाईल, असे आश्वासन बँकेने दिल्याचे संघटनेने सांगितले.

मात्र, नवीन पीक कर्ज मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे प्रहार संघटनेने बँकेसमोर आंदोलन सुरू केले. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.या आंदोलनात प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष निलेश चोपडे यांच्यासह योगेश डोबाळे, विकी हुरबडे, शुभम निमकाळे, श्रीकांत वाघ, चेतन जाउळकर, गौरव मंगळे, कैलास गिते, वासुदेव चिकटे, प्रफुल्ल चव्हाण, उद्धव मंगळे, शेषराव तायडे, भास्कर निचळ, पंजाब गोरेले, निरंजन राशसकर आणि काशीराम राशसकर यांच्यासह परिसरातील शेतकरी सहभागी झाले होते. कर्जमाफीचा लाभ प्रत्यक्षात मिळून शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध व्हावे, यासाठी प्रहार संघटनेने आंदोलनाची भूमिका घेतली आहे. बँक प्रशासनाने दिलेल्या लेखी आश्वासनाची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

क्रांतीज्योती ब्रिगेडची महानगर कार्यकारिणी घोषित



अमरावती - येथील क्रांती ज्योती ब्रिगेड या सामाजिक संघटनेच्या महानगर अध्यक्ष पदावर सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर यावले तर सचिव पदावर जय पवार यांची एकमताने निवड करून महानगर कार्यकारिणी घोषित करण्यात आली.संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या बैठकीला प्रदेश पदाधिकारी रत्नाकर चरडे, देवानंद गणोरकर, प्रा. सुरेश यावले, कृषक आघाडीचे जिल्हाध्यक्ष ॲड. प्रभाकर वानखडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यांचे हस्ते महानगर कार्यकारिणी मधील अध्यक्ष ज्ञानेश्वर यावले, उपाध्यक्ष दीपक मेहरे, कोविदराव तडस,सचिव जय पवार,सहसचिव प्रा. विनोद सावरकर, कोषाध्यक्ष इंजि. रवींद्र चौधरी, सह कोषाध्यक्ष इंजि. गजानन वानखडे, संघटक प्रवीण देवळे, वसंत तिजारे, प्रसिद्धी प्रमुख प्रभाकर वानखडे, सदस्य संजय डहाके, दत्ताजी घाटोड,चंद्रकांत कुरळकर, संजय तिखे यांना नियुक्ती पत्र प्रदान करून पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.संघटने मध्ये नवचैतन्य निर्माण करून संघटन कार्य समाजातील शेवटच्या घटका पर्यंत पोहचविण्या करिता कटीबद्ध राहू असे आश्वासन नवनियुक्त अध्यक्ष ज्ञानेश्वर यावले यांनी मनोगता मधून दिले.

'रामायण' चित्रपटावर हिंदू जनजागृती समितीचा तीव्र आक्षेप

अमरावती/का.प्र.



नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'रामायण' चित्रपटातील काही दृश्यांमधून महर्षि वाल्मिकी लिखित रामायणातील मूळ कथेत 'लेखन स्वातंत्र्या'च्या नावाखाली जाणीवपूर्वक बदलण्यात आले आहेत. यामध्ये रावणाचे अवाजवी उदात्तीकरण, अनेक प्रसंगात विपर्यास, लक्ष्मणाचे अवमूल्यन आणि प्रभु श्रीराम-लक्ष्मण यांच्या पराक्रमाशी विसंगत चित्रण अशा अनेक गोष्टी अत्यंत संतापजनक व आक्षेपार्ह आहेत. 'रामायण' हा कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा विषय आहे. या चित्रपटात 'कम्युनिस्ट अजेंडा' राबवल्याचेही दिसून येते. त्यामुळे रामाऐवजी रावणाचे महिमामंडन होणार असेल, तसेच आमच्या धर्मग्रंथांतील संदर्भांची मोडतोड होणार असेल, तर आम्ही या चित्रपटाच्या येणाऱ्या दुसऱ्या भागाला कडाडून विरोध करू, असा इशार देत 'कम्युनिस्ट नॅरेटिव्ह पसरवणारा हा चित्रपट सनातनी हिंदूंनी पाहू नये', असे आवाहन हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट यांनी पत्रकार परिषदेत केले.

आज 'मुंबई मराठी पत्रकार संघा'त झालेल्या पत्रकार परिषदेला सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते अभय वर्तक आणि हिंदु जनजागृती समितीचे मुंबई प्रवक्ते सतीश कोचरेकर हेही उपस्थित होते.या वेळी सनातन संस्थेचे प्रवक्ते अभय वर्तक म्हणाले की, जे रामायणात आहे, तसेच चित्रण होणे अभिप्रेत आहे. मात्र अनेक प्रसंगांत मूळ रामायणातील प्रसंगांची मोडतोड केली आहे. हे स्वीकारार्ह नाही. आज देशात रामभक्त पंतप्रधान आणि रामाला आदर्श मानणारे सरकार असतांना अशा कलाकृतींच्या माध्यमातून इतिहासाची मोडतोड होत असेल, तर ते दुर्दैवी आहे. घनवट पुढे म्हणाले की, 'सेन्सॉर बोर्ड' हे हिंदु सोडून सर्व अन्य धर्मियांच्या भावनांची काळजी घेणारे असून हिंदूंच्या धार्मिक भावनांची त्यांना आजिबात किंमत नाही. 'सेन्सॉर बोर्ड'ने कोणत्याही धर्मग्रंथांवर आधारित चित्रपटांना प्रमाणपत्र देतांना त्याचा पुरेपूर अभ्यास करायला हवा, असेही घनवट यांनी सांगितले.

या चित्रपटातील काही आक्षेप - प्रत्यक्षात ऋषिमुनींचे आश्रम नष्ट करणाऱ्या पापी रावणाला या चित्रपटात गरिबांना सोन्याची घरे देणारा, शोषितांचा तारणहार म्हणून रंगवले आहे. माता सीतेचे हरण करणारा, अनेक महिलांवर अत्याचार केल्याने 'परस्त्रीला स्पर्श केल्यास भस्म होण्याचा शाप मिळालेला' रावणाला एका दासीला छेडल्यामुळे शूर्पणखेचा पती विद्युतजिव्हाला मारत 'महिलांच्या सन्मानाचा रक्षक' दाखवण्यात आले आहे. हा देखील कम्युनिस्ट अजेंडाच आहे.तसेच या प्रसंगाबद्दल प्रभू श्रीराम लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक कापल्याच्या कृतीबद्दल खर-दूषण या राक्षसांकडे क्षमायाचना करताना दाखवले आहेत. हे अत्यंत आक्षेपार्ह आहेत.खर-दूषण आणि त्यांचे १४ हजार राक्षस, तसेच ताडका यांच्याशी युद्ध करताना प्रभू श्रीराम आणि लक्ष्मण राक्षसांच्या सैन्यापासून पळताना दाखवले आहेत.चित्रपटात लक्ष्मणाला सतत उद्धट, संतापी आणि वर्तमानातील एखाद्या 'कॉमेडी' पात्राप्रमाणे संवाद करतांना दाखवले आहे.

या चित्रपटात माता सीता इतर राक्षसांशी स्वतः लढताना दाखवली आहे; पण रावण जेव्हा तिचे अपहरण करतो तेव्हा ती कोणताच प्रतिकार करत नाही, हा मोठा विरोधाभास आहे. माता सीता युद्ध करते, असे वाल्मिकी रामायणात कुठेही उल्लेख नाहीत.श्रीरामाच्या सामर्थ्यापुढे रावणाला कमी दाखवणे, हे बहुदा निर्मात्यांना त्यांच्या कम्युनिस्ट अजेंड्यात न बसणारे असावे.घनवट पुढे म्हणाले की, अशा धार्मिक गोष्टींची मोडतोड न होता चित्रपट बनवले गेले आहेत कि नाही, हे तपासण्याची सर्वस्वी जबाबदारी सेन्सॉरबोर्डाकडे असते. परंतु त्यांनी त्यांचे काम इतर वेळेप्रमाणेच नीट केलेले नाही. जर 'मेसेंजर ऑफ गॉड'ला मुसलमानांचा विरोध होतो, म्हणून त्या चित्रपटाला महाराष्ट्रात बंदी घातली जाते; 'द दा विन्सी कोड' या चित्रपटाला ख्रिस्त्यांचा विरोध होतो, म्हणून गोवा आणि केरळ येथे या चित्रपटावर बंदी घातली जाते.या चित्रपटातील आक्षेपार्ह दृश्यांच्या संदर्भात आम्ही निर्माते, दिग्दर्शक आणि सेन्सॉर बोर्ड यांना सांगू इच्छितो की, या चित्रपटाप्रमाणेच त्याच्या दुसऱ्या भागातही मोडतोड झालेली आढळली, तर देशभरात रस्त्यावर उतरून या चित्रपटाला आम्ही कडाडून विरोध करू. दुसरा भाग प्रदर्शित होण्यापूर्वी यांनी हिंदु संत आणि रामायणाचे अभ्यासक असलेल्यांना चित्रपट दाखवून प्रदर्शित करावा, असेही आवाहन समस्त हिंदु संघटनांच्या वतीने करत असल्याचे अभय वर्तक यांनी या वेळी सांगितले. तसेच रामभक्त सरकारनेही रामाची निंदा करणाऱ्या चित्रपटाविषयी भूमिका घ्यावी, असे आवाहनही सरकारला केले आहे.

न्यूमोनियामुळे बालमृत्यू रोखण्यासाठी आशा सेविकांना मार्गदर्शन

भातकुली- बालकांमधील न्यूमोनियामुळे होणारे मृत्यू कमी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या SAANS अभियानांतर्गत आज आयुष्मान आरोग्य मंदिर, उत्तमसरा येथे सर्व आशा सेविकांचे प्रशिक्षण घेण्यात आले.यावेळी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सोनाली देशमुख, आरोग्य सेवक अमित नर्सिंगकर, उत्तमसरा येथील सर्व आशा सेविका तसेच PTA सविता शिंदे उपस्थित होत्या.

SAANS म्हणजे Social Awareness and Actions to Neutralize Pneumonia Successfully हे अभियान असून, त्याचा कालावधी १२ नोव्हेंबर २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२७ असा आहे. या अभियानांतर्गत बालकांचे न्यूमोनियापासून संरक्षण, प्रतिबंध आणि वेळेवर उपचार या तीन प्रमुख बाबींवर म्हणजेच PPT (Protection, Prevention and



Treatment) दृष्टिकोनातून भर देण्यात येत आहे. बालकांमधील न्यूमोनियामुळे होणारा मृत्यूदर दर हजार जिवंत बालकांमागे तीनपेक्षा कमी करणे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.यावेळी AAM उत्तम सरा येथे डॉक्टर सोनाली देशमुख यांनी आशांची प्रशिक्षण घेतले.प्रशिक्षणादरम्यान बालकांचे न्यूमोनियापासून संरक्षण करण्यासाठी जन्मानंतर एका तासाच्या आत स्तनपान सुरू करणे तसेच पहिले सहा महिने केवळ आईचे दूध देण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

आशा सेविकांची भूमिका महत्त्वपूर्ण

या अभियानात आशा सेविकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याने त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. गावातील शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांची माहिती संकलित करणे, HBNC/HBYC भेटींच्या वेळापत्रकानुसार गृहभेटी देणे, बालकांच्या आरोग्याची तपासणी करणे तसेच कमी वजनाची, अकाली जन्मलेली आणि SNCU/NICU मधून डिस्चार्ज झालेल्या बालकांना प्राधान्याने आरोग्यसेवा मिळवून देण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

बालकाला खोकला किंवा श्वास घेण्यास त्रास होत असल्यास त्याची लक्षणे ओळखून तातडीने ANM, CHO किंवा जवळच्या आरोग्य संस्थेकडे संदर्भित करावे, असे सांगण्यात आले. तसेच MCP कार्डच्या माध्यमातून मातांना आरोग्यविषयक समुपदेशन करणे, PCV, Penta ke MR लसीकरण आणि जीवनसत्त्व 'अ'चे डोस देण्यासाठी पात्र बालकांना VHSND सत्रात आणणे, जोखीमग्रस्त बालकांची यादी तयार करणे आणि SAM/MAM बालकांचा शोध घेण्यासाठी सहकार्य करणे याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. न्यूमोनियाचा धोका वाढविणाऱ्या घरगुती परिस्थितींबाबत आशा सेविकांना विशेष सूचना देण्यात आल्या. बालकांमधील न्यूमोनियाचे लवकर निदान, योग्य प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि वेळेवर उपचार यासाठी आशा सेविकांनी गावपातळीवर जनजागृती करून पालकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

उपमहापौरांनी साधला नागरिकांशी संवाद



अमरावती/का.प्र

अमरावती महानगरपालिकेच्या जनता दरबारात उपमहापौर सचिन भेंडे यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या विविध समस्या आणि तक्रारी जाणून घेतल्या.यावेळी नागरिकांनी मांडलेल्या समस्या व तक्रारींची उपमहापौर भेंडे यांनी गांभीर्याने दखल घेतली. तसेच संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना तातडीने बोलावून नागरिकांच्या समस्यांची माहिती दिली आणि प्रत्येक तक्रारीचे लवकरात लवकर निराकरण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी थेट व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही व्हावी, यासाठी उपमहापौरांनी अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिक आणि प्रशासन यांच्यात थेट संवाद साधला जात असून, नागरिकांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने या उपक्रमाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

ना खरीप हातात, ना रब्बीची शाश्वती; निंभोरा बोडख्यातील शेतकरी हतबल!

अमरावती/का.प्र.



खरीप हंगामाने हात दिला नाही. आता रब्बीचीही शाश्वती नाही. अशा परिस्थितीत पुढचे वर्ष काढायचे कसे आणि घर चालवायचे कसे, हा प्रश्न निंभोरा बोडखा येथील शेतकऱ्यांना सतावत आहे. पाण्याअभावी पिके हातची गेली असून, आता रब्बीची पेरणी करण्याचे धाडसही होत नाही, असे शेतकरी हतबलपणे सांगत आहेत.

धामणगाव रेल्वे तालुक्यात सोयाबीन आणि कपाशी ही प्रमुख पिके आहेत. या भागातील शेतीला दर वर्षी अप्पर वर्धा प्रकल्पाच्या पाण्याचा आधार मिळतो. त्यामुळे खरीप हंगामानंतर गहू, हरभरा यांसारखी रब्बी पिके घेण्याचे नियोजन शेतकरी करतात. मात्र, यंदा पावसाने मोठी ओढ दिल्याने भूगर्भातील पाणीसाठा खालावला आहे. त्यात अप्पर वर्धा प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी आरक्षित असल्याने सिंचनासाठी पाणी मिळण्याची शक्यताही धूसर झाली आहे. परिणामी, खरीप हंगामात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसमोर आता रब्बीचा हंगामही अंधारात गेला आहे.

निंभोरा बोडखा येथील गजानन रमेशराव चवरे यांच्याकडे सहा एकर शेती आहे. पूर्वी या क्षेत्रातून एकरी आठ ते दहा पोती सोयाबीनचे उत्पादन व्हायचे. यंदा मात्र पाण्याच्या कमतरतेमुळे उत्पादनात मोठी घट झाली. एकरी अवघी दोन पोती सोयाबीन हाती आले. एका पोत्याचे वजन ६० किलो आहे. वर्षभराच्या शेतीचे नियोजन या उत्पादनावर कसे करायचे, असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे.निंभोरा बोडखा येथीलच नामदेवराव वैद्य यांचीही व्यथा वेगळी नाही. खरिपात सोयाबीनने निराशा केली. काढणीनंतर गहू किंवा हरभरा घेण्याचे नियोजन असायचे. त्यासाठी अप्पर वर्धा प्रकल्पाच्या पाण्याचा मोठा आधार होता. यंदा मात्र विहिरींमध्ये पाणी नाही आणि प्रकल्पातूनही सिंचनासाठी पाणी मिळण्याची खात्री नाही. त्यामुळे रब्बी हंगाम न घेण्याची मानसिकता त्यांनी केली आहे.

''रब्बी घ्यायचा म्हटले तर आधी जमीन तयार करावी लागेल. त्यासाठी मशागतीचा खर्च, बियाणे, खते आणि इतर निविष्ठांवर पैसे खर्च करावे लागतील. पण जमिनीत ओलावाच नाही. पाणी मिळण्याची खात्री नसताना एवढा खर्च करून काय उपयोग? पीक आले नाही तर पुन्हा कर्ज वाढेल. त्यामुळे यंदा रब्बी न घेतलेलाच बरा, असे वाटते,'' असे वैद्य सांगतात.

'रब्बीसाठी पाणी कुठून आणायचे?'

गजानन चवरे म्हणाले, ''खरीप तर गेलाच, आता रब्बीची पण काही शाश्वती नाही. पुढच्या हंगामात घर कसे चालवावे, हा मोठा प्रश्न आहे. विहिरीची पाणीपातळी खूपच खाली गेली आहे. सध्या जेमतेम अर्धा तास सिंचन करता येते. एवढ्या पाण्यावर रब्बीचे पीक कसे घेणार? दर वर्षी अप्पर वर्धा प्रकल्पातून शेतीसाठी पाणी मिळायचे. यंदा पिण्यासाठीच पाणी राखून ठेवले असल्याने सिंचनासाठी पाणी मिळण्याची शक्यता नाही. त्यामुळे माझ्यासह गावातील अनेक शेतकऱ्यांनी यंदा जमीन पडीक ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.'' धामणगाव बाजार समितीत सोयाबीन आणि कापसाची मोठी आवक होत असते. यंदा मात्र पाण्याअभावी सोयाबीनची उत्पादकता प्रभावित झाली आहे. त्यामुळे बाजार समितीतील आवकही काहीशी कमी राहण्याचे चित्र आहे.

श्रीकांत गावंडे,
माजी संचालक, जिल्हा बँक,अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अग्नितांडव : आझादनगरात सिलिंडर स्फोट

-भंगार गोदामासह ४ घरे खाक









अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील आझाद नगर परिसरात आज बुधवारी १८ नोव्हेंबर रोजी परिसरातील एका भंगार गोदामासह चार घर आगीत जळून खाक झाले. अग्निशमन विभागाच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. आगीदरम्यान गॅस सिलिंडरचा जोरदार स्फोट झाल्याने ज्वाळा भडकल्या. आग आटोक्यात आणण्यासाठी ९ अग्निशमन वाहने वापरण्यात आली.आग विझल्यानंतरही धूर निघत होता.

लग्नासाठी ठेवलेले पैसे आणि साहित्य जळाले

आझाद नगर परिसरात लागलेल्या आगीत एका घरात मुलीच्या लग्नासाठी जमा केलेले ८० हजार रोख आणि मुलीला देण्यासाठी घेण्यात आलेले इतर साहित्य जळून मोठे नुकसान झाले आहे. यामुळे एका गरीब परिवारावर आर्थिक संकट कोसळले आहे.

या आगीत १५ लाख रुपयांच्या नुकसानीचा प्राथमिक अंदाज आहे. माहितीनुसार आझाद नगर परिसरात ☞(पान २ वर)

बाळ विक्री प्रकरणाचे धागेदोरे वर्ध्यापर्यंत

-आणखी एक बाळ पोलिसांच्या ताब्यात

-डॉक्टरच्या जबाबातून सहा बाळांची माहिती
-पाच आरोपी अटकेत, चार बालकांचा शोध सुरू

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील कथित बाळ विक्री प्रकरणाचा तपास आता अमरावतीबाहेरही पोहोचला आहे. फ्रेजरपुरा पोलिसांनी बुधवारी (दि.१८) वर्धा जिल्ह्यातून आणखी एका बाळाला ताब्यात घेतले. या प्रकरणात आतापर्यंत दोन बालके पोलिसांच्या ताब्यात आली असून, एकूण सहा बालकांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता पालकांच्या परस्पर संमतीने देवाण-घेवाण झाल्याची माहिती मुख्य आरोपी डॉक्टरने दिल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. उर्वरित चार बालकांचा



शोध घेण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली आहेत. मुख्य आरोपी डॉ. वैशाली प्रफुल्ल भोजने (वय ४९) आणि प्रफुल्ल वसंतराव भोजने (वय ५६), दोघेही रा. बुटी प्लॉट, राजापेठ, अमरावती यांना अटक ☞(पान २ वर)

सोनिया गांधींच्या पुस्तकाची पाने फाडल्याचा वणवा धामणगावात

आत्मचरित्राचा अवमान करणाऱ्या शिंदे सेनेच्या नेत्यांचा तीव्र निषेध!

धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः- सोनियाजी गांधी यांच्या आत्मचरित्राच्या पुस्तकाची विटंबना केल्याच्या निषेधार्थ अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने धामणगाव रेल्वे येथे शिंदे सेना व महायुती सरकारच्या विरोधात प्रतीकात्मक पुतळा जाळून तीव्र निषेध नोंदविण्यात आला.

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या 'Belonging:



A Journey of Love' या आत्मचरित्रातील वीर सावरकरांविषयीच्या उल्लेखावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या पुस्तकाचा निषेध करण्यासाठी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या प्रवक्त्या शायना एनसी यांच्यासह पक्षाच्या अन्य नेत्यांनी पत्रकार परिषद घेतली.यावेळी पुस्तकाच्या प्रती आणि काही छायाचित्रे फाडण्यात आली. दरम्यान ☞(पान २

अंजनगाव सुर्जी येथील क्रीडा संकुलाच्या जागेचा तिढा सुटण्याच्या मार्गावर

अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- अंजनगाव सुर्जी शहराला लागून असलेल्या कृषी विभागाच्या जागेतील सात एकर जमीन क्रीडा संकुल उभारण्यासाठी मिळावी, या मागणीसाठी मुंबई येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याने अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला क्रीडा संकुलाच्या जागेचा प्रश्न आता सुटण्याच्या मार्गावर असल्याचे

मुंबईत महसूल मंत्र्यांच्या दालनात सकारात्मक बैठक



संकेत मिळाले आहेत. अंजनगाव शहराला लागून कृषी विभागाची मोठ्या प्रमाणात जागा आहे. या जागेतील सात एकर जमीन क्रीडा संकुलासाठी देण्यात यावी, यासाठी नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांचा गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरू आहे. यासाठी त्यांनी माजी खासदार नवनीत राणा यांच्या माध्यमातून तसेच थेट महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे ☞(पान २ वर)

दिवाळीत मनमानी भाडे आकारणाऱ्या २६७ खासगी बसेसवर कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः- दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर खासगी प्रवासी बसचालकांकडून होणाऱ्या अवास्तव भाडेवाढीला चाप लावण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे विशेष मोहीम राबविण्यात आली. दि. २७ ऑक्टोबर ते १६ नोव्हेंबर या कालावधीत राबविण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत २६७ दोषी बसेसवर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत पथकाने तब्बल १ हजार २३५ बसेसची तपासणी केली. यात जादा भाडे आकारणाऱ्या ७२ बस,



प्रवासी बसमधून मालवाहतूक करणाऱ्या ८१ बस, इतर गुन्हे व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ११४ बसेसवर कारवाई करण्यात आली. तसेच १६ लाख ८२ हजार २७० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. सणासुदीच्या ☞(पान २ वर)

मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाला मुदतवाढ

-अंतिम मतदार यादी आता २२ डिसेंबरला प्रसिद्ध होणार



अमरावती/प्रतिनिधीः- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या 'मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम - २०२६' ला आयोगाने मुदतवाढ दिली आहे. आयोगाच्या आदेशानुसार आता अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार श्रेणीतील खऱ्या मतदारांना आपले गणना प्रपत्र भरून देण्यासाठी पुन्हा एक संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच अंतिम मतदार यादीचे प्रकाशन आता २२ डिसेंबर रोजी केले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिष येरेकर यांनी दिली आहे.

गणना प्रपत्रे तयार करणे व मुद्रित करण्याची मुदत ☞(पान २ वर)

विदर्भ कुस्तीगीर संघाच्या उपाध्यक्ष पदी अभय माथने यांची निवड



अचलपूर/प्रतिनिधीः- विदर्भ कुस्तीगीर संघाच्या उपाध्यक्ष पदी अचलपूर नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक अभय माथने यांची निवड करण्यात आल्याने अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरासह संपूर्ण विदर्भातील कुस्तीपटू मध्ये आनंदाचे वातावरण आहे.काल १७ नोव्हेंबर रोजी नागपूर येथे महाराष्ट्र कुस्तीगीर संघाच्या झालेल्या बैठकीत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे महासचिव योगेश दोडके व विदर्भ कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष डॉ. संजय तिरथकर यांच्या हस्ते विदर्भ कुस्तीगीर संघ उपाध्यक्ष पदी अचलपूर नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक ☞(पान २ वर)

बालहक्क सप्ताह, बालविवाह निर्मूलन अभियानाला सुरवात

-विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन

अमरावती/प्रतिनिधीः- संयुक्त राष्ट्र महासभेने २७ नोव्हेंबर हा दिवस 'बालविवाह व सक्तीचे विवाह निर्मूलन आंतरराष्ट्रीय दिन' म्हणून घोषित केला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात दि.१८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत बालहक्क सप्ताह व बालविवाह निर्मूलन अभियानांतर्गत जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

समाजात बालविवाहमुक्त वातावरण तयार करणे आणि 'बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६' ची प्रभावी अंमलबजावणी या अभियानातून केली जाणार आहे. यात शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती रॅली, सामूहिक प्रतिज्ञा, निबंध, वक्तृत्व, चित्रकला व घोषवाक्य स्पर्धांचे आयोजन केले जाईल. तसेच शाळाबाह्य व शिक्षणापासून वंचित मुलींची माहिती संकलित केली जाईल. ग्रामीण व शहरी भागात 'किशोरी सभा' आयोजित करून किशोरवयीन आरोग्य, पोषण आणि बालविवाहाचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याविषयी समुपदेशन केले जाईल. ग्रामपंचायतींमध्ये दवंडी पिटवून जनजागृती केली जाईल व ग्रामसभेमध्ये 'बालविवाहमुक्त गाव' करण्याबाबतचा ठराव मंजूर केला जाईल.


अंगणवाडी केंद्र व गावस्तरावर किशोरी सभा, तसेच ग्राम बाल ☞(पान २ वर)

प्राणघातक हल्ला प्रकरणी आज मोर्शी बंद

-९ जणांवर गुन्हा दाखल!

मोर्शी/प्रतिनिधीः- मोर्शी नगरपरिषदेच्या टेरेसवर ओली पार्टीचा चित्रफीत काढणाऱ्या युवकावर नशीरपूर फाट्याजवळ हल्ला करणाऱ्या नऊ जणांविरुद्ध मोर्शी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून फरार आरोपीच्या शोधासाठी मोर्शी पोलीस पथके रवाना झाली आहे.या घटनेच्या निषेधार्थ आज दि.१९ नोव्हेंबर रोजी मोर्शी बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार मोर्शी नगरपालिकेच्या टेरेसवर शुक्रवार दि.१३ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या ओल्या पार्टीचा व्हिडिओ चित्रित करणारे प्रशांत कॉलनी येथील रमाकांत गावंडे हे दि.१७ नोव्हेंबर रोजी आपल्या नशीतपूर येथील शेतात रात्री फेरफटका मारण्यासाठी गेले. गाडीतून उतरून शेताच्या दिशेने निघत असतांनाच अचानक त्यांच्यावर नऊ जणांनी लाता भुक्क्यासह मारहाण केल्याची घटना घडली.गंभीर जखमी रमाकांत गावंडे यांना मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते मात्र परिस्थितीचे गांभीर्य पाहून त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती येथे हलविण्यात आले.मात्र जखमी रमाकांतची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्यांचा इलाज अमरावती येथील एका खाजगी



रुग्णालयात सुरू आहे.याबाबतची फिर्याद मोर्शी पोलिसात दाखल केल्यानंतर मोर्शी पोलिसांनी घटनेचे गांभीर्य पाहून फरार आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये ☞(पान २ वर)

मुख्याधिकारी पराग वानखडे यांच्या निलंबनाचा प्रस्ताव

अमरावती/प्रतिनिधीः- मोर्शी नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीत झालेल्या 'ओल्या पार्टी'च्या प्रकरणी मोर्शी नगर परिषदेचे मुख्याधिकारी पराग वानखडे यांना शासकीय सेवेतून निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी शासनाकडे सादर केला आहे. या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी दि. १४ नोव्हेंबर रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून दि. १६ नोव्हेंबरपर्यंत स्पष्टीकरण मागितले होते. मात्र, मुख्याधिकाऱ्यांनी दिलेला खुलासा असमाधानकारक व वस्तुस्थितीला धरून नसल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. तसेच जिल्हा सहआयुक्त सुप्रिया टवलारे यांच्या अध्यक्षतेखाली सदस्य सचिव म्हणून अचलपूरचे मुख्याधिकारी धीरजकुमार गोहोड, तर सदस्य म्हणून कर व प्रशासकीय अधिकारी चेतन ढेवले यांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्याला उस्फुर्त प्रतिसाद

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह प्रमुख नेत्यांची उपस्थिती

धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः- धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसला असून, भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी जिल्हा परिषद सभापती तथा माजी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रामदास निस्ताने यांनी आपल्या शेकडो समर्थक व कार्यकर्त्यांसह भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

बुधवार, दिनांक १८ नोव्हेंबर २०२६ रोजी धामणगाव रेल्वे येथील टी.एम.सी. हॉल,



-धामणगाव रेल्वे मतदारसंघात भाजपला धक्का

-रामदास निस्ताने यांचेसह शेकडो समर्थक व कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

तिवरा रोड येथे आयोजित काँग्रेस कार्यकर्ता मेळाव्यात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते रामदास निस्ताने यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून सिरीवेल्ला प्रसाद, प्रभारी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटी तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, प्रमुख उपस्थिती ☞(पान २ वर)

नदीपात्रातून वाळूची चोरी; सात लाखांचा मुद्देमाल जप्त

स्थानिक गुन्हे शाखेची महसूल विभागासह संयुक्त कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः- वर्धा नदीपात्रातून विनापरवाना वाळूचे उत्खनन करून अवैधरित्या वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली. बोरगाव धांदे परिसरात टाकलेल्या छाप्यात महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर, ट्रॉली आणि दोन ब्रास वाळू असा एकूण सात लाख आठ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी ट्रॅक्टर चालकासह मालकाविरुद्ध मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी कायदेशीर फिर्याद देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी स्थानिक गुन्हे शाखेला कारवाईच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार १८ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला बोरगाव धांदे, तालुका धामणगाव रेल्वे परिसरातील जुईगावकडून वर्धा नदीच्या पात्रातून काही जण विनापरवाना वाळू उपसा करून ट्रॅक्टर-ट्रॉलीने वाहतूक करीत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धामणगाव रेल्वेच्या तहसीलदारांशी संपर्क साधला. त्यानंतर महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. यावेळी महिंद्रा ४७५ कंपनीचा ट्रॅक्टर व ट्रॉलीच्या माध्यमातून वाळूची वाहतूक सुरू असल्याचे आढळून आले. या कारवाईत ट्रॅक्टर चालक संतोष भिमराव पोयाम (वय ४४) आणि ट्रॅक्टर मालक रणजीत चंद्रभानजी ढानके (वय ४५), दोघेही रा. बोरगाव धांदे, ता. धामणगाव रेल्वे, यांच्याविरुद्ध विनापरवाना वाळू उत्खनन व वाहतूक करून शासनाचा महसूल बुडविल्याचा आरोप आहे. कारवाईदरम्यान ☞(पान २ वर)

